Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक १८९ * * नागपूर *

बुधवार, दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

## हिमाचल प्रदेशमध्ये भूकंपाचे धक्के

■ वृत्तसंस्था, शिमला, दि. १५:
हिमाचल प्रदेश मंडी शहरात आज दुपारी १२.०१ च्या सुमारास भूकंपाचे धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर त्याची तीव्रता ३.३ इतकी मोजली गेली. जमिनीखाली त्याची खोली ५ किलोमीटर होती. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीच्या मते, मंडी, हिमाचल प्रदेश येथे दुपारी १२.०१ वाजता भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले.

भूकंपाचे धक्के जाणवल्यानंतर लोक घराबाहेर पडले. मात्र, भूकंपाची तीव्रता कमी असल्याने बहुतांश लोकांना ते जाणवू शकले नाहीत. मंडी जिल्ह्यातील बहुतांश भाग झोन ५ मध्ये येतात, जे भूकंपाच्या दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील आहे. त्यामुळे येथे वारंवार भूकंपाचे धक्के जाणवतात.

अग्राग्रलेख

खरीखरी...

## अखेर ती आलीच

ती येणार नाही. नाही येणार, अडथळे येणार. जमणार नाही. अशा अनेक अफवा आपण गेल्या अनेक दिवसांपासून ऐकत होतो. पण आपले इलेक्शन कमिशन आणि त्याचे प्रमुख राजीव कुमार अत्यंत कर्तव्यदक्ष आहेत. ते दक्ष असल्यामुळे त्यांचे लक्ष्य नियमानुसार चालावयाचे असते. नियम कोणते ठरवायचे. ते सर्व राजकीय पक्षांनी कसे पाळायचे. याबाबतीतही ते दक्ष असतात. त्यांचे संघटना चातुर्य वाखाणण्याजोगे आहे. लोकसभेची निवडणूक ज्यांनी टप्प्याटप्प्याने घेतली. एकूण सात टप्प्यात सर्वच पक्षांना प्रचाराची संधी मिळावी, म्हणून उदार हस्ते त्यांनीच अडीच महिन्यांची आचारसंहिता लागू केली. आचारसंहिता म्हटली म्हणजे जनताही फारसा विचार करत नाही. असा प्रचंड कालावधी घेऊन लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या आणि पुन्हा आपले अत्यंत लोकप्रिय पंतप्रधान स्वतःच्या पक्षाच्या खासदारांची बैठकही न बोलावता सामूहिकपणे एनडीएच्या समर्थनाने पदारूढ झाले. आता महाराष्ट्र राज्याच्या निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. तुलनेने महाराष्ट्रा एवढाच ब्रिटन हा देश आहे. त्या देशात निवडणूक घोषणा झाल्यावर अत्यंत थोड्या दिवसात एकाच दिवशी मतदान होते आणि दुसऱ्या दिवशी निकाल लागतो. कोणे एकेकाळी इंग्रजांनी आपल्यावरती राज्य केले होते. तेव्हा त्यांचा आदर्श घेऊन आपल्या निवडणूक आयुक्तांनी महाराष्ट्रात एकाच दिवशी मतदान ठेवलेले आहे. त्यानंतर अगदी तिसऱ्याच दिवशी निकालही लागणार आहे. यावरूनच आपले महाराष्ट्र राज्य मतदानासाठी किती सुरक्षित आहे. याचा हा पुरावाच नव्हे काय? वाटल्यास तिकडे झारखंडचे पहा. झारखंडची निवडणूक खंडित करून दोन दिवसात घेण्यात येणार आहे. यामुळेच महाराष्ट्र सारख्या मोठ्या राज्याच्या निवडणूका एकाच दिवशी घेण्याची हिंमत दाखवून निवडणूक आयोगाने शंकाखोरांची बोलतीच बंद केलेली आहे. 1972 नंतर एकाच दिवशी निवडणूक घेण्याचा प्रयोग आता सफल होईल. यात आमच्या मनात शंकाच नाही. महाराष्ट्र सरकारच्या लोकप्रिय घोषणांची संख्या पाहता आम्हाला तरी असे वाटते की, आपल्या राज्याची निवडणूक दर पाच वर्षांनी न घेता त्याचे दोन भाग करावेत. म्हणजेच अडीच अडीच वर्षात निवडणूक घ्यावी. म्हणजे महाराष्ट्राला कित्ती कित्ती योजना मिळू शकतात हे कळेल. नाहीतरी लाडक्या बहिणींपासून, रोडक्या शेतकऱ्यांपर्यंत आश्वासनांचा कसा महापूर होऊ शकतो. हे महाराष्ट्राने पहिल्यांदाच अनुभवलेले आहे. या सर्व योजना आज जरी कागदावर असल्या. तरी ज्या आत्मविश्वासाने या सर्व योजना बड्या बड्या वृत्तपत्रांना पानेच्या पाने भरून मोठ्या मोठ्या जाहिराती देऊन आताच्या सरकारने सर्व जनतेच्या मनात आपुलकीची गंगा आणून ठेवली आहे. त्यामुळे आपल्या राज्याच्या अर्थसंकल्पात या सर्व संकल्पांची घोषणा करून मुख्यमंत्र्यांनी अलीबाबाच्या गुहेसारखी 'जो जे वांछील, तो ते लाहो' अशा प्रकारची सोनेरी पायवाटच आखून दिलेली आहे. लोकसभेच्या निवडणुकीत टप्प्याटप्प्याने निवडणूक घेऊनही वरचा टप्पा गाठता न आल्याने आता आपल्या मुख्यमंत्र्यांनी आश्वासनरुपी गीरसप्पाचा धबधबाच ओतला आहे. आता विरोधी पक्षांची बात करूया. विरोधी पक्ष म्हणजे महाविकास आघाडी युतीत तत्वचुती करणार, असे वारंवार सांगत आहे. परवा शिवसेनेच्या दसरा मेळाव्यात या सरकारच्या लोकप्रिय योजनांबाबत उद्धवराव यांनी एकही चांगला शब्द वापरला नाही. तरीही लोक म्हणतात की, त्यांच्या मेळाव्याला जास्त गर्दी होती. हरियाणाचे निकाल लागताच ज्या काँग्रेसला महाराष्ट्राची निवडणूक हरी-भरी वाटत होती आणि लोकसभेच्या निवडणुकीप्रमाणे आपणच मोठे भाऊ असा साक्षात्कार झाला होता. त्या काँग्रेसच्या नेत्यांनीही सध्या मुख्यमंत्री आमचाच होणार, हे पालुपद बंद केलेले आहे. उबाठा शिवसेना म्हणते की, आपण सात्विक भूमिका घेऊन गद्दारीमुळे आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे न बोलताही मुख्यमंत्री पद आमचेच आहे. हे सांगायची गरजच नाही. या दोन तथाकथित मोठ्या पक्षांच्या तुलनेत महाराष्ट्रातील अनुभवी आणि सर्वात मोठे नेते कमी जागा लढवूनही मोठ्या प्रमाणावर विजय मिळवू शकतात. हे लोकसभेच्या निवडणूकीत सिद्ध झालेले आहे. त्यामुळे मुख्यमंत्रीपदावर आपण आपल्या एखाद्या प्रियाला आपण बसवू शकतो. असे जाहीर न करता इतरांकडून मुत्सद्देगिरीने वदवून घेतलेले आहे. थोडक्यात सारे काही तिकडचे तीन पक्ष आणि इकडचे तीन पक्ष दोन्ही पक्षातील अभंग पक्षावरच असेल. हे सांगायला ज्योतिषाची गरज नाही. या सहा पक्षांशिवाय आणि पाच-सहा आघाड्या किंवा बिघाड्या, 'गड्या आपुलाच पक्ष खरा' जनता प्रेमी आहे. हे दाखवून द्यायला राणा भीमदेवी थाटात गर्जना करीत सुसज्ज आहेत. आजच्या निवडणूकीच्या घोषणेचे अधिक चर्वीतचर्वण न करता आपण इमानदारीने आपल्या बोटावर मतदानाची शाई मारून घेण्यासाठी तयार राहावे. एवढेच या निवडणूक पवार्चे महत्त्व आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा
# बिगुल वाजला!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५:
निवडणूक आयोगाने आज महाराष्ट्र आणि झारखंडमधील विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी महाराष्ट्रात एकाच टप्प्यात मतदान होणार असल्याचे जाहीर केले. त्यानुसार २० नोव्हेंबरला राज्यात मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

निवडणूक आयोगाने मंगळवारी महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकांसह ४८ विधानसभा आणि २ लोकसभा मतदारसंघांच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या. महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला एकाच टप्प्यात आणि झारखंडमध्ये दोन टप्प्यात निवडणुका होणार आहेत. पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबरला आणि दुसऱ्या टप्प्यात २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. २३ नोव्हेंबरला निकाल लागेल.

विधानसभेच्या ४८ आणि लोकसभेच्या २ जागांसाठी पोटनिवडणूकही दोन टप्प्यात होणार आहे. १३ नोव्हेंबरला विधानसभेच्या ४७ आणि लोकसभेच्या एका जागेसाठी मतदान होणार आहे. एक विधानसभा आणि एका लोकसभेच्या जागेसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. २३ नोव्हेंबरला निकालही लागणार आहे.



महाराष्ट्रातील निवडणूक प्रक्रियेंतर्गत २३ ते २९ ऑक्टोबर दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असून, ३० ऑक्टोबरला उमेदवार अर्जाची छाननी केली जाईल. ४ नोव्हेंबर पर्यंत अर्ज मागे घेता येणार असून, २० नोव्हेंबरला राज्यात एकाच टप्प्यात मतदान घेतले जाईल. २३ नोव्हेंबरला मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाईल.

निवडणूक आयोगाने महाराष्ट्र आणि झारखंडचा दौरा केल्याची माहिती आयुक्तांनी दिली. महाराष्ट्रात ९.६३ कोटी मतदार असल्याचे निवडणूक आयोगाने सांगितले. यात ४ कोटी ९३ लाख पुरुष तर महिला मतदारांची संख्या आहे. राज्यातील एकूण २८८ विधानसभा मतदारसंघात १ लाख १८६ मतदान केंद्र असल्याची माहितीही राजीव कुमार यांनी दिली. या निवडणुकीत जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर आम्ही करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठी तयार करण्यात आलेल्या व्होटर ॲपमध्ये मतदारांना सर्व माहिती पाहता येणार आहे.

पैसे, मद्य, ड्रग्जचे वाटप यावर कडक नजर ठेवण्याचे आदेश सर्व विभागांना देण्यात आले असल्याचेही राजीव कुमार यांनी सांगितले. सर्व मतदार केंद्र दोन किलोमीटरच्या आत असावेत, अशा सूचनाही सर्वांना देण्यात आल्या असल्याचेही त्यांनी सांगितले.

दोन्ही राज्यांतील निवडणुकांसोबतच १३ राज्यांतील ३ लोकसभा आणि ४९ विधानसभा जागांवर पोटनिवडणूकही होऊ शकते. राहुल गांधी यांच्या राजीनाम्यामुळे केरळमधील वायनाडची जागा रिक्त झाली आहे, तर महाराष्ट्रातील नांदेडची जागा काँग्रेसच्या खासदाराच्या निधनामुळे रिक्त झाली असून पश्चिम बंगालमधील बशीरहाटची जागा तृणमूलच्या खासदाराच्या निधनामुळे रिक्त झाली आहे.

**२३ ते २९ ऑक्टोबर दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करता येणार**

**३० ऑक्टोबर उमेदवार अर्जाची छाननी**

**४ नोव्हेंबरला अर्ज मागे घेता येणार**

**२० नोव्हेंबरला राज्यात मतदान**

**२३ नोव्हेंबरला मतमोजणी**

महाराष्ट्रात एका टप्प्यात आणि झारखंडमध्ये पाच टप्प्यात मतदान होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबर २०२४ रोजी, तर झारखंड विधानसभेचा कार्यकाळ ५ जानेवारी २०२५ रोजी संपत आहे.

महाराष्ट्रात एकूण ९.६३ कोटी मतदार आहेत. त्यापैकी ४.९७ कोटी पुरुष आणि ४.६६ कोटी महिला आहेत. २० ते २९ वयोगटातील १.८५ कोटी मतदार आहेत. २०.९३ लाख मतदार पहिल्यांदाच मतदान करणार आहेत.

महाराष्ट्रात गेल्या दोन वेळापासून (२०१४ आणि २०१९) एकाच टप्प्यात निवडणुका होत आहेत. २०१४ मध्ये १५ ऑक्टोबर रोजी सर्व २८८ जागांसाठी मतदान झाले होते. तर २०१९ मध्ये ३० नोव्हेंबरला एकाच टप्प्यात मतदान झाले होते.

याशिवाय १३ राज्यांतील ४९ विधानसभा जागांसाठी पोटनिवडणुकाही जाहीर होऊ शकतात. यामध्ये उत्तर प्रदेशातील १०, राजस्थानमधील ७, पश्चिम बंगालमधील ६, आसाममधील ५, बिहारमधील ४, पंजाबमधील ४, कर्नाटकातील ३, केरळमधील ३, मध्य प्रदेशातील २, सिक्कीममधील २ तसेच गुजरात, उत्तराखंड आणि छत्तीसगडच्या 1 विधानसभा जागांचा समावेश आहे.

## आघाडीचे जागावाटप ठरले

■ काँग्रेस ११९, शिवसेना ठाकरे गट ८६, शरद पवार गट ७५ ■

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५:
महाविकास आघाडीच्या गोटातून एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. मविआच्या संभाव्य जागावाटपाचे सूत्र समोर आले आहेत. त्यानुसार मविआने ११९-८६-७५ अशा पद्धतीने जागावाटप करायचे ठरवल्याची माहिती काँग्रेसच्या उच्चपदस्थ वर्तुळातून समोर आली आहे.




माहितीनुसार, विधानसभा निवडणुकीला काँग्रेस ११९, शिवसेना ठाकरे गट ८६ आणि शरद पवार गट ७५ जागा लढवेल, असे सांगितले जात आहे. तर शेकापला ३, समाजवादी पक्ष ३ आणि कम्युनिस्ट पक्षाच्या वाट्याला २ जागा येणार आहेत.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्ष १३ जागा जिंकत राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला होता. अद्याप १० ते १५ विधानसभा मतदारसंघांचा तिढा कायम असल्याचे सांगितले जाते. मात्र, शरद पवार गट १० पैकी ८ जागा जिंकत स्ट्राईक रेटच्या गणितात सरस ठरला होता. तरीही शरद पवार गटाने विधानसभेच्या जागावाटपात सर्वात कमी म्हणजे ७५ जागांवर निवडणूक लढवण्याची तयारी दाखवली आहे. शरद पवार यांची ही भूमिका राजकीय वर्तुळाला बुचकाळ्यात टाकणारी आहे. याविषयी आता राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लढवायला सुरुवात झाली आहे.

## मीच महाराष्ट्राला योग्य रस्त्यावर आणणार

■ वृत्तसंस्था
फलटण, दि. १५:
वय झाल्यामुळे आणि नव्या पिढीला नेतृत्वाची संधी मिळावी म्हणून शरद पवारांनी अध्यक्षपदावरून बाजूला व्हावे आणि आपल्याला संधी द्यावी असा प्रयत्न अजित पवारांनी केला होता.

त्याला आधी होकार देऊन नंतर शरद पवार मागे फिरले होते. ते सुप्रिया सुळेंकडे राष्ट्रवादी शरद पवार गटाची सूत्रे देतील, अशी चर्चा होती. मात्र, आपण निवृत्ती घेणार नाहीच. पक्षाची सूत्रे दुसऱ्या कुणाकडेही देणार नसल्याचे संकेत शरद पवारांनी दिले.

पक्षाची सूत्रे कुणाकडेही देणार नसल्याचे स्पष्ट संकेत



लोकसभेला ३१ जागा गमावल्यावर या सत्ताधाऱ्यांना आता लाडकी बहीण आठवली. बारामतीकर लय हुशार आहेत. बारामतीकरांनी बहिणीला पाठिंबा दिला.

शरद पवारांनी स्वतःची पुढील राजकीय वाटचाल स्पष्ट केली. ते म्हणाले की, ८४ वर्षांचा होवो की ९० वर्षांचा. महाराष्ट्राला योग्य रस्त्यावर आणल्याशिवाय हे म्हातारं स्वस्थ बसणार नाही. मला साठ वर्षात एक दिवस पण तुम्ही सुट्टी दिली नाही. चार वेळा तुम्ही मुख्यमंत्री केलं. महाराष्ट्राचा चेहरा बदलायची माझी नैतिक जबाबदारी आहे, असेही त्यांनी ठासून सांगितले.

**निवडणूक आयोगाने शरद पवार गटाची मागणी फेटाळली**

शरद पवार गटाकडून पिपाणी चिन्ह गोठवण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे करण्यात आली होती. मात्र ही मागणी आयोगाने फेटाळली आहे. हा शरद पवार गटाला मोठा धक्का मानला जात आहे. या निवडणूक चिन्हाबाबत शरद पवार गटाने निवडणूक आयोगाने दोन विनंती केल्या होत्या. त्याची नोंद निवडणूक आयोगाने घेतली. मात्र, पिपाणी रद्द करण्यास नकार दिला आहे .

## पाच विमानांना बॉम्बची धमकी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १५:
मंगळवारी ५ फ्लाइट्सना बॉम्बच्या धमक्या आल्या. एअर इंडियाच्या दिल्ली ते शिकागो या विमानाचाही धोका असलेल्या उड्डाणांमध्ये समावेश होता. यानंतर त्याला कॅनडाकडे वळवण्यात आले. विमान कॅनडातील इकालुइट विमानतळावर उतरले. येथे प्रवासी आणि त्यांच्या सामानाची तपासणी करण्यात आली आहे.

विमानाने आज पहाटे ३ वाजता दिल्लीहून उड्डाण केले आणि ते दुपारी ४:३० वाजता शिकागोला पोहोचणार होते. दिवसभरात ५ उड्डाणे धोक्यात आल्याने सुरक्षा यंत्रणांनी अनेक विमानतळांवर दहशतवादविरोधी कारवाया केल्या.

तपासात समोर आले आहे की, सर्व धमक्या एकाच व्यक्तीने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर पाठवल्या होत्या. त्यामुळे शेकडो प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, नंतर या धमक्या खोट्या निघाल्या. १४ ऑक्टोबर रोजी मुंबईहून उड्डाण करणाऱ्या तीन विमानांना बॉम्बची धमकी देण्यात आली होती.

## आमदार खोसकर काँग्रेसमधून निलंबित

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५:
पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत काँग्रेसने इगतपुरीचे आमदार हिरामण खोसकर यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

खोसकर यांची काँग्रेस पक्षातून सहा वर्षांसाठी हकालपट्टी करण्यात आली आहे. काँग्रेसच्या या कारवाईपूर्वी खोसकर यांनी सोमवारी रात्रीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता.

खोसकर यांनी सोमवारी रात्री अजित पवार यांच्या देवगिरी निवासस्थानी राष्ट्रवादीत प्रवेश केला. खोसकर यांच्या पक्षांतराची माहिती मिळाल्यानंतर काँग्रेसने आज कारवाई केली.

## राज्यपाल नियुक्त आमदारांचा शपथविधी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५:
विधानसभा निवडणुकीच्या घोषणेपूर्वी राज्यात मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या आहेत. राज्य सरकारकडून राज्यपाल नियुक्त १२ जागांपैकी ७ जागांसाठी उमेदवारांची नावे राज्यपालांकडे पाठवण्यात आली होती. त्यानुसार राज्यपालांनी या नावांना मंजूरी दिली होती. या आमदारांचा आज शपथविधी झाला.

भाजपकडून राज्यपाल नियुक्त विधानपरिषद आमदार म्हणून पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्यासह विक्रांत पाटील आणि बाबू सिंग महाराज राठोड यांना संधी देण्यात आली आहे. तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांचे पुत्र पंकज भुजबळ आणि सांगली-मिरज-कुपवाडचे माजी महापौर इद्रिस नायकवडी यांना संधी मिळाली आहे. तर शिवसेनेने हेमंत पाटील आणि मनिषा कायंदे यांची वर्णी लागली आहे.

पंकज भुजबळ हे २००९ आणि २०१४ मध्ये नाशिक जिल्ह्यातील नांदगावमधून विधानसभेवर गेले होते. २०१९मध्ये मात्र त्यांना हॅट्रीक साधता आली नाही. शिवसेनेचे सुहास कांदे यांनी त्यांचा पराभव केला होता. पंकज भुजबळ नांदगावमधून लढण्यास इच्छुक आहेत. पण त्यांची विधान परिषदेवर वर्णी लावण्यात आली आहे.

## मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेत आणखी ११० तीर्थक्षेत्रे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५:
मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली असून राज्यातील ९५ आणि राज्या बाहेरील १५ अशा आणखी ११० तीर्थक्षेत्रांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी महाराष्ट्रातील ६६ आणि महाराष्ट्राच्या बाहेरील ७३ तीर्थक्षेत्रांचा समावेश योजनेत केला होता.

राज्य सरकारकडून सर्व धर्मीय नागरिकांसाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना राबवली जात आहे. या योजनेद्वारे अडीच लाख रुपयांपेक्षा अल्प वार्षिक उत्पन्न असलेल्या ६० वर्षे आणि त्यावरील वयोगटाच्या नागरिकांना तीर्थक्षेत्रांचे विनामूल्य दर्शन घडविण्यात येत आहे. एका व्यक्तीला एकदाच या योजनेचा लाभ घेता येणार आहे. प्रवास, भोजन, निवास आदी सर्व व्यवस्था राज्य शासनाकडून केली जाते.

महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रांत शिवनेरी (पुणे) गडावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थळ, तसेच रायगडावरील शिवराज्याभिषेक स्थळ यांचा समावेश केला आहे. यासह सातारा जिल्ह्यातील श्री गोंदवलेकर महाराज यांचे गोंदवले हे स्थान, महाड येथील चवदार तळे, नागपूचे रामटेक, पुण्यातील भिडेवाडा, वाशीमची पोहरादेवी, जळगाव येथील पाटणादेवी मंदिर, सिंधुदुर्गातील कुणकेश्वर मंदिर आदी स्थानाचा नव्याने समावेश केला आहे. तर उत्तर प्रदेशातील आग्रा किल्ला, कर्नाटकमधील मायाक्का देवी मंदिर, बिहार येथील गौतम बुद्धांची साधना भूमी, गुजरातमधील संखेश्वर तीर्थ आदी महाराष्ट्राच्या बाहेरील तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

महत्वाची माहिती
युरोलॉजिस्टशी कधी संपर्क साधावा
यूरोलॉजिस्ट किंवा यूरोसर्जन हे सुपर स्पेशालिस्ट डॉक्टर आहेत ज्यांना राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने मान्यता दिली आहे. त्यांच्याकडे एमसीएच किंवा डीएनबी पदवी असते
यूरोलॉजिस्ट कोणत्या अवयवांच्या रोगांवर उपचार आणि ऑपरेशन करतात
महिला, पुरुष आणि मुलांसाठी
मूत्रपिंड (किडनी) • मूत्रनलिका (युरेटर)
मूत्राशय (लघवीची पिशवी, युरिनरी ब्लॅडर)
मूत्रमार्ग (युरेथ्रा) • अधिवृक्क (ॲड्रिनल ग्रंथी)
मूत्रपिंड प्रत्यारोपण (किडनी ट्रांसप्लांट)
पुरुष पुनरुत्पादनाचे अवयव जसे
पौरुषग्रंथी (प्रोस्टेट) • वृषण (टेस्टीस) • पुरुष वंध्यत्व
पुरुषाचे जननेंद्रिय (पेनीस) • नंपूसकता (इम्पोटन्स)
वरील अवयवांचे सर्व रोग कॅन्सर, गाठ, मुतखडे, जंतुसंसर्ग, अडथळे, दुखापत, जन्मजात व्यंग आणि लघवीच्या सर्व समस्यांवर उपचार आणि ऑपरेशनसाठी यूरोलॉजिस्टचा सल्ला घ्या.
कृपया अप्रशिक्षित आणि अशिक्षित लोकांकडून उपचार करुन घेऊ नका. स्वतःसाठी आणि तुमच्या प्रियजनांसाठी योग्य डॉक्टर निवडा.
यूरोलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया
अकोला यूरोलॉजि असोसिएशन
द्वारे जनहितार्थ जारी
डॉ. सुमित अग्रवाल ▲ डॉ. नरेश बदलानी ▲ डॉ. प्रतिक लड्ढा
डॉ. जयदीप महाजनी ▲ डॉ. प्रशांत मुळावकर ▲ डॉ. अभय शाह
डॉ. आनंद शर्मा ▲ डॉ. समित तुळजापूरे




## लाडकी बहीणचे प्रमोशन, महायुतीत वादाला तोंड?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५:
विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होत आहे. त्याआधी भाजपकडून 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'ची जोरदार जाहिरातबाजी करण्यात आली. मात्र, भाजपने या जाहिरातीमधून मुख्यमंत्री हा शब्द वगळल्याचे दिसत आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेऐवजी केवळ लाडकी बहीण योजना असा उल्लेख केला आहे. यामुळे विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत महायुतीमध्ये वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

राज्यातील प्रमुख दैनिकांच्या पहिल्या पानावर भाजपने लाडकी बहीण योजनेची जाहीरात प्रकाशित केली. या जाहिरातीत महिला देवेंद्र फडणवीस यांना राखी बांधताना दाखवल्या आहेत. तर जाहिरातीच्या हेडिंगमध्ये आशीर्वाद महायुतीला असा उल्लेख केला आहे. मात्र जाहिरातीत कुठेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाचा उल्लेख दिसत नाही. तसेच 'महायुतीशासित महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना यशस्वी, चार हफ्ते जमा' असा मजकूर लिहिला आहे.

जाहिरातीमध्ये महाआघाडीच्या इतर राज्यांतील योजनांच्या अपयशाबद्दल माहिती देण्यात आली आहे.

काही दिवसांपूर्वी अजित पवार गटाकडून 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'च्या जाहिरातीमधून मुख्यमंत्री हा शब्द वगळला होता. अजित पवार यांनी अर्थमंत्री म्हणून लाडकी बहीण योजना सुरु केली, असे सांगण्याचा प्रयत्न या जाहिरातीमधून झाला होता. आता भाजपनेच मुख्यमंत्र्यांना वगळून जाहीरात केल्याने निवडणुकीच्या रणधुमाळीत महायुतीमध्ये काय पडसाद उमटतात, हे पहावे लागणार आहे.

# ओबीसी हक्क परिषदेची जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने

**पालघर, दि. १५ : प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यात पेसा अंतर्गत ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात जिल्हा परिषदेमध्ये नोकर भरती करताना 100% आरक्षण देऊन आदिवासी समाजातील शिक्षकांची कंत्राटी भरती केली. मात्र त्याच परिसरात राहणाऱ्या बिगर आदिवासी समाजातील सुशिक्षित बेरोजगारांची भरती न करता त्यांच्यावर अन्याय करण्यात आला या निषेधार्थ ओबीसी हक्क परिषद तर्फे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर निषेध व्यक्त करून आंदोलन करण्यात आले.

आदिवासी खासदार व आमदारांनी मंत्रालयातील संरक्षक जाळीवर उड्या मारून शासनावर दबाव आणून ओबीसी व बिगर आदिवासी समाजावर अन्यायकारक असा शासन निर्णय काढला या निर्णयानुसार पालघर जिल्हा परिषदेने पेसा अंतर्गत परिसरात 821 आदिवासी शिक्षकांच्या कंत्राटी पद्धतीने नेमणुका करण्याचे आदेश देण्यात आले याची तीव्र प्रतिसाद पालघर जिल्ह्यातील बिगर आदिवासी सुशिक्षित बेरोजगारांमध्ये उमटले त्यांनी पालघर येथे बैठक घेऊन येत्या विधानसभेच्या निवडणुकीत या आमदारांना मतदान न करण्याचा निर्णय घेऊन तसा ठरावही केला व काल पालघर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर या सुशिक्षित बेरोजगारानी जोरदार निदर्शने केली. जिल्ह्यात अजूनही शिक्षकांच्या व इतर क वर्ग कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त आहेत. त्या जागेवर सुशिक्षित बेरोजगार बिगर आदिवासींची नेमणूक करावी ही आमची मागणी आहे आमचे आरक्षण आम्हाला द्या त्यांच्या नेमणूक वर आमचा आक्षेप नाही पण आमच्या आहे ते आम्हाला द्या हीच आमची मागणी आहे अशा जोरदार घोषणा यावेळी देण्यात आल्या

मंत्रालयात ज्या आदिवासी आमदार खासदाराने बेडूक उड्या मारून शासनावर दबाव आणला व शंभर टक्के आदिवासी सुशिक्षित बेरोजगारांच्या नेमणुकीचा आदेश काढून घेतला त्याच वेळेला बिगर आदिवासीच्या ही नेमणुका करण्याचा आदेश काढण्यासाठी या आमदार खासदारांनी शासनावर दबाव का आणला नाही आमच्यावर त्यांनी का अन्याय केला आम्हीच त्यांना निवडून दिले आहे ना असा प्रश्न या वेळी आंदोलनकर्त्यांनी केला

सद्यस्थितीत या भरती प्रक्रियेमध्ये पालघर जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या रिक्त असलेल्या 1867 रिक्त पदांपैकी फक्त 821 पदांसाठी आदिवासी समाजातून पात्र उमेदवार उपलब्ध झाले आहेत तर 1046 पदे ही रिक्त राहणार आहेत मध्यंतरी शासनाने सुरू केलेल्या कंत्राटी भरती प्रक्रियेत आदिवासी व्यतिरिक्त इतर समाज घटकातून पालघर जिल्ह्यातून आलेल्या 3175 अर्जांपैकी 499 उमेदवार हे पात्र ठरलेले आहेत मात्र मानधन तत्वावरील नोकर भरती करताना शासनाने फक्त आदिवासी समाजातीलच उमेदवारांच्या भरतीचे आदेश दिल्याने बिगर आदिवासी समाजातील पात्र ठरलेल्या उमेदवारावर अन्याय झालेला आहे. तेव्हा जिल्हा परिषदेने त्वरित बिगर आदिवासी उमेदवारांची कंत्राटी भरती प्रक्रिया सुरू करावी ही आमची विनंती आहे अशा तऱ्हेचे निवेदन जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांना देण्यात आले.

# ठाणे, मुंबई, रायगड जिल्ह्यातील अतिसंवेदनशील कांदळवन क्षेत्रांवर 669 सीसीटीव्हींची नजर

**कल्याण, दि. १५ : प्रतिनिधी**

जैवविविधतेचे संवर्धन करण्यात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या आणि आता वाळू तस्कर, भूमाफियांच्या विळख्यात अडकलेल्या ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यातील १९५ अतिसंवेदनशील क्षेत्रातील घनदाट कांदळवन क्षेत्रावर ६६९ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. शासनाच्या या निर्णयाची कांदळवन क्षेत्र मुंबई विभागाने तातडीने दखल घेऊन अतिसंवेदनशील कांदळवन भूभागावर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची कार्यवाही सुरू केली आहे.

कांदळवनांमुळे शहर, ग्रामीण भागातील नद्या, खाडी किनारी भागात जैवविविधतेचे अधिक प्रमाणात संवर्धन होत आहे. कांदळवनाची घनदाट जंगले ही जैवविविधतेची साखळी जिवंत ठेवणारी फुप्फुसे आहेत. शहरी, ग्रामीण भागातील मोकळ्या जागा बांधकामे आणि नागरी सुविधांनी व्यापल्या जात आहेत. वाळू तस्करांनी खारफुटीची जंगले नष्ट करून तेथील वाळू उपसा सुरू केला आहे. शहरी भागात खाडी किनारच्या जागा भूमाफियांनी खारफुटी तोडून त्यावर भराव टाकून बेकायदा चाळी, इमारती, व्यापारी गाळे, गोदामे, रसद पुरवठा केंद्रे बांधण्यास सुरूवात केली आहे.

जैवविविधतता टिकून ठेवणारा हा महत्वाचा घटक नष्ट झाला तर जैवविविधतेचे अधिवास नष्ट होऊन मानवी साखळीलाही त्याची किंमत मोजावी लागेल. हा विचार करून शासनाने ठाणे, मुंबई, रायगड जिल्ह्यातील अतिसंवेदनशील कांदळवन क्षेत्रे निश्चित करून त्या घनदाट जंगलांवर सीसीटीव्हीची नजर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या कामासाठी ११९ कोटी ८८ लाखाचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

मुंबईतील कांदळवन कक्ष आणि रायगड, ठाणे, मुंबई विभागातील प्रादेशिक वन विभागाने संयुक्त





सर्वेक्षण करून ही अतिसंवेदनशील कांदळवन क्षेत्रे निश्चित केली आहेत. अतिसंवेदनशील कांदळवन क्षेत्रामध्ये मुंबईतील काही भाग, नवी मुंबई, उरण, पनवेल, भिवंडी, ठाणे, कल्याण-डोंबिवली, मुंब्रा, मिरा-भाईंदर, वसई-विरार भागांचा समावेश आहे.

कांदळवने दलदल, खाडी, नदी किनारी असल्याने हे सीसीटीव्ही अत्याधुनिक तंत्रज्ञानातील सौर उर्जेवर चालविले जाणार आहेत. अतिसंवेदनशील कांदळवन जंगलांचे संवर्धन करणे आता खूप गरजेचे असल्याने कांदळवन मुंबई कक्षाचे अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक एस. व्ही. रामाराव यांनी एक प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. तो शासनाने पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचा विचार करून तातडीने मंजूर केला आहे. मुंबई, ठाणे, रायगड भागातील वन विभागातील कांदळवन विभागातील अधिकारी, कांदळवन मुंबई कक्षाचे अधिकारी संयुक्तपणे हा पथदर्शी प्रकल्प अंमलात आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

ज्या कांदळवन विभागात नागरीकरण, औद्योगिकरण अधिक प्रमाणात होत आहे, ते भाग अतिसंवेदनशील म्हणून निश्चित करण्यात आले आहेत. हा पथदर्शी प्रयोग यशस्वी झाला तर कांदळवन क्षेत्रे असलेल्या त्या भागातही अशाप्रकारे सीसीटीव्ही लावण्याचे काम हाती घेण्यात येऊ शकते, अशी शक्यता वनक्षेत्रपाल समीर शिंदे यांनी व्यक्त केली. कांदळवन कक्ष मुंबई विभागातील एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने अतिसंवेदनशील कांदळवन क्षेत्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ही कामे सुरू करण्यात आली आहेत, असे नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले. अधिक माहितीसाठी कांदळवन मुंबई विभागाचे अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक एस. व्ही. रामाराव यांना सतत संपर्क केला. त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

# दारूच्या घोटासाठी विचारणा केल्याने मित्रावर हल्ला

**भिवंडी, दि. १५ : प्रतिनिधी**

लुम कामगाराने कामावरून घरी जात असताना त्याच्या ओळखीच्या मित्रास दारूचा घोट पाजण्यासाठी विचारणा केली असता त्याचा राग येवून मित्राने लुम कामगारास कोणत्यातरी टनक वस्तूने मारून जखमी केल्याची घटना शहरातील भादवड पाईपलाईन येथून समोर आली आहे.याप्रकरणी मित्रावर शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,अकम अयुबखर खान (३०) हा लूम कामगार गायत्रीनगर पोलीस चौकी शेजारी राहत असून तो वहाब लाला यांच्या भाड्याच्या खोलीत राहत आहे. दरम्यान अकम १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास भादवड पाईपलाईन रोडने कामावरून घरी असताना त्याने त्याच्या तोंड ओळखीच्या मित्रास दारूच्या घोटासाठी विचारणा केली.त्यावेळी त्या मित्रास या गोष्टीचा राग आल्याने त्याने अकम याच्या डोक्यात एका टनक वस्तूने हल्ला करून त्यास गंभीर जखमी केले आहे.तर घटनेनंतर हल्लेखोर मित्र फरार झाला आहे.याप्रकरणी अकमच्या फिर्यादीवरून १३ ऑक्टोबर रोजी शांतीनगर पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस फरार हल्लेखोरांचा शोध घेत आहेत.पुढील तपास पोह जगताप करीत आहेत.

# पुण्यात पेट्रोल पंपचालकांचा आजपासून बेमुदत बंद

**पुणे, दि. १५ : प्रतिनिधी**

पेट्रोलियम कंपन्यांकडून विविध मागण्या मान्य होत नसल्याने पुण्यातील पेट्रोल पंपचालकांनी उद्यापासून (मंगळवार) बेमुदत बंद करण्याची घोषणा केली आहे. पेट्रोलियम कंपन्या इंधन वाहतुकीबाबत चुकीच्या पद्धतीने निविदा प्रक्रिया राबवत असून, इंधन चोरीचे प्रमाण वाढले आहे. याबाबत वारंवार तक्रार करूनही पेट्रोलियम कंपन्या कार्यवाही करीत नसल्याने बंदचे पाऊल उचलण्यात आले आहे, अशी माहिती पेट्रोल डिलर्स असोसिएनने दिली आहे.

असोसिएशनच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत १५ ऑक्टोबरपासून बेमुदत बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबत असोसिएशनचे अध्यक्ष ध्रुव रुपारेल म्हणाले की, इंधन वाहतुकीसाठी पेट्रोलियम कंपन्यांकडून चुकीच्या पद्धतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. अव्यवहार्य दराने निविदा काढल्या जातात आणि वितरकांना कोरे कागद अथवा करारपत्रावर सही करायला भाग पाडले जाते. पेट्रोलियम कंपन्यांकडून वाहतुकीसाठी कमी दर स्वीकारणारे अनेक वाहतूकदार इंधन चोरीमध्ये गुंतलेले आहेत. त्यातील ६५ टक्के जणांना पोलिसांनी आधी पकडलेही होते. सर्व भागधारकांना



विचारात न घेता पेट्रोलियम कंपन्या पावले उचलत आहेत. यामुळे इंधनाच्या सुरक्षित वाहतुकीला हरताळ फासला जात असून, सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण होत आहे.

इंधन चोरी थांबविण्यासाठी पावले उचलण्याची मागणी असोसिएशनने वारंवार पेट्रोलियम कंपन्यांकडे केली होती. तरीही या दृष्टीने कोणत्याही उपाययोजना झालेल्या नाहीत. यामुळे गेल्या दोन वर्षांत इंधन चोरीच्या १० घटनांची नोंद झाली आहे. अशाच इंधन चोरीच्या प्रकरणात पोलिसांनी एक महिन्यांपूर्वी मोक्का अंतर्गत कारवाई केली. पेट्रोलियम कंपन्यांकडून चोरी होऊ नये यासाठी मोठा खर्च करून अत्याधुनिक यंत्रणा बसविण्यात आली आहे. अधिकाऱ्यांकडून या यंत्रणेकडे दुर्लक्ष झाल्याने या चोऱ्या होत आहेत, असे रुपारेल यांनी सांगितले.

**पेट्रोल पंपचालकांच्या मागण्या**

- **इंधन वाहतुकीच्या सर्व निविदा त्वरित रद्द कराव्यात.**
- **सुरक्षित वाहतुकीसाठी व्यवहार्य दरांसह नवीन निविदा काढाव्यात.**
- **सुरक्षेकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करावे.**
- **इंधन चोरीतील या अधिकाऱ्यांच्या सहभागाचीही पोलीस चौकशी व्हावी.**


## वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त विक्रेता बांधवांना हार्दिक शुभेच्छा...

**दै. महागासर**
**डेली नागपूर पोस्ट**
**दै. युवाराष्ट्र दर्शन**


# राष्ट्रवादी तालुका अध्यक्षाच्या हत्येचा तपास गुन्हे शाखेकडे

**मुंबई, दि. १५ : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे भायखळा विधानसभा तालुका अध्यक्ष सचिन कुर्मी ऊर्फ मुन्ना (४५) यांच्या हत्येचा तपास गुन्हेशाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. याप्रकारणी भायखळा पोलिसांनी तिघांना अटक केली होती. पूर्व वैमनस्यातून त्यांची हत्या करण्यात आल्याचा संशय आहे. याप्रकरणी भायखळा पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

भायखळा येथील रेतीवाला इंजस्ट्रीज समोरील अनंत पवार मार्गावर तिघांनी सचिन यांच्यावर धारदार शस्त्राने वार करून हत्या केली होती. आनंदा अशोक काळे ऊर्फ आण्या (३९), विजय ज्ञानेश्वर काकडे ऊर्फ पप्या (३४) व प्रफुल्ल प्रवीण पाटकर (२६) यांना अटक करण्यात आली. मृत सचिन कुर्मी राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते व मंत्री छगन भुजबळ यांचा जवळचा कार्यकर्ता होता. अनेक वर्षांपासून ते भुजबळ कुटुंबियांचे कट्टर समर्थक होते. भुजबळ कुटुंबियांनी अजित पवार यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी सचिन कुर्मीही त्यांच्यासोबत गेले. ते राष्ट्रवादीचे (अजित पवार) भायखळा तालुका अध्यक्ष म्हणून काम करीत होते.

# महामार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकी स्वराचा मृत्यू

**मनोर, दि.१५ : प्रतिनिधी**

मुंबई अहमदाबाद महामार्गावर नांदगाव गावाच्या हद्दीत झालेल्या अपघातात दुचाकी स्वराचा जागीच मृत्यू झाला आहे.शनीवारी सायंकाळी सातच्या सुमारास भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने अपघात झाला होता. या अपघातात बाईक स्वार राजेश यादव राहणार पालघर याचा जागीच मृत्यु झालं तर दुचाकीच्या मागे बसलेली त्याची पत्नीला किरकोळ दुखापत झाली आहे.

मयत सायंकाळी सातच्या सुमारास स्वतःच्या दुचाकी क्र.एम एच 48 सीजी 5105 ने बायकोला घेऊन कामावरून पालघर डुंगी पाडा येथे घरी येताना सुप्रीम हॉटेलच्या समोरील मुंबई वाहिनीवर मागून भरधाव येणाऱ्या आज्ञात वाहनाने धडक दिल्याने दुचाकी स्वराला गंभीर दुखापत झाल्याने दुचाकी स्वाराचा जागीच मृत्यू झाला. तर मागे बसलेल्या त्याच्या बायकोला थोडीफार दुखापत झाली आहे. वाहन चालक जागेवरून फरार झाला असून मनोर पोलीस अज्ञार वाहनाचा शोध घेत आहे.

# राज्यात पावसाचा 'यलो अलर्ट'

**मुंबई, दि. १५ : प्रतिनिधी**

सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस राज्यात परतीच्या पावसाच्या प्रवासाला सुरुवात झाली होती. त्यानंतर सलग चार ते पाच दिवस परतीचा पाऊस कोसळला, पण ऑक्टोबर उजडताच परतीच्या पावसाची वाटचाल थबकली. दरम्यान, राज्यात तापमानात कमालीची वाढ झाली. अजूनही राज्यातील अनेक शहरांमधील तापमान ३६ अंश सेल्सिअस पेक्षा अधिक आहे. तर आता पुन्हा एकदा परतीच्या पावसाची थबकलेली वाटचाल सुरू झाली आहे.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून थांबलेला परतीचा पाऊस आता पुन्हा सुरू झाला आहे. भारतीय हवामान खात्याने आज, सोमवारी राज्याच्या अनेक भागात पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. रविवारी देखील राज्यातील अनेक भागात पाऊस झाला, तर विदर्भात मात्र तापमान ४६ अंश सेल्सिअस पलीकडे गेले. दरम्यान, हवामान खात्याने आज पावसाचा इशारा दिल्याने उकाड्यापासून सुटका होण्याची शक्यता आहे. विशेषकरून कोकणात आज मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर मुंबईत देखील पावसाचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्रात उत्तर कोकण आणि उत्तर मध्य महाराष्ट्र येथे तुरळक ठिकाणी वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे या भागातील जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तर कोकणात वादळ आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

मुंबई आणि उपनगरांमध्ये देखील हवामान खात्याकडून पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राज्यातील बहुतांश भागात पाऊस तर राज्यात सर्व ठिकाणी ढगाळ वातावरण राहील असा अंदाज हवामान खात्याने दिला आहे. मराठवाड्यात देखील आज जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वादळ आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ झालेली आहे. ऑक्टोबर हिट च्या चटक्यांपासून अजूनही सुटका नाही. एकीकडे वाढत चाललेले ऊन तर दुसरीकडे पावसाची हलकी सर येत असल्याने उकाड्यात चांगलीच वाढ झाली आहे. विदर्भात देखील आज, सोमवारी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्रात देखील आज पावसाची शक्यता असून, पुढील दोन ते तीन दिवस महाराष्ट्रात पावसाचा जोर कायम राहील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. एकूणच आज राज्यात अनेक ठिकाणी पाऊस असणार आहे.

# बाबा सिद्दिकी यांच्या हत्येनंतर आव्हाडांचे कार्यकर्ते सावध

## एप्रिल महिन्यात आव्हाड यांनाही आली होती बिष्णोई टोळीची धमकी

**ठाणे, दि. १५ : प्रतिनिधी**

माजी राज्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे (अजित पवार गट ) नेते बाबा सिद्दिकी यांची हत्या बिष्णोई टोळीने केल्याचे प्राथमिक तपासात समोर आल्यानंतर आता राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांनी आव्हाड यांच्या घराबाहेरील सुरक्षेत वाढ करण्याची मागणी केली आहे. त्यासंदर्भाचे निवेदन त्यांनी वर्तकनगर पोलीस ठाण्यात दिले आहे. एप्रिल महिन्यात बिष्णोई टोळीकडून जितेंद्र आव्हाड यांना धमकीचा फोन आला होता. हा फोन खंडणीसाठी करण्यात आला होता. जर खंडणी दिली नाही तर कफनची व्यवस्था करावी, असेही फोन करणाऱ्या व्यक्तीने तेव्हा धमकावले होते.





माजी राज्यमंत्री बाबा सिद्धकी यांची शनिवारी रात्री भर रस्त्यात गोळ्या झाडून हत्या झाली आहे. या हत्येनंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली असून देशभरात या हल्ल्याचे पडसाद दिसून आले. तसेच राज्यातील कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्नावरून विरोधकांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. या हत्येमागे बिष्णोई टोळीचा हात असल्याचे तपासात समोर येत आहे. दरम्यान, माजी मंत्री तथा शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांकडून वर्तक नगर पोलिसांना एक पत्र देण्यात आले आहे. या पत्रात आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या घराबाहेरील सुरक्षेत वाढ करण्याची मागणी केली आहे. एप्रिल महिन्यात जितेंद्र आव्हाड यांना धमकीचा फोन आला होता. आपण बिष्णोई टोळीचा असल्याचा दावा करीत त्याने त्याचे नाव रोहित गोदारा असे सांगितले. आपण ऑस्ट्रेलियातून बोलत असून त्याच्याच आदेशावरून सलमान खानच्या घरावर गोळीबार केला असल्याचे तो सांगत होता. तसेच त्याने आव्हाड यांच्याकडून खंडणीची मागणी केली. खंडणी दिली नाही, तर त्याचे परिणाम वाईट होतील असे तो म्हणाला. तुमचे कफन खरेदी करून ठेवा, अशी धमकी देखील त्याने दिली होती. या पार्श्वभूमीवर आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांनी हे निवेदन पोलिसांना दिले आहे.



**मुंबई अहमदाबाद महामार्गावर सातिवली गावच्या हद्दीत गुजरात वाहिनीवरील वळणावर ट्रक चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे ट्रक उलटून अपघात झाला.रविवारी पहाटे अपघात झाला. अपघात ग्रस्त ट्रक रस्त्यावरून सहा ते सात फूट खाली पडल्याने ट्रकचे मोठे नुकसान झाले आहे. अपघातात ट्रक चालक किरकोळ जखमी झाला आहे.**

# कळंबोलीत चॉकलेटचे आमिष दाखवून बालिकेवर अत्याचार

**पनवेल, दि. १५ : प्रतिनिधी**

चॉकलेटचे आमिष दाखवून कळंबोलीमध्ये रविवारी सकाळी साडेअकरा वाजता एका दुकानदाराने ९ वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. या घटनेची रितसर तक्रार पालकांनी कळंबोली पोलीस ठाण्यात नोंदविली आहे.

पिडीत बालिका ही कळंबोलीत राहते. तीच्या आईने दिलेल्या तक्रारीनंतर या घटनेला वाचा फुटली. दुकानामध्ये चॉकलेटचे आमिष दाखवून संशयीत आरोपीने बालिकेला दुकानात घेतले. त्यानंतर तीच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. याबाबत बालिकेने घरी पालकांना सांगितल्यावर पोलीस ठाण्यात ४८ वर्षीय आरोपीविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला.

# पुणे जिल्ह्यात सेवानिवृत्त गोदी कामगारांचा मेळावा

**पुणे, दि. १५ : प्रतिनिधी**

भारतातील बंदर व गोदी कामगारांसाठी १ जानेवारी २०२२ पासून पाच वर्षासाठी लागू होणारा भरघोस पगारवाढीचा वेतन करार मुंबईत संपन्न झाल्यानंतर, पुणे जिल्ह्यामधील जुन्नर, आंबेगाव व राजगुरुनगर तालुक्यातील सेवानिवृत्त गोदी कामगारांचा आनंदोत्सव मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मुंबई गोदी कामगार सेवानिवृत्त संघाच्या वतीने १२ ऑक्टोबर २०२४ रोजी जुन्नर तालुक्यातील १४ नंबर येथील माई वडेवाले सभागृहात सेवानिवृत्त गोदी कामगारांचा आनंदोत्सव मेळावा मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे प्रसिद्धीप्रमुख मारुती विश्वासराव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.





याप्रसंगी मुंबई पोर्ट ट्रस्ट रिटायर्ड असोसिएशनचे अध्यक्ष सी. जे. मेंडोसा यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, मुंबई येथे झालेल्या गोदी कामगारांच्या वेतन करारात नोकरीत असलेल्या कामगारांना भरघोस पगारवाढ मिळाली असून, पेन्शनर्सना देखील चांगली पेन्शनवाढ झाली आहे. या वेतांकरारात पेन्शनवाढीचा कायदेशीर समावेश करण्यात आला आहे. सेवानिवृत्त कामगारांच्या प्रलंबित मागण्या या वेतन करारात मान्य झाल्या असून, याचे सर्व श्रेय सहा गोदी कामगार महासंघांच्या नेत्यांना व इंडियन पोर्ट असोसिएशनचे चेअरमन राजीव जलोटा यांना आहे. २००४ पासून भरती झालेल्या कामगारांना नवीन पेन्शन योजना रद्द करून जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी आपली मागणी आहे. सभेचे अध्यक्ष मारुती विश्वासराव यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात मुंबई बंदरातील सद्य परिस्थितीचे वर्णन करून, भारतातील सेवेत असलेल्या २० हजार गोदी कामगारांना आणि १ लाख ४० हजार पेन्शनर्सना १ जानेवारी २०२२ पासून लागू होणारा वेतन करार २७ सप्टेंबर २०२४ रोजी झाला असून, या वेतन करारात गोदी कामगारांना चांगली पगारवाढ व सेवानिवृत्तांना चांगली पेन्शनवाढ मिळाली आहे. या वेतन करारानुसार पोर्ट ट्रस्ट वसाहतीमध्ये राहणाऱ्या कामगारांना २९०० रूपये ते १३६६० रुपये, पोर्ट ट्रस्ट वसाहतीमध्ये न राहणाऱ्या कामगारांना ५४८० रूपये ते २५५७० रूपये पगार वाढ मिळणार असून पेन्शनर्सना ११६५ रूपये ते ६५४५ रुपये पेन्शनवाढ मिळणार आहे. सेवेत असलेल्या कामगारांना ५०० रुपये विशेष भत्ता मिळणार आहे. पेन्शन फंडाच्या रकमेत ५ हजार कोटीची तूट होती. ती आता फक्त २७० कोटी आहे. गोदी कामगारांना व त्यांच्या पत्नीला आता प्रत्येकी चष्म्याचे ४ हजार रुपये मिळणार असून ऑक्टोबर २०२४ च्या पगार व पेन्शनमध्ये ३ टक्के महागाई भत्ता वाढणार आहे. गोदी कामगारांना घरे मिळण्यासाठी सर्व कामगार संघटनानी पाठपुरावा करून एकजुटीने लढा देण्याची काळाची गरज आहे. याप्रसंगी ट्रान्सपोर्ट अँड डॉक वर्कर्स युनियनचे सेक्रेटरी बबन मेटे, सेवानिवृत्त शेड सुप्रीटेंडंट व समाजसेवक डी.एस. करलकर, बबन हाडवळे, विशाल जुन्नर सहकारी पतसंस्थेचे संचालक डी.बी. बांगर, सुनिल प्रभू, इत्यादी मान्यवरांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. सदर सभेला ट्रान्सपोर्ट अँड डॉक वर्कर्स युनियनचे माजी सचिव मोहम्मद अली, मुंबई पोर्ट ट्रस्ट रिटायर्ड एम्प्लॉईज असोसिएशनचे सरचिटणीस डी .एच. डिंग्रेजा, गोवेकर, माईकल कोलॅसो, बल्लाळेश्वर सहकारी पतपेढीचे संचालक वसंत गावडे आदी मान्यवर उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन मुंबई गोदी कामगार सेवानिवृत्त संघाचे अध्यक्ष गेनभाऊ बांगर यांनी केले तर आभार जिजाभाऊ आवटी यांनी मानले.

# कल्याण डोंबिवली पालिकेतील फेरीवाला हटाव पथकातील 134 कामगारांच्या बदल्या

**कल्याण, दि. १५ : प्रतिनिधी**

कल्याण डोंबिवली पालिकेतील फेरीवाला हटाव पथक आणि अतिक्रमण नियंत्रण पथकातील १३४ कामगारांच्या पालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या आदेशावरून अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी बदल्या केल्या आहेत. हे कामगार दहा प्रभागांमध्ये फेरीवाला हटाव पथक, अतिक्रमण नियंत्रण विभागात कार्यरत होते.

फेरीवाला हटाव, अतिक्रमण नियंत्रण विभागात अनेक कामगार एकाच प्रभागात अनेक वर्ष कार्यरत होते. त्यामुळे त्यांचे फेरीवाले, बेकायदा बांधकाम करणारे भूमाफिया यांच्याशी साटेलोटे होते. पालिका आयुक्त डॉ. जाखड यांनी फेरीवाल्यांना हटविण्यासाठी वारंवार आदेश देऊनही कल्याण, डोंबिवली परिसरातील रेल्वे स्थानक भागातून फेरीवाले हटत नव्हते. फेरीवाला हटाव पथकातील कामगारांचे फेरीवाल्यांबरोबर असलेले साटेलोटे याला कारणीभूत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले होते.

तसेच, पालिका हद्दीतील बेकायदा बांधकामांना पाठिंबा देण्यात अतिक्रमण नियंत्रण विभागातील काही कामगार सामील असल्याची चर्चा होती. त्यामुळे पालिकेने बेकायदा बांधकामांवर कितीही आक्रमक कारवाई करण्याचा पवित्रा घेतला तरी या विभागातील कामगारांच्या हस्तक्षेपामुळे बांधकामांवर कारवाई होत नसल्याच्या तक्रारदारांच्या तक्रारी होत्या. यापूर्वी अशाचप्रकारे फेरीवाला हटाव पथक, अतिक्रमण नियंत्रण विभागातील कामगारांच्या बदल्या तत्कालीन आयुक्तांनी केल्या होत्या. परंतु, बहुतांशी कामगारांनी राजकीय दबाव आणून, मंत्रालयातील आपल्या वरिष्ठ नातेवाईकांचा दबाव आणून फेरीवाला, अतिक्रमण नियंत्रण विभागातून अन्य विभागात बदली होणार नाही याची काळजी घेतली होती. त्यामुळे आताही तसाच प्रकार होणार नाही याची काळजी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांना घ्यावी लागणार आहे.

फेरीवाल्यांच्या विरुध्द, बेकायदा बांधकामांच्या विरुध्द नेहमीच तक्रार करणाऱ्या तक्रारदारांनी मात्र या बदल्यांविषयी समाधान व्यक्त केले आहे. या कामगारांच्या बदल्यांमुळे प्रभागातील साहाय्यक आयुक्तांना फेरीवाला हटविणे, बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्यास बळ मिळणार आहे. यापूर्वी अशी काही कारवाई असली की फेरीवाले, बेकायदा बांधकामांची पाठराखण करणारे कामगार अगोदरच फेरीवाले, भूमाफियांना कारवाईची माहिती देऊन त्यांना सावध राहण्याची भूमिका बजावत होते. त्यामुळे कारवाईत अडथळे येत होते. बदली कामगारांमध्ये काही मातब्बर कामगारांचा समावेश आहे.

# विधानसभा निवडणूक : अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या दीर्घ रजेवर गंडांतर

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. १५ :



विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी विविध पथकांच्या नियुक्त्या, प्रशिक्षण वर्ग व इतर तयारी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर शासकीय, निमशासकीय कार्यालयांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दीर्घ रजा वैद्यकीय किंवा अपरिहार्य कारणाशिवाय मंजूर करू नयेत, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. विधानसभा निवडणुकीमुळे शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दीर्घ रजेवर गंडांतर आले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या तयारीला वेग आला आहे. निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियोजन केले जात आहे. निवडणूक कायासाठी विविध पथकांच्या नियुक्त्या केल्या जात असून कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देखील दिले जात आहे. अधिकारी व कर्मचारी रजेवर असल्यास त्यामध्ये अडथळा येतो. त्यामुळे सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, त्यांच्या अधिनस्त कार्यालये, शाळा-महाविद्यालये आदींनी अधिकारी व कर्मचारी यांच्या अपरिहार्य कारण किंवा वैद्यकीय कारणा व्यतिरिक्त कुठलीही अर्जित, दीर्घ मुदतीची रजा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या पूर्व परवानगीशिवाय मंजूर करू नये. कर्मचारी उपलब्ध नसल्याने निवडणूक कामकाजात व्यत्यय येतो. त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील, असे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी स्पष्ट केले आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीत गैरप्रकार घडू नयेत यासाठी ठिकठिकाणी तपासणी पथके ठेवावी. आवश्यक तिथे प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे निर्देश देखील जिल्हा निवडणूक अधिकारी अजित कुंभार यांनी दिले आहेत. आचारसंहिता काळात कुठेही नियमांचा भंग होता कामा नये. मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी कुणी चुकीचा मार्ग अवलंबत असेल तर तत्काळ कारवाई करावी. संशयास्पद वाहतूक, तसेच बँक व्यवहारांवर नजर ठेवावी. कारवायांचे प्रमाण वाढवावे. सर्वत्र पोलीस बंदोबस्त चोख ठेवावा. आवश्यक मनुष्यबळाचे वेळेत प्रशिक्षण पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

मतदान केंद्रांवर आरोग्य पथक, वीज, पंखे, पेयजल, रॅम्प आदी सुविधा असतील याची खातरजमा करावी. उमेदवारांना आवश्यक परवानगी वेळेत मिळण्यासाठी एक खिडकी योजना राबवावी. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न करा.

कर्तव्यावर असलेल्या प्रत्येकाचे मतदान व्हावे यासाठी १०० टक्के कर्मचाऱ्यांना पोस्टल मतपत्रिका देणे आवश्यक आहे. निवडणूक आयोगाच्या प्रत्येक सूचनेचे दक्षतापूर्वक पालन करावे. स्वीपच्या माध्यमातून व्यापक मतदार जनजागृती करावी, असेही निर्देश त्यांनी दिले. डेटा संकलन व अद्ययावतीकरणाची प्रक्रिया सर्व स्तरावर समन्वय ठेवून निर्दोष व अचूकपणे राबविण्याची सूचना त्यांनी केली.

# बडनेरा रेल्वेस्थानकात आढळला युवतीचा निर्वस्त्र मृतदेह

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १५ :

बडनेरा रेल्वे स्थानकाच्या मागील वाहनतळानजीक पाण्याच्या टाकीजवळ मंगळवारी सकाळी एका २२ वर्षीय युवतीचा मृतदेह निर्वस्त्र स्थितीत सापडल्याने एकच खळबळ उडाली. मृतदेहाशेजारी रक्ताचे डाग आणि युवतीच्या चेहऱ्यावर आणि शरीरावर जखमा आढळून आल्या आहेत. युवतीची हत्या करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

बडनेरा रेल्वे स्थानकाच्या मागील बाजूने असलेल्या वाहनतळाजवळ पाण्याच्या टाकीखाली खोली बांधण्यात आली आहे. या खोलीला लागूनच जमिनीवर अज्ञात युवतीचा मृतदेह आढळून आला. परिसरातील लोकांनी याची माहिती पोलिसांना दिली. घटनेची माहिती मिळताच रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ), सरकारी रेल्वे पोलीस (जीआरपी) आणि बडनेरा पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहचले. मृतदेहाशेजारी त्यांना रक्ताचे डाग आढळून आले आणि युवतीच्या चेहऱ्यावर आणि शरीरावर जखमा असल्याचे दिसून आले. मृतदेहाची ओळख अद्याप पटलेली नाही. या युवतीची हत्या करण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला असून तीनही यंत्रणांनी चौकशी सुरू केली आहे. या युवतीचे वय अंदाजे २२ वर्षे आहे. तिची ओळख पटविण्याचे काम पोलिसांनी सुरू केले आहे. शवविच्छेदनातून इतर बाबींचा उलगडा होऊ शकेल. रेल्वे स्थानक परिसरात रात्रभर वर्दळ असताना ही घटना घडल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# घरकूलच्या लाभार्थ्यांचा मोर्चा

## मतदानावर बहिष्काराचा इशारा



■ महासागर प्रतिनिधी,
सिंदखेडराजा, दि. १५ :

सिंदखेडराजा प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत प्रलंबित असलेला घरकुलांचा चौथा हप्ता त्वरित देण्याच्या मागणीसाठी लाभार्थ्यांच्या वतीने आज, दि. १४ ऑक्टोबर रोजी शहरात मोर्चा काढण्यात आला. यावेळी भीक मांगो आंदोलनही करण्यात आले. शेतकरी नेते कैलास मेहेत्रे यांच्या नेतृत्वात तहसील कार्यालयापासून नगर पालिकेपर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. तसेच भीक मांगो आंदोलन केले.

यावेळी मुख्याधिकारी प्रशांत वटकर यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, स्थानिक नगर पालिकेअंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांनी प्रत्येकी अडीच लाख रुपये अशा अनुदान तत्त्वावर घरकुल पूर्ण केले.

प्रलंबित असलेल्या ७५ हजार रुपयांच्या अनुदानाच्या मागणीसाठी दोन ते तीन वर्षांपासून शासन व प्रशासनाकडे निवेदने, आंदोलने, मोर्चे, उपोषण, अर्जाच्या माध्यमातून पाठपुरावा केला.

मात्र, शासनाने आजपर्यंतही घरकुल अनुदानाच्या चौथ्या हप्त्याचा लाभ दिला नाही. आम्ही आर्थिक, सामाजिक व राजकीय नैराश्यग्रस्त असून शासनाला आमच्या मागण्यांविषयी गांभीर्य नसल्याचे वाटत असल्यामुळे मतदान तरी कशाला करायचे, असे वाटू लागले आहे.

या प्रलंबित अनुदानामुळे आमच्या कुटुंबावर उपासमारीची पाळी आली आहे. आधीच नैसर्गिक आपत्तीने ग्रासलेले असल्याने आम्ही आर्थिक अडचणीत सापडलो आहोत. त्यामुळे घरकुल अनुदानाचे प्रलंबित ७५ हजार रुपये तत्काळ वितरीत करावे, अन्यथा येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदानावर सामूहिक बहिष्कार टाकण्यात येईल, असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# ७ संघातील १४७ धनुर्धर झुंजले

## विभागीय जेतेपदासाठी विजेत्यांचा नांदेड येथील राज्यस्तरीय स्पर्धेत लागणार कस

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १५ :



क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती तसेच अमरावती जिल्हा धनुर्विद्या संघटनेच्या तांत्रिक सहकार्याने नुकत्याच घेण्यात आलेल्या विभागीय धनुर्विद्या स्पर्धेत पाचही जिल्ह्यातील धनुर्धर जेतेपदासाठी झुंजले.

जिल्हा क्रीडा संकुल तपोवन अमरावती येथील खेलो इंडियाच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आर्चरी रेंजवर झालेल्या स्पर्धेत पाचही जिल्ह्यातील १४, १७ व १९ वर्षाखालील वयोगटात झालेल्या या स्पर्धेत इंडियन, कंपाऊंड व रिकर्व्ह या तिन्ही प्रकारांमध्ये खेळाडूंनी एकमेकांना तुल्यबळ लढत दिली. या स्पर्धेत अमरावती विभागातील अमरावती ग्रामीण, अमरावती मनपा, बुलडाणा, यवतमाळ, अकोला ग्रामीण, अकोला मनपा व वाशीम येथील १४७ धनुर्धर सहभागी झाले होते. या स्पर्धेतील विजयी खेळाडू १८ ते २१ ऑक्टोबर या कालावधीत नांदेड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

स्पर्धेचे उदघाटक म्हणून प्रमुख पाहुणे महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रमोद चांदुरकर यांच्या हस्ते व विभागीय क्रीडा उपसंचालक विजय संतान, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, तालुका क्रीडा अधिकारी संजय पांडे, साई प्रशिक्षक प्रवीण शर्मा, भारतीय धनुर्विद्या प्रशिक्षक चंद्रकांत ईगल, राज्य क्रीडा मार्गदर्शक व स्पर्धा मार्गदर्शक प्रफुल्ल डांगे यांच्या उपस्थितीत झाले. तिन्ही धनुर्विद्या प्रकारात स्पर्धेचे पंच म्हणून स्वाती बाळापुरे, गणेश विश्वकर्मा, अमर जाधव, गिरीश कुकडे, अनिल थडकर, स्वप्निल भुयार, पवन तांबट, विकास वानखडे, विलास मारोटकर, शुभम नागे यांनी कामगिरी बघितली.

# उमेदच्या कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यांकरिता दिले पालकमंत्र्यांना निवेदन

**दिग्रस :** उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटनेच्या वतीने मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ व वाशीम जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांना निवेदन देण्यात आले.

उमेद महाराष्ट्राचे ग्रामीण व जीवनोन्नती अभियान महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यभर राबवण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांचा सर्वांगीण विकास होत आहे. या अभियानाच्या माध्यमातून तब्बल तीन हजार अधिकारी व कर्मचारी मागील १० वर्षापासून कंत्राटी स्वरूपाने काम करीत आहेत. सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागील ३ वर्षापासून त्या विविध मागण्या मान्य करण्यासाठी शासन दरबारी वेळोवेळी निवेदन देऊन प्रलंबित मागण्या पूर्ण झाल्या नाही. १० ते १२ जुलै २०२४ दरम्यान आझाद मैदान मुंबई येथे अधिवेशनाचा कालावधीत आंदोलन करण्यात आले.

त्यावेळी मुख्यमंत्री व ग्राम विकास मंत्री यांनी मागणी मान्य करण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले. मात्र तब्बल अडीच महिने उलटूनही मागण्या मान्य मान्य झाल्या नाही. महिलांच्या विविध स्तरावर संस्था स्थापन करून त्या संस्था बळकट करताना महिलांची आर्थिक उन्नती साधून दारिद्य निर्मूलन करण्याचे मोठे काम केल्या जात आहे. या आंदोलनाला अधिकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष यांच्यासह बहुसंख्येने सहकुटुंबांनी सहभाग नोंदवला होता.

उमेद अभियानाच्या माध्यमातून येणाऱ्या काळात विकसित भारत करण्याची संकल्पना सत्यात उतरण्यासाठी उमेद अभियानाला स्वतंत्र कायमस्वरूपी विभाग म्हणून आस्थापनेला मान्यता देऊन सर्व कार्यरत कर्मचारी व अधिकारी यांना शासनाच्या समकक्ष पदावर कायमस्वरूपी सेवेस समाविष्ट करून घेण्याची मागणी उमेदच्या वतीने केल्या जात आहे.

दिग्रस येथे ना.संजय राठोड यांना संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी निवेदन देताना संघटनेच्या अध्यक्षा भाग्यशाली भवरे, सचिव नंदा पवार, कोषाध्यक्ष वैशाली बिडवाई यांच्या नेतृत्वाखाली संघटनेच्या बहुसंख्येने पदाधिकारी व कॅडर उपस्थित होते.

# कोट्यवधींचा धान बोनस घोटाळा

**गडचिरोली** : जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने चालू वर्षात सरसकट हेक्टरी २० हजार रुपये बोनस जाहीर केला होता. यामुळे बोनस वाटपातील अनियमिततेवर आळा बसेल, अशी अपेक्षा होती. परंतु या प्रक्रियेतील अधिकारी आणि खरेदी-विक्री संघातील सदस्यांनी मिळून भूमिहीन व्यक्तींच्या खात्यावर प्रत्येकी ४० हजार रुपये जमा करून ते पैसे परस्पर काही खात्यांवर वळते केल्याची माहिती आहे. यामाध्यमातून एकट्या चामोर्शी तालुक्यात कोट्यावधींचा बोनस घोटाळा करण्यात आला, अशी तक्रार भाजप सहकार आघाडीचे जिल्हाध्यक्ष आशीष पिपरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

गेल्या काही वर्षांपासून धान भरडाई घोटाळा, तांदूळ तस्करी यासारख्या प्रकारामुळे शासनाला कोट्यवधींचा फटका बसत आहे. अशातच आता धान उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या बोनसमध्ये देखील कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप होत आहे. सहकार आघाडीचे जिल्हाध्यक्ष पिपरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या घोटाळ्या संबंधित दस्तऐवज सादर करून चौकशीची मागणी केली आहे. त्यामुळे खरेदी विक्री संघ आणि जिल्हा मार्केटिंग फेडरेशन यांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे.

पिपरे यांनी तक्रारीत केलेल्या दाव्यानुसार, चामोर्शी तालुका खरेदी विक्री संघाने भूमिहीन व्यक्तींच्या नावे शेती दाखवून त्यांच्या खात्यावर प्रत्येकी ४० हजार रुपये जमा केले.

# जिल्हास्तरीय नवोदय परिक्षा मार्गदर्शन शिबिर

■ महासागर प्रतिनिधी,
वर्धा, दि. १५ :



नालंदा एज्युकेशन अँकॅडमी अंतर्गत नवोदय परीक्षा मार्गदर्शन केंद्र वर्धाच्या वतीने नवोदय प्रवेश परीक्षेला बसलेल्या खाजगी अनुदानित शाळा व इंग्रजी कॉन्व्हेन्ट शाळेतील मराठी व इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता पाचवीच्या विद्याथ्यासाठी आयोजित एकदिवसीय जिल्हास्तरीय नवोदय परिक्षा मार्गदर्शन शिबिर न्यु इंग्लिश हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, वर्धा येथे नुकतेच पार पडले.

या शिबिराचे उद्घाटन विद्येची स्फुर्तीनायिका सवित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेला अतिथीच्या हस्ते दीप प्रज्वलित व हार अर्पणाने करण्यात आले.

यावेळी विचार मंचावर प्रमुख अतिथी गटशिक्षणाधिकारी धरमजी कुमरे, प्रा.इंजि.नितेश कांबळे, प्राचार्या अनधा आगवन, मॅनेजर एल. आर. मेश्राम व प्रा. भरत कुमार यांची उपस्थिती होती.या शिबिराला अतिथी मार्गदर्शक डायटचे प्रा.महेंद्र रत्नबोधी,अध्यापक अंकित धोटे व नरेश ढोके यांनी विद्यार्थ्यांना "नवोदय परिक्षा स्वरुप, अभ्यासातील तंत्र - मंत्र आणि सोप्या पद्धती " यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

या शिबिरात वर्धा जिल्ह्यातील 15 शाळांमधील एकंदरीत 100 विध्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमांचे प्रास्ताविक केन्द्र समन्वयक प्रा. भरत कुमार यांनी केले.

या कार्यक्रमाचचे प्रास्ताविक अँड.निधि मेश्राम यांनी केले. संचालन प्रदिप भगत यांनी तर प्रणय नागरे यांनी आभार मानले. शिबिराची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# दारव्हा तालुक्यातील विविध विकास कामांचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते भूमिपूजन

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. १५ :



पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते दारव्हा तालुक्यातील विविध विकास कामे, बांधकामे, भक्त निवास, डिजिटल क्लास रुम, मोकळ्या जागेचे सौंदर्यीकरण अशा कामांचे भूमिपूजन, लोकार्पण सोमवारी झाले. समाजातील सर्वच घटकांना दिलासा देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असल्याचे याप्रसंगी पालकमंत्री म्हणाले.

यावेळी पालकमंत्र्यांसह माजी जि.प. सभापती श्रीधर मोहोड, दारव्हा नगरपालिकेचे मुख्याधिकारी विठ्ठल केदारे उपस्थित होते. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत करण्यात आलेल्या निंभी ते पिंपरी मागाचे लोकार्पण पालकमंत्र्यांनी केले. दारव्हा शहरातील नगर परिषद प्राथमिक शाळा दोनच्या पहिल्या मजल्याचे बांधकाम, नगर परिषद मराठी शाळा दोनमध्ये डिजिटल क्लासरूम तसेच इंटेरीयल वर्क, प्रभाग क्रमांक दहा मधील मोकळ्या जागेचे सौंदर्यीकरण कामाचे लोकार्पण करण्यात आले.

टिळकवाडी ते दिग्रस रोडपर्यंतचे बांधकाम, चावडी हद्दीमध्ये व्यापारी संकूल बांधकामाचे भूमिपूजन पालकमंत्र्यांच्या हस्ते झाले. दारव्हा तालुक्यातीलच प्राथमिक आरोग्य केंद्र, तळेगाव येथील जुनी मुख्य ईमारत निर्लेखन करुन त्याच जागेवर नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य ईमारत बांधकाम व अधिकारी, कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे लोकार्पण, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत प्रमुख जिल्हा मार्ग माहुली ते इरथळ रस्ता भूमिपूजन करण्यात आले.

जगदंबा माता प्रतिष्ठाण डोल्हारी देवी येथे भक्त निवासाचे बांधकाम, संरक्षण भिंतीचे बांधकाम व सौंदर्यीकरण, स्वयंपाकगृह व भोजनगृह बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले.

जवळा, ब्रम्हनाथ, कुऱ्हाड, नांदगव्हाण, राजीवनगर ते राज्य मार्ग २९३ रस्ता, इतर जिल्हा मार्ग १३ या रस्त्याच्या सुधारणा कामाचे भूमिपूजन करण्यात आले.


## Change Of Name

MY OLD NAME WAS **SNEHA ASHOK DOSI.** NOW MY NEW NAME IS **SNEHLATA ASHOK DOSI.**
**ADD :** 201 UTSAV APT SURVEY NAGAR, NAGPUR, 440022

MY OLD NAME WAS **ASMA SAADAT SYED SAADAT ALI.** NOW MY NEW NAME IS **ASMA IMRAN AHMAD.**
**ADD :** PLOT NO. 22, TEACHER COLONY, NEAR EIDGHA GROUND. JAFAR NAGAR, NAGPUR - 440013

MY OLD NAME WAS **SHABINA TABASSUM ZAHIR AHMED.** NOW MY NEW NAME IS **SHABINA TABASSUM.**
**ADD :** PLOT NO 24A NEAR MARKAZ MASJID TEACHER COLONY NAGPUR-MAHARASHTRA 440013

MY OLD NAME WAS **JITENDRA BHAWANI KALYANDAS.** NOW MY NEW NAME IS **JITENDRA KALLUMAL BHAWANI.**
**ADD :** GURUDEV CHAUK SINDEWAHI, TA. SINDEWAHI, SINDEWAHI, CHANDRAPUR, SINDEWAHI, MAHARASHTRA 441222


# नांदुरा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा

## संभाजी ब्रिगेडने केली नांदुरा तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
नांदुरा, दि. १५ :



तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयांची नुकसान भरपाई व सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, अशी मागणी आज १४ ऑक्टोबर रोजी संभाजी ब्रिगेडच्या वतीने एका निवेदनाद्वारे तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री व कृषी मंत्री यांच्याकडे केली आहे.

यंदा नैसर्गिक संकटामुळे शेतकऱ्यांची आर्थिक हानी झाली आहे. तर सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास निसगार्ने हिरावून घेतला आहे. निसगार्चा समतोल ढासळल्यामुळे शेतकरी पार उद्धवस्त झाला आहे. ऐन दसरा दिवाळीत शेतकऱ्यांचे सोयाबीन पूर्णता मातीमोल झाले असून सोयाबीनला कोंब फुटत आहेत. शेतकऱ्यांचा दिवाळीचा आनंद हा दुःखात परावर्तित होऊन शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. बी-बियाणे, फवारणी, खते, मजुरी यांच्या विळख्यात शेतकरी अडकला आहे.

मुलाबाळांचे शिक्षण, सणासुदीत नवीन कपडे घेण्याचे स्वप्न अधुरेच राहिले आहे. त्यामुळे अटी शतीर्चे निकष न लावता तत्काळ शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयांची मदत करुन शेतकऱ्यांची पूर्ण कर्जमाफी करावी, जेणेकरून शेतकऱ्यांना जगण्याची नवी उमेद निर्माण होईल.अन्यथा शेतकऱ्यांना जीवाचे काही बरे वाईट केल्याशिवाय पर्याय उरणार नाही.

तसेच विमा कंपनीने तक्रार करण्यासंबंधी यंत्रणा कार्यान्वित ठेऊन केळी पीक विमा भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी.

अन्यथा संभाजी ब्रिगेडच्या वतीने शेतकऱ्यांसह रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अमर रमेश पाटील, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष पवन सोळंके, नांदुरा तालुकाध्यक्ष दिलीप कोल्हे, संजय पाटील, विजय पाटील, शहर उपाध्यक्ष कुलदीप डंबेलकर, विद्यार्थी आघाडी लोणवाडी शाखाध्यक्ष अभिषेक सोळंके, सौरभ केदार, सोपान डाबेराव, अमोल जुमडे, गौरव नारे, विनायक वाघ, पुरुषोत्तम भातुरकर, शांताराम बेलोकर, ऋषिकेश वसाने, जनुजी काटोले, ज्ञानेश्वर काटोले, मुकुंदा ढोले, संतोष जुणारे, शुभम फासे आदींनी दिला आहे.


MIRAE ASSET
Mutual Fund

In order to impart an insight on mutual fund, to educate and create awareness among the investors about the financial market, Mirae Asset Mutual Fund undertakes numerous events and activities at various places across the country and in number of ways such as conducting Investor Awareness Programs (IAPs) / seminars, contents on investor awareness in print media (newspapers, magazines etc.) and programs on Mutual Funds in electronic media (TVs, radios etc.).

In this regard, please see below schedule of upcoming IAP:

| Date | Time | Address |
|---|---|---|
| October 18, 2024 | 6:30 P.M. | Haldiram's, Shankar Nagar, Nagpur - 440 010. |

**MIRAE ASSET MUTUAL FUND (Investment Manager: Mirae Asset Investment Managers (India) Private Limited.** CIN - U65990MH2019PTC324625)
**Registered & Corporate Office:** 606, 6th Floor, Windsor Building, Off CST Road, Kalina, Santacruz (E), Mumbai - 400098. ☎ 1800 2090 777 (Toll free), ✉ customercare@miraeasset.com www.miraeassetmf.co.in

**Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.**

# महाराष्ट्राचा रणसंग्राम सुरू!

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अखेर जाहीर झाली. राज्यात २० नोव्हेंबरला मतदान होणार असून, २३ नोव्हेंबरला निकाल लागेल. हा राजकीय रणसंग्राम एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे राजकीय भवितव्य ठरवणारा असेल. सोबतच भाजप आक्रसत चाललेला जनाधार कसा वाढवणार, याचा कस लावणाराही असेल. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे पक्ष फुटले. त्यामुळे त्यांनी लोकसभेत आपला करिष्मा दाखवलाच. ते आता काय करतील, याची उत्सुकता महाराष्ट्रासह देशाला असेल. काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे, वंचित बहुजन आघाडीचा प्रयोग करणारे प्रकाश आंबेडकर या साऱ्यांसाठीही कशी असेल २०२४ ची महाराष्ट्र विधानसभा निवडणूक?

----------------

भाजप-शिवसेनेची 2019 मध्ये युती होती. भाजपने गेल्या वेळच्या विधानसभा निवडणुकीत 105 आणि शिवसेनेने 56 जागा जिंकल्या होत्या. तर आघाडीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला 54 आणि काँग्रेसला 44 जागा मिळाल्या होत्या. भाजप आणि शिवसेनेचे सरकार सत्तेत येणार होते. मात्र, युतीमध्ये मतभेद झाले. त्यामुळे भाजप आणि शिवसेनेची युती तुटली. त्यानंतर 23 नोव्हेंबर 2019 रोजी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची, तर अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. सकाळी-सकाळी झालेला या शपथविधीने एक राजकीय भूकंप झाला. पहाटेचा शपथविधी म्हणून तो प्रसिद्ध झाला. मात्र, बहुमत सिद्ध करण्यापूर्वीच देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी 26 नोव्हेंबर 2019 रोजी पदाचा राजीनामा दिला.

28 नोव्हेंबर 2019 रोजी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या महाविकास आघाडीने सत्ता स्थापन केली. त्यानंतर शिवसेनेमध्ये एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवारांनी बंड केले. त्यामुळे दोन्ही पक्ष फुटले. त्यांची संख्या चार झाली. लोकसभा निवडणुकीत शरद पवार आणि उद्धव ठाकरेंनी आपला करिष्मा दाखवला. या साऱ्या पार्श्वभूमी होणारी ही विधानसभा निवडणूक देशभरात चर्चेत राहणारी असेल.

**भाजपसमोर कळीचे मुद्दे**

भाजपने 2019 च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत 105 जिंकल्या होत्या, तर 2014 च्या विधानसभा निवडणुकीत 122 जागा पटकावल्या होत्या. या विजयाच्या जोरावर पक्षाने आपला माणूस मुख्यमंत्री म्हणून बसवला.

मात्र, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फोडाफोडी केल्यानंतर महाराष्ट्रात भाजपला लोकसभा निवडणूक अत्यंत खडतर गेली. त्यात मराठा आणि धनगर आरक्षणाच्या मागणीसाठी टोकाची ताणली गेलेली आंदोलने. मनोज जरांगे यांचे देवेंद्र फडणीस यांना दिलेले उघड आव्हान, हे सारे पाहता पक्षाला जास्तीत जास्त जागा निवडून आणणे मोठे चॅलेंज असेल.

आरक्षणाच्या मागणीमुळे दूर गेलेला मराठा समाज आणि मराठा आरक्षणाच्या मागणीमुळे ओबीसीमध्ये सुरू असलेली चलबिचल. हे पाहता या व्होटबँकेला भाजप कसे आपलेसे करणार, हे पाहावे लागेल.


नरेंद्र मोदी


राहुल गांधी


शरद पवार


देवेंद्र फडणवीस


उद्धव ठाकरे


राज ठाकरे


एकनाथ शिंदे


अजित पवार


नाना पटोले


प्रकाश आंबेडकर


संभाजी राजे


मनोज जरांगे

**शिंदेंचे खरे शक्तिपरीक्षण**

उद्धव ठाकरे यांच्या सरकारमध्ये कॅबिनेट मंत्रिपद भूषवून आणि अचानक अख्खा पक्ष सोबत घेऊन भाजपशी घरोबा करणारे एकनाथ शिंदे यांची राजकीय कारकीर्द ठरवणारी ही निवडणूक असेल.

शिंदे यांनी लोकसभा निवडणुकीत 7 जागा जिंकल्या. महायुतीमध्ये आमचा स्ट्राइक रेट जास्त, अशी शेखीही त्यांनी मिरवली. मात्र, त्यांचे खरे शक्तिपरीक्षण विधानसभा निवडणुकीच्या निकालातून होईल. सोबतच त्यांना पुन्हा मुख्यमंत्रीपद मिळेल की नाही, याचा सुद्धा निकाल ही निवडणूक लावेल.

एकनाथ शिंदे यांनी भाजपची मध्य प्रदेशातल्या लाडकी बहीण योजनेची महाराष्ट्रात धडाकेबाज अंमलबजावणी केली. या योजनेचे लाभार्थी जास्तीत जास्त जण कसे होतील हे पाहिले. त्यासाठी योजनेच्या लाभासाठी अटी अतिशय सैल राहतील, अशी सोय केली. खरी शिवसेना आमचीच हे निवडणूक आयोगाच्या दरबारी सिद्ध केले. मात्र, त्यांचे पुढे काय होणार, हेच या निवडणुकीचा निकाल सांगेल.

**ठाकरे काय कमावणार?**

उद्धव ठाकरे यांच्याकडे गमावण्यासारखे आता काहीच राहिलेले नाही. एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडामुळे त्यांना स्वतःच्या वडिलांनी स्थापन केलेला पक्ष, चिन्ह आणि आतापर्यंत साथीला राहिलेले आमदार सारेच गंगार्पण करावे लागले.

आता जे काही होईल ती त्यांची प्रगतीच असेल. त्यांची खऱ्या अर्थाने शून्यातून वाटचाल सुरू झाल्याचे म्हणावे लागेल. यात त्यांना अपेक्षेप्रमाणे यश मिळताना दिसते. काहीही नसताना लोकसभेत त्यांनी 9 खासदार निवडून आणले, हे त्याचेच द्योतक.

अभ्यासू तरुण तडफदार आदित्य ठाकरे यांचे नेतृत्व आणि वक्तृत्व या काळात चांगलेच तळपले. येणारा काळ ही त्यांच्या प्रगतीसाठी खूप अनुकुल असल्याचे म्हणावे लागेल. विशेषतः विधानसभा निवडणुकीनंतर महापालिका निवडणुका होतील. त्यात मुंबई महापालिकेवर विजय मिळवण्यासाठी सारेच पक्ष आकाश-पाताळ एक करतील. त्यामुळे ठाकरेंची जादू कशी चालते हे पाहणे उत्सुकतेचे असेल.

**(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)**

# मुंबईत दाऊदची जागा लॉरेन्स घेणार का?





**उत्तरार्ध**



मुंबईचे माजी पोलिस आयुक्त एमएन सिंह म्हणतात, 'एनआयएने काही दिवसांपूर्वी लॉरेन्स बिश्नोई, गोल्डी ब्रार यांच्यासह अनेक गुंडांच्या विरोधात गँगस्टर टेरर प्रकरणात आरोपपत्र दाखल केले होते.

यामध्ये लॉरेन्स बिश्नोई टोळीची तुलना दाऊद इब्राहिम टोळीशी करण्यात आली होती. लॉरेन्स बिश्नोई दाऊद इब्राहिमच्या पावलावर पाऊल ठेवत असल्याचे या आरोपपत्रात म्हटले आहे.

माजी पोलिस आयुक्त पुढे म्हणाले, 'दाऊद इब्राहिमने अंमली पदार्थांची तस्करी, टार्गेट किलिंग आणि खंडणी रॅकेटद्वारे आपले साम्राज्य निर्माण केले. त्यानंतर त्यांनी डी कंपनी स्थापन केली. त्याचप्रमाणे लॉरेन्सलाही स्वतःचे साम्राज्य उभे करायचे आहे. दाऊदने ज्या प्रकारे 1993 मध्ये पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयच्या मदतीने बॉम्बस्फोट घडवून आणले, लॉरेन्सही तेच करत आहे.

'भारतातून पळून गेल्यानंतर दाऊदने पाकिस्तान, दुबई आणि मध्य पूर्व देशांमध्ये आपले नेटवर्क तयार केले. बिश्नोईचा व्यवसाय कॅनडा, अमेरिका, दुबई आणि पाकिस्तानमध्ये पसरला आहे.

'दाऊद इब्राहिमने छोटा राजनच्या मदतीने टोळीचा विस्तार केला. त्याचप्रमाणे लॉरेन्स बिश्नोईसह गोल्डी ब्रार, सचिन बिश्नोई, अनमोल बिश्नोई, विक्रम ब्रार, कला जथेडी, कला राणा यांनी टोळीचे जाळे 12 राज्यांमध्ये विस्तारले. बाबा सिद्दिकी यांना लक्ष्य करून लॉरेन्स बिश्नोई टोळीला देशाच्या आर्थिक राजधानीत खंडणीचे जाळे आणखी विस्तारायचे आहे.

लॉरेन्सने साबरमती कारागृहातून १० ते १२ वेळा फोन केल्याचे सबळ पुरावे गुजरात पोलिसांकडे आहेत. त्याचा कॉल इंटरसेप्ट केल्यावर त्याने चार वेळा सलमान किंवा भाईजानचे नाव वापरल्याचेही समोर आले. बाबांची हत्या करून लॉरेन्सला दाऊदप्रमाणे मुंबईतील नवीन अंडरवर्ल्ड डॉन बनायचे आहे, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. अशाप्रकारे दाऊद इब्राहिमने ९० च्या दशकात आपली उंची वाढवली.

काही दिवसांपूर्वी दाखल झालेल्या एनआयएच्या अहवालात लॉरेन्स बिश्नोईला तुरुंगातून मोठा गुन्हा करणे सोपे असल्याचे लिहिले आहे. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे सिद्धू मूसेवाला खून प्रकरण. त्यावेळी टोळीतील ६ सदस्य कारागृहात होते.

लॉरेन्स बिश्नोई आणि जग्गू भगवानपुरिया तिहार तुरुंगात, मनप्रीत उर्फ मन्ना फिरोजपूर तुरुंगात, सराज सिंह उर्फ मंटू भटिंडा विशेष तुरुंगात आणि मनमोहन सिंग उर्फ मोहना मनसा तुरुंगात होते. हे सर्वजण गोल्डी ब्रारच्या संपर्कात होते. सिद्धू मूसेवाला यांच्या कमी झालेल्या सुरक्षेची माहिती मिळताच त्यांनी सिद्धू मूसेवाला यांना मारण्यासाठी तुरुंगातूनच शूटर पाठवले.

'मुंबईत दाऊदची टोळी जवळपास नष्ट झाली आहे. खंडणी, टार्गेट किलिंग आणि तस्करी यासारखे गुन्हेही आता जवळपास संपले आहेत. अशा स्थितीत बिष्णोई टोळीसाठी हे मोकळे मैदान आहे.

'आता तो अशा घटना घडवून इथे आपले जाळे वाढवणार आहे. सलमान खान तसेच त्याच्या आजूबाजूच्या लोकांना घाबरवणे हे त्याचे लक्ष्य आहे. लॉरेन्सला बड्या नावांना टार्गेट करून मोठी दहशत निर्माण करायची आहे. दाऊदची टोळी कमकुवत झाल्याने मुंबईत सहज पाय रोवू शकते.

मात्र, ९० च्या दशकात आणि आताच्या काळात बराच फरक झाल्याचेही या अधिकाऱ्याने सांगितले. मुंबई पोलिस आता खूप शक्तिशाली झाले आहेत. अशा एक-दोन घटना करून ते दाऊदसारखे नेटवर्क कधीच प्रस्थापित करू शकत नाहीत.

बाबा सिद्दिकी यांच्या हत्येनंतर शुभू लोणकर नावाच्या व्यक्तीने सोशल मीडिया हँडल फेसबुकवर एक पोस्ट शेअर केली होती. सलमान खान आणि दाऊदला मदत करणाऱ्यांना सोडले जाणार नाही, असे त्यात म्हटले आहे. या पोस्टचा तपास मुंबई गुन्हे शाखा करत आहे. आमच्या कोणत्याही भावाला कोणी मारले तर आम्ही नक्कीच प्रतिक्रिया देऊ, असे धमकीवजा शब्दात पोस्टमध्ये म्हटले आहे. आम्ही कधीच पहिला वार केला नाही. या पोस्टच्या शेवटी, लॉरेन्स बिश्नोई ग्रुप, अनमोल बिश्नोई यांचे हॅशटॅग देखील वापरण्यात आले आहेत.

शुभम लोणकर नावाच्या व्यक्तीने फेसबुकवर एक पोस्ट शेअर करून बाबा सिद्दिकी यांच्या हत्येची जबाबदारी घेतली आहे.

बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणात मुंबई गुन्हे शाखेने आतापर्यंत ३ आरोपींना अटक केली आहे. ३ आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. हरियाणातील गुरमेल, यूपीचा धर्मराज आणि पुण्यातून अटक करण्यात आलेल्या प्रवीण लोनकर यांचा समावेश आहे. प्रवीण हा शुभम लोनकरचा भाऊ असून त्याने हत्येची जबाबदारी स्वीकारत पोस्ट केली होती.

तीन आरोपींशिवाय यूपीचा शिव, पंजाबचा झिशान अख्तर आणि शुभम लोनकर यांचा शोध सुरू आहे. मुंबई न्यायालयाने गुरमेलला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. धर्मराजने स्वतःला अल्पवयीन असल्याचे सांगितले असून, त्याची चौकशी सुरू आहे.

बाबा सिद्दिकी : वांद्रे येथून राजकारणाची सुरुवात, तीन वेळा आमदार आणि मंत्री होते तीन वेळा आमदार राहिलेले बाबा सिद्दिकी हे महाराष्ट्रातील काँग्रेसचा मोठा चेहरा आहेत. अनेक मोठ्या आंदोलनातही त्यांचा सहभाग राहिला आहे. फेब्रुवारी 2024 मध्ये त्यांनी अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. बाबांचा मुलगा झिशान सिद्दीकी वांद्रे पूर्वेचा आमदार आहे.

एकेकाळी सुनील दत्त यांच्या अत्यंत जवळच्या बाबांनी 2004 ते 2008 या काळात महाराष्ट्राच्या अन्न व नागरी पुरवठा मंत्रीपदाची जबाबदारीही सांभाळली होती. रमजानमध्ये त्यांच्या इफ्तार पार्ट्या प्रसिद्ध आहेत. बॉलिवूड सेलिब्रिटींनीही हजेरी लावली होती.

बाबा सिद्दिकी हे रिअल इस्टेट व्यवसायाशीही संबंधित होते. मुंबईतील दोन झोपडपट्ट्यांच्या विकासाचे कंत्राट त्यांच्याकडे होते. त्याचा मुलगा झीशान याच्याही नावावर काही रिअल इस्टेट कंपन्या, रेस्टॉरंट आणि मालमत्ता आहेत.

# हात केव्हा केव्हा आणि का धुवावे?

**(आंतरराष्ट्रीय हात धुवा दिन विशेष)**

माणसाला जगण्यासाठी अन्नाची गरज असते. बहुतांश वेळेला माणूस आपल्या हाताने अन्नाचे सेवन करतो. अशावेळी हात स्वच्छ नसतील तर माणूस स्वतःच अनेक आजारांना निमंत्रण देत असतो. अन्न खाण्यापूर्वी आपण हात स्वच्छ धुतले नाही तर हेच जिवाणू आपल्या पोटात जातात. आपण आजारी पडतो. यावरून आपल्या लक्षात येते, की हात धुणे ही मानवी जीवनातील अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. युनिसेफने विविध गरीब आणि विकसनशील देशात यावर काम करण्यास सुरुवात केली. सन २००८ साली स्वीडनमधील स्टॉकहोम येथे पहिला जागतिक जल सप्ताह आयोजित करण्यात आला होता. याच ठिकाणी संयुक्त राष्ट्र महासभेने १५ ऑक्टोबर रोजी जागतिक हात धुवा दिन साजरा करण्याचे ठरवले. सन २००८ साली साजऱ्या झालेल्या या पहिल्या जागतिक हात धुवा दिनामध्ये जगभरातील ७० पेक्षा जास्त देश सहभागी झाले होते. सुमारे दोनशे दशलक्ष लोकांनी या दिवशी साबणाने हात धुतले.

----------------

कोरोनाची साथ पसरत असताना याला प्रतिबंध घालण्यासाठी जागतिक आरोग्य संघटना आणि सरकारी आरोग्य विभागाकडून मुख्य उपाय सांगितला जात आहे. तो म्हणजे वारंवार हात धुवा, तेही शास्त्रशुद्ध पद्धतीने. हात धुण्याबाबत काही महत्वाच्या गोष्टी जागतिक सर्वेक्षणातून लक्षात आल्या आहेत. रिस्क ॲनॅलिसिस या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या नियत कालिकाच्या दि.२३ डिसेंबर २०१९च्या अंकात त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यानुसार ३० टक्के व्यक्ती शौचास जाऊन आल्यावर अजिबात हात धुत नाहीत.

ज्या ७० टक्के व्यक्ती हात धुतात, त्यातले निम्मे लोक केवळ पाण्याने हात ओले करतात आणि पुसतात. केवळ २ टक्के व्यक्तीच शास्त्रशुध्द पद्धतीने हात धुतात. त्यामुळे जागतिक आरोग्य संघटना व युनिसेफ जगभरात हात कसे धुवावेत, याचे प्रशिक्षण शालेय विद्यार्थ्यांना देण्यावर भर देत आहेत.

या बाबतच्या जनजागृतीसाठी दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी जागतिक हात धुवा दिवस साजरा केला जातो. सुरुवातीला केवळ विद्यार्थ्यांपर्यंत मर्यादित असणाऱ्या या विषयाला कोविड-१९ मुळे एवढे महत्व आले, कि आता जीव वाचवण्यासाठी हात धुवा, असे म्हणण्याची वेळ जागतिक आरोग्य संघटनेवर आली आहे. या माहिती अधिकार कायद्याचा दुरुपयोग करणाऱ्यांची तक्रार करावी.

अंगणवाडी व शाळेतील लहान मुलांमध्ये हात धुण्याचे संस्कार रुजविण्यासाठी गावातील अंगणवाडीताई व आशा वर्कर यांनी गीताच्या माध्यमातून मुलांमध्ये हात धुण्याच्या प्रक्रियेत एक गोडी निर्माण केली पाहिजे. सकाळी प्रार्थनेच्या वेळी लहान मुले हे गीत गाऊन स्टेप बाय स्टेप सामुहिक हात धुण्याचा उपक्रम घेतील. तेव्हा घराघरात हात धुण्याचा संदेश पोहोचवावा. हात धुण्याची महत्वाची कृती ही कायम व्यवस्थित व्हावी.


हात कधी धुवावे? स्वयंपाकापूर्वी, जेवण्यापूर्वी व जेवल्यावरसुद्धा, कोणत्याही आजारी व्यक्तीला भेटण्यापूर्वी, त्यांना स्पर्श करण्यापूर्वी व नंतरही, कुठल्याही जखमेला हात लावण्यापूर्वी आणि नंतरही, शौचाला व लघुशंकेला जाऊन आल्यानंतर, लहान बाळाची शी धुतल्यानंतर, बाळाचे डायपर, लंगोट बदलल्यानंतर, नाक शिंकरल्यावर, शिंक आल्यानंतर, प्राण्यांना खाऊ घातल्यावर, त्यांची विष्ठा साफ केल्यावर, प्राण्यांना कुरवाळल्यावर किंवा हाताळल्यानंतर. घर झाडून-पुसून घेतल्यावर, कचरा टाकल्यानंतर किमान चाळीस सेकंद हात साबणाने स्वच्छ धुवावे.

हातांची नियमित स्वच्छता राखल्यास कोरोना किंवा इतर संसर्गजन्य रोग पसरणारच नाहीत का? अशी शंका अनेकांच्या मनात असेल. खरेतर कुठल्याही रोगाचा १०० टक्के प्रतिबंध शक्य नाही. परंतु काही मूलभूत स्वच्छता पाळल्यास रोगाचा प्रसार नक्की रोखला जातो. म्हणूनच सामाजिक व वैयक्तिक आरोग्याच्या दृष्टीकोणातून हातांची स्वच्छता हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. व्यवस्थित हात धुण्याची सवय ही खरे तर कायमस्वरूपीच हवी. परंतु तसे होत नसल्याने दरवर्षी १५ ऑक्टोबर हा जागतिक हात धुवा दिवस म्हणून पाळला जातो. जागतिक आरोग्य संघटना, युनिसेफ व स्वच्छ भारत अभियान याबाबत मोठ्या प्रमाणात जाणीव जागृती करीत आहेत. हात धुण्याची सवय लोकांच्या अंगवळणी पडावी, हाच हेतू आहे.

इ.स.१८४०मध्ये डॉ. ईगनाज, सेमेलवाईस यांनी हात धुण्याचा महत्वाचा शोध लावला. युरोपमध्ये एका शैक्षणीक इस्पितळात ते डॉक्टर होते. दवाखाण्यात बाळंतपणासाठी येणाऱ्या महिलांचा मोठ्या प्रमाणात मृत्यू होत असे. एका प्रयोगामध्ये त्यांनी सर्व वैद्यकीय विद्यार्थ्यांना व इतर डॉक्टरांना गरोदरमातेस हात लावण्यापूर्वी स्वच्छ हात धुण्यास सांगितले.

केवळ या हात धुण्यामुळे प्रसूती विभागातील मृत्यू जवळजवळ ५० टक्क्यांनी कमी झाले. अशा रितीने हात धुण्याचा महत्वाचा शोध लागला. जे लोक नियमित हात स्वच्छ ठेवतात, त्यांचे आरोग्य नेहमीच चांगले राहते. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्यामुळे घराघरात हात धुण्याचा व स्वच्छतेचा संदेश देण्यात येत आहे. स्वच्छतेच्या सवयी शाळेतून लागाव्यात यासाठी मुलां-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय करण्यात आली आहे. ते स्वच्छ व वापरात राहण्यासाठी शाळेसह गावकऱ्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. हात धुण्यासाठी शाळा व गावपातळीवर मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात यावी.

सुरुवातीला पाण्याने हात ओले करावे, नंतर हाताला साबण लावावी, हाताचे तळवे एकमेकांवर घासावे, बोटे एकमेकांत अडकवून ती एकमेकांवर घासावी, उजव्या हाताच्या बोटांची टोके डाव्या हाताच्या तळव्यावर गोल फिरवून घासावी आणि त्यानंतर तीच क्रिया दुसऱ्या हाताने करावी म्हणजे नखे स्वच्छ होतील, पाणी वापरून हात खळवळून घ्यावेत. या पाच टप्प्याद्वारे हाताची स्वच्छता करणे गरजेचे आहे. याचे प्रात्यक्षिक प्रत्येक शाळेतून दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी करण्यात आले पाहिजेत. जेणेकरून स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण होवून आरोग्य चांगले राहील.



**कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

# अन्नाची नासाडी : सामाजिक गुन्हा

१६ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक अन्न दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरात विविध दिन उत्साहात साजरे केले जातात. त्यापैकी अन्न दिन महत्वाचा मानावा लागेल, कारण त्याचा थेट मानवी जीवनाच्या आस्तित्वाशी संबंध आहे. अन्न सुरक्षेबाबतची एकंदर परिस्थिती पाहता अन्न दिनाबाबत जागरूकता वाढीस लागण्याची गरज आहे. परंतु आजही आपण अन्न सुरक्षेबाबत आणि अन्नाच्या नासाडी बाबत गंभीर नाहीत असेच म्हणावे लागेल.

----------------------

अन्न हे पूर्णब्रह्म आहे अशी आपली संस्कृती सांगते पण ही संस्कृती आपण विसरत चाललो आहे की काय असा प्रश्न पडावा असा एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे.

संयुक्त राष्ट्रे पर्यावरण कार्यक्रम आणि भागीदार संस्था डब्ल्यूआरएपी चा अहवालानुसार आपल्या देशात दरवर्षी ६८ दशलक्ष टन धान्याची नासाडी केली जाते. यातील ६१ टक्के अन्न घरातून, २६ टक्के अन्न सेवांमधून तर १३ टक्के अन्न किरकोळ क्षेत्रात वाया जाते. भारतासारख्या कृषिप्रधान देशात इतक्या मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाणे ही भूषणावह बाब नाही.

भारतासारख्या विकसनशील देशात जिथे दररोज साठ टक्के लोक उपाशी किंवा अर्धपोटी झोपतात तिथे अन्नाची अशी नासाडी परवडणारी नाही. वाया जाणारे हे अन्न जर गोरगरिबांच्या, भुकेल्यांच्या मुखात पडले तर देशात कोणीही उपाशी झोपणार नाही पण आपल्याला आपल्या संस्कृतीचा विसर पडत चालला आहे.

आपल्याला हवे तेवढेच अन्न पानात काढून घ्यायचे आणि तेवढेच खायचे अशी आपली परंपरा आहे. खाऊन माजावे पण फेकून माजू नये अशी आपली आजी सांगायची हेही आपण विसरून गेलो आहोत. पाश्चात्य देशात हॉटेलातही पानातले अन्न टाकणे हा सामाजिक गुन्हा मानला जातो. भुकेने व्याकुळ झालेल्या लोकांची आठवणही अन्न टाकून देणाऱ्या या सोकावलेल्या श्रीमंतांना येत नाही. अन्नाची नासाडी हा सामाजिक गुन्हा आहे याचे भान अन्न टाकून देणाऱ्या श्रीमंतांना राहिले नाही.

पोटातील भुकेची आग भागवण्यासाठी देशातील कोट्यवधी लोक भीक मागतात. आदिवासी, दुर्गम भागात आजही लाखो लोक पुरेसे अन्न मिळत नाही म्हणून कुपोषित आहेत तर दुसरीकडे दररोज लाखो टन अन्न फेकून दिले जाते ही विसंगती बदलायला हवी. वाया जाणारे हे अन्न गोरगरिबांच्या मुखात पडेल अशी व्यवस्था असायला हवी.

हैदराबाद, चेन्नई, दिल्ली, कोलकाता, मुंबई, बंगळुरु यासारख्या मोठ्या शहरात हॉटेल, रेस्टॉरंट, घरात उरलेले अन्न गरिबांना मिळावे यासाठी कम्युनिटी किचन ही संकल्पना अमलात आणली गेली. या संकल्पनेनुसार शहरातल्या विविध भागातल्या रस्त्यावरच्या कम्युनिटी किचन च्या केंद्रातल्या मोठ्या फ्रीजमध्ये उरलेले अन्न ठेवले जाते. भुलेल्यांनी ते काढून घ्यावे अशी सुविधा या केंद्रात आहे पण ही संकल्पना शहरातील मोठ्या शहरातच आहे, ती ही व्यापक नाही. कम्युनिटी किचन सारखी संकल्पना प्रत्येक शहरात व्यापक स्वरूपात राबवायला हवी म्हणजे वाया जाणारे अन्न भुलेल्यांच्या मुखात जाईल आणि अन्नाची नासाडीही थांबेल.

--------------

**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**




# रोज एक सफरचंद खा...

नोव्हेंबर 2020 मध्ये नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार सफरचंदाचा रस पिण्यापेक्षा संपूर्ण सफरचंद खाल्ल्याने पोट लवकर भरते. संपूर्ण सफरचंद खाल्ल्याने लठ्ठपणा कमी होतो.

**हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर**

दररोज एक सफरचंद नियमितपणे खाल्ल्यास हृदयविकाराचा धोका कमी होतो. दररोज 100-150 ग्रॅम सफरचंद खाल्ल्याने उच्च रक्तदाबाचा धोका कमी होतो आणि कठीण रोगांचा धोका कमी होतो. यामागचे एक मोठे कारण म्हणजे सफरचंदात विद्राव्य फायबर असते. दुसरे मोठे कारण म्हणजे त्यात पॉलिफेनॉल असतात.

**मधुमेहाचा धोका कमी होतो**

सफरचंद नियमित खाल्ल्याने टाइप-2 मधुमेहाचा धोकाही कमी होतो. दररोज सफरचंद किंवा नाशपाती खाल्ल्याने टाइप-2 मधुमेहाचा धोका 18% कमी होतो. जर तुम्ही आठवड्यातून एकदा सफरचंद किंवा नाशपाती खाल्ल्यास हा धोका केवळ 3% कमी होऊ शकतो. सफरचंद आणि नाशपातीमध्ये असलेल्या पॉलिफेनॉल क्वेर्सेटिनच्या उच्च प्रमाणामुळे हे शक्य आहे.

**आतड्याचे आरोग्य सुधारते**

सफरचंदात पेक्टिन असते. हा एक प्रकारचा फायबर आहे, जो आपल्या पोटाच्या मायक्रोबायोममध्ये प्रीबायोटिक म्हणून काम करतो. हे आतड्यात उपस्थित असलेल्या दोन प्रकारच्या निरोगी बॅक्टेरिया, बॅक्टेरॉइडेट्स आणि फर्मिक्युट्सचे गुणोत्तर सुधारते. यामुळे आतड्याचे आरोग्य सुधारते.

आतड्यात चांगले बॅक्टेरिया वाढले तर एकंदरीत आरोग्य चांगले राहते.

**कर्करोगाचा धोका टाळतो**

सफरचंदांमध्ये शक्तिशाली अँटिऑक्सिडेंट पॉलीफेनॉल असतात. त्यामुळे फुफ्फुस, स्तन आणि पचनसंस्थेच्या कर्करोगासह अनेक प्रकारच्या कर्करोगांवर सफरचंद फायदेशीर आहे. तसेच कर्करोगाच्या पेशी वाढण्यापासून रोखतात. कर्करोगाने ग्रस्त असलेल्या लोकांनी सफरचंद नियमितपणे खाल्ले तर ते जास्त काळ जगतात.

**दमा रोखू शकतो**

सफरचंदांमध्ये क्वेर्सेटिन हे अँटीऑक्सिडंट आहे. हे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनमध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासानुसार, क्वेर्सेटिन दमा आणि सायनुसायटिस सारख्या ॲलर्जीक दाहक रोगांशी लढण्यासाठी प्रभावी ठरू शकते. सफरचंदात असलेले अँटी-ऑक्सिडंट्स आपल्या मेंदूला ऑक्सिडेटिव्ह तणावामुळे होणाऱ्या नुकसानापासून वाचवू शकतात.

**मानसिक आरोग्य सुधारते**

सफरचंद रोज खाल्ल्याने तुमचे मानसिक आरोग्य सुधारते. सफरचंदात अँटिऑक्सिडंटची उपस्थिती हे याचे मुख्य कारण मानले जाते. यामुळे ऑक्सिडेटिव्ह ताण कमी होतो आणि मेंदू लवकर म्हातारा होत नाही, म्हणजेच त्याचे कार्य चांगले राहते.

## अशोकायन

### भ्रमनिरास

**पेट्रोल वाढले डिझेल वाढले**
**वाढले गॅसचेही दर**
**सर्वसामान्य माणसाला**
**हे पेलणार कुठवर?**

**सोयाबीन येता घरी**
**बाजारभाव कोसळले**
**दुप्पट भाव देणाऱ्यांनी**
**विरोधी धोरण अंगीकारले**

**तुप गेलं तेलही गेलं**
**हती रिकामं धुपाटणं आलं**
**सांगा जीवन जगणं**
**काय सोपं राहीलं?**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, ११३ बालकांवर झाले मोफत उपचार

# सहा महिन्यात ३५ मुलांवर हृदय शस्त्रक्रिया





■ महासागर प्रतिनिधी,
अकोला दि. १५ :
केंद्र आणि राज्य शासनाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत १ एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्यांत जिल्ह्यात ११३ बालकांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. यात ३५ बालकांवर हृदय शस्त्रक्रिया तर बालकांवर इतर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. लहान मुलांमध्ये जन्मजात विकृती, हृदय, किडनीशी संबंधित गुंतागुंतीच्या आजारांवरील शस्त्रक्रियांचा यात समावेश आहे. लहान बालकांमध्ये वाढती हृदयाची समस्या चांगलीच अडचणीची ठरत आहे. जन्मानंतर काही लहान मुलांमध्ये एएसडी, व्हीएसडी आणि पीडीए हे हृदयाशी संबंधित आजार आढळून येतात, ज्याला हृदयातील छिद्र' असेही संबोधित केले जाते. यावर शस्त्रक्रिया करण्यासाठी बराच खर्च लागतो. मात्र, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत शून्य ते १८ वर्षांपर्यंतच्या बालके आणि मुलांवर आवश्यक सर्वच मोठ्या शस्त्रक्रिया मोफत केल्या जातात. मागील ६ महिन्यांत ३५ बालकांवर हृदय शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. जिल्ह्यातील लहान मुलांच्या हृदयविकाराची वाढती संख्या चिंताजनक ठरत आहे. विविध नामांकित रुग्णालयात होतात मोफत शस्त्रक्रिया राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम योजनेमार्फत मागील वर्षी हृदय शस्त्रक्रिया केल्या. तर १ एप्रिल ते सप्टेंबर २०२४ या सहा महिन्यांत हृदय शस्त्रक्रिया तर ९८ इतर आजारांवरील शस्त्रक्रिया झाल्या. अमरावती सुपर स्पेशालिटी, अकोला जीएमसी, आचार्य विनोबा भावे रुग्णालय सावंगी, सारक्षी नेत्रालय, नागपूर, मुंबई आदी ठिकाणच्या सुपरस्पेशालिटी रुग्णालयात महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून या मोफत शस्त्रक्रिया केल्या. चक्कर येणे, अशक्तपणा लहान मुलांमधील हृदयविकाराचे लक्षण लहान मुलांच्या हृदयविकाराच्या लक्षणांमध्ये चक्कर येणे, थकवा येणे, मूर्च्छा येणे आणि अशक्तपणा यांचा समावेश होतो. तर सतत ताप येणे, भूक न लागणे, जेवताना थकवा येतो, घाम येतो, रडत असताना गुदमरणे ही लक्षणे हृदयात छिद्र असण्याची असू शकतात. लक्षणे दिसताच डॉक्टरांना दाखवून उपचार घ्यावा. गरजू रुग्णांनी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत या मोफत शस्त्रक्रिया योजनेचा लाभ घ्यावा. –डॉ. तरंगतुषार वारे, जिल्हा शल्य चिकित्सक.



# डॉ. आनंदीबाई जोशी यांचे मुलींच्या आयटीआयला नाव

खा. अनुप धोत्रे यांच्या हस्ते फलकाचे अनावरण

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला दि. १५ :
महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे नुकत्याच घोषित झालेल्या अधिसूचनेनुसार येथील शासकीय (मुलींच्या) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे डॉ. आनंदीबाई जोशी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (महिला) अकोला' असे नामकरण करण्यात आले. खा. अनुप धोत्रे यांच्या हस्ते नामकरण फलकाचे अनावरण झाले. या प्रसंगी अनुप धोत्रे यांनी नंदीबाई यांचे कार्य समस्त महिला आणि सर्व समाजाकरिता प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन केले. संस्थेचे प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी शरदचंद्र ठोकरे यांनी प्रास्ताविकात आनंदीबाई जोशी यांच्या कार्याची माहिती वर्णन केली. तथा त्यांच्या ऐतिहासिक कार्याचा जीवनपट मांडला. या वेळी प्रमुख अतिथी म्हणून आयटीआयचे प्राचार्य सुनील घोंगडे, बाळापूरचे राजेश धोत्रे, शिल्प निदेशक प्रशांत बोकाडे, मुख्य लिपिक जयंत गणोजे उपस्थित होते. सूत्रसंचालन शुभांगी गोपनारायण यांनी केले. पंकज नागे यांनी आभार मानले.

# एक लाख नेत्र शस्त्रक्रियेची परंपरा सुरु ठेवणार

डॉ. भागवत भुसारी यांचे आश्वासन ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त शिबिर



■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा दि. १५ : डॉ. वसंतराव चिंचोले यांनी संपूर्ण जिल्ह्यात नेत्र शिबिराची संकल्पना राबवली. त्यांनी एक लाख नेत्र शस्त्रक्रिया करून जागतिक किर्ती मिळवली. त्यांचा हाच आदर्श व परंपरा आम्ही देखील सुरू ठेवणार, असे प्रतिपादन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.भागवत भुसारी यांनी केले. तर रुग्णसेवा हिच ईश्वर सेवा असल्याचे डॉ. शोन चिंचोले यांनी सांगितले जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन सप्ताहानिमित्त डॉ. चिंचोले नेत्र रुग्णालय व लेझर सेंटर, बुलडाणा येथे एक नेत्र व दंत तपासणी व आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. हे शिबिर डॉ.चिंचोले नेत्र रुग्णालय, चैतन्य ज्येष्ठ नागरिक संघटना व रेणुकामाता ज्येष्ठ नागरी संघटना, बुलडाणा मार्फत आयोजित केले होते. या शिबिरास प्रतिसाद मिळाला. नेत्र तपासणी डॉ. शोन चिंचोले तर दंत तपासणी डॉ. सचिन किनगे यांनी केली. सर्वसाधारण रुग्णांची तपासणी डॉ. कांचन शिंदे यांनी केली. डॉ. वसंतराव चिंचोले यांनी योग्य ते मार्गदर्शन केले. प्रथम श्री. धन्वंतरी पुजन करून उपस्थितांनी दीपप्रज्वलन केले. शिबिराचे अध्यक्ष डॉ. भागवत भुसारी तर उद्घाटक म्हणून मृत्युंजय गायकवाड यांनी भुषविले. त्यानंतर उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे संपूर्ण संचालन श्वेता महाजन यांनी तर आभार प्रदर्शन विनायक खराटे यांनी केले. सर्व रुग्णांची तपासणी करून प्रत्येकास मार्गदर्शन व औषधोपचार करून शिबिराची सांगता झाली. वसंतराव चिंचोले , डॉ भागवत भुसारी व मान्यवरांची असलेली उपस्थिती टॉनिकची बॉटल व डोळ्यांचा ड्रॉप वाटप प्रास्तविक मधुसूदन कुळकर्णी यांनी केले तर डॉ. शोन चिंचोले यांनी शिबिराचा उद्देश व पद्धती यावर सविस्तर माहिती दिली. या शिबिरात सर्व लाभार्थीना टॉनिकची बाटली व डोळयांचा ड्रॉप देण्यात आला. शिबिरासाठी रेणुकामाता व ज्येष्ठ नागरीक संघटना अध्यक्ष तेजराव सावळे, डॉ. लक्ष्मणराव खर्चे, अविनाश धांडे, उषा दलाल, उषा गनोरकर, तसेच विशेष उपस्थितीमध्ये डॉ. प्रभा चिंचोले, स्त्रीरोग तज्ञ डॉ. विवेक चिंचोलेंची उपस्थिती होती.



# स्वयंरोजगार निर्मिती करणाऱ्या बचत गटातील महिलांचा सत्कार

## पुसद की महाराणी व नवल बाबा मित्र मंडळ यांचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
पुसद दि. १५ :
पुसद येथील पुसद की महाराणी दुर्गा मंडळ व नवल बाबा मित्र मंडळ पुसद यांच्या संयुक्त विद्यमाने नवल बाबा वॉर्डात शहरातील बचत गटाच्या माध्यमातून स्वयंरोजगार निर्मिती करणाऱ्या महिला बचत गटातील महिलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कोषटवार दौलतखान विद्यालयाचे अध्यक्ष राजेश कोटलवार, नवल बाबा मित्र मंडळाचे अध्यक्ष नटवरलाल उंटवाल, न.प. सुवर्ण जयंती अधिकारी नंदकुमार उबाळे, भीमशक्ती संघटनेचे अध्यक्ष संतोष अंभोरे, पांडुरंग उतळे, शायदा, गणेश डंगोरिया चौधरी, संतोष बडवे, राजेश पवार, जय उंटवाल, दिलीप नकवाल, रमेश सोमानी, श्रीकांत चिंतावार, रहेमान चव्हाण यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप रायपूरकर तर आभार नटवर उंटवाल यांनी केले. या कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम लक्ष्मण डंगोरिया, विवेक डंगोरिया, सतीश डंगोरिया, रामधन जादुसंकत, त्रिवेद उंटवाल, यश पवार, मयूर उंटवाल, शुभम डंगोरिया, रितिक डंगोरिया, जित उटवाल, अश उंटवाल, दिलीप रायपूरकर, भगवान धुळे, राजु चंदनकर, राजवीर उंटवाल, लकी डंगोरिया, कृष्णा डंगोरिया, सागर उंटवाल, राजकुमार छपरिबंद, कैलाश नकवाल यांनी घेतले. स्वयंरोजगार निर्मिती

# अनास्था : २६०० पैकी ३७५ शाळांमध्येच सीसीटीव्ही



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती दि. १५ :
बदलापूर येथील शाळेत अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचारानंतर संपूर्ण राज्य हादरले. त्यानंतर राज्याच्या शिक्षण विभागाने तत्काळ सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बसवण्याचा आदेश जारी केला. परंतु, जिल्ह्यात शासनाच्या या निर्णयाला बहुतांश शासकीय शाळांनीच हरताळ फासल्याचे दिसत आहे.
जिल्ह्यातील शाळांपैकी केवळ शाळांमध्येच सीसीटीव्ही लागले आहेत. त्याचप्रमाणे महापालिकेच्या पैकी शाळांमध्येच सीसीटीव्ही आहेत. शहर व जिल्ह्यातील बहुतांश खासगी शाळांमध्येच सीसीटीव्ही असल्याने जिल्ह्यातील शासकीय शाळांमधील सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे दिसून येत आहे. जि. प.च्या शिक्षण विभागाला अद्याप किती शाळांमध्ये सीसीटीव्ही आहेत, याचीही उर्वरित. पान . सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कधी ? –. सध्या सीसीटीव्ही लावण्याची प्रक्रिया सुरू आहे. . अजूनही बहुतांश शाळांमध्ये सीसीटीव्ही लागले का नाहीत? –.निधीची अडचण असल्याने डीपीसीकडे कोटी रु. निधीसाठी प्रस्ताव दिला आहे. . सीसीटीव्ही लागण्यास आणखी किती दिवस लागणार? –. लवकरच लागतील, आम्ही कामाला लागलो आहे. . आजवर किती शाळांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले? –.

**जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून नेमका आकडा मिळेल. संजिता महापात्र, सीईओ, जिल्हा परिषद**

सीसीटीव्हीसाठी प्राधान्यक्रम ठरवला सीसीटीव्हीसाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागाने प्राधान्यक्रम ठरवला असून, ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या किंवा त्यापेक्षा जास्त आहे. तसेच ज्या शाळांमध्ये पेक्षा जास्त विद्यार्थिनी आहेत. अशा शाळांकडून माहिती मागवली असून, अशा ज्या शाळांमध्ये सीसीटीव्ही नसतील तेथे प्राधान्याने सीसीटीव्ही बसवले जाणार आहेत, अशी माहिती जि. प. शिक्षण विभागाद्वारे देण्यात आली.
शाळांमध्ये सीसीटीव्ही लागलेत जिल्ह्यातील शाळांमध्ये सीसीटीव्ही लागले आहेत. उर्वरित शाळांमध्ये सीसीटीव्ही लावण्यासाठी डीपीसीकडे निधी मागितला असून, निधी मिळाल्यानंतर ज्या शाळांमध्ये विद्यार्थिनींची संख्या जास्त आहे, त्या शाळांमध्ये प्राधान्याने सीसीटीव्ही लावले जातील. आमचे प्रयत्न सुरू आहेत. –बुद्धभुषणसोनोने, शिक्षणाधिकारी, प्राथ., जि. प.

**विद्यार्थी सुरक्षेचे काय?, खासगी नव्हे शासकीय शाळांनीच फासला शासनाच्या नियमाला हरताळ**

# प्रकरणांच्या तत्काळ निपटाऱ्यासाठी सर्वंकष प्रयत्न करा-उपायुक्त बावणे

विभागीय लोकशाहीदिनी १२ प्रकरणांवर सुनावणी



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती दि. १५ :
नागरिकांकडून प्राप्त अर्जावर विहित कालमर्यादेत कारवाई होणे आवश्यक आहे. विभागीय लोकशाही दिनी दाखल प्रकरणांचा संबंधित विभागाकडून वेळेत अहवाल प्राप्त करून प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांनी सर्वंकष प्रयत्न करावे. तसेच केलेल्या कारवाईबाबत संबंधित तक्रारदारांना लेखी पत्राद्वारे कळवण्यात यावे, असे निर्देश उपायुक्त गजेंद्र बावणे यांनी सोमवारी दिले. या वेळी लोकशाही दिनात दाखल एकूण १२ प्रकरणांवर चर्चा करून त्या अनुषंगाने आवश्यक कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या. विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात उपायुक्त बावणे यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज झाले. समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त सुनील वारे, सहायक आयुक्त वैशाली पाथरे यांच्यासह पोलिस, महापालिका, महसूल, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. सामान्य प्रशासन विभागाद्वारे सादर ५ स्वीकृत अर्ज (प्रलंबित प्रकरणे) व ७ अस्वीकृत अर्ज (सामान्य तक्रार अर्ज) अशा एकूण १२ अर्जावर सविस्तर चर्चा विभागीय लोकशाही दिनात झाली. तसेच तीन नवीन प्रकरणे दाखल झालीत.

# मोदी आवास योजनेतून घरकुलाचे स्वप्न साकार झालेल्या लाभार्थ्यांवर हप्त्यापायी रडण्याची वेळ आली

**योजनेला वर्ष होत असतानाही घर बांधकामाचे पैसे पदरात पडले नाहीत. म्हणून, कोठे व्याजाने तर कोठे उसनवारी करून घर बांधलेल्या लाभार्थ्यांना पैशांसाठी प्रशासनाचे उंबरे झिजवूनही उपयोग होत नाही, हे विशेष.**



■ महासागर प्रतिनिधी,
भंडारा दि. १५ : नोव्हेंबर २०२३ पूर्वी ग्रामीण भागातील लाभार्थ्यांसाठी मोदी आवास योजना सुरू केली. ती तीन वर्षांसाठी असून गतवर्षी तिचे पहिले वर्ष होते, तेव्हा गावगाड्यातील बेघरांना घर मिळणार असल्याने त्यांनी प्रस्ताव सादर केले. तितक्याच गतीने लाभार्थ्यांना घरकुलाचा २० हजारांचा पहिला हप्ता पडलादेखील. म्हणून, उत्साहाने घरकुलाचे बांधकाम सुरू केलेल्या लाभार्थ्यांची निराशा झाली. त्यांची बोळवण एकाच हप्त्यावर केली. अगदी गतीने बांधकाम उरकलेल्या लाभार्थ्यांना फार तर दुसरा हप्ता मिळाला. त्यांची संख्या नगण्यच. तरीही लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम थांबविले नाही. त्यामागे आज ना उद्या पैसे येतील, अशी अपेक्षा होती. शिवाय, बांधकामाचे मटेरियल खराब होईल आणि गुत्तेदारांना बांधकामाची मुदत ठरवून दिली होती. त्यांचाही तगादा असल्याने लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम सुरूच ठेवले. दुसरीकडे काही लाभार्थ्यांकडे पैसेच नसल्याने बेसमेंट केल्यानंतर बांधकामाची अवस्था जैसे थेच राहिली. असे दोन्ही प्रकारच्या लाभार्थ्यांमधून नाराजी व्यक्त होत आहे. शासनाकडे निधी नसल्याचे सांगूनही त्यांना विश्वास येत नाही, म्हणून ते स्वतःहून प्रशासनाचे उंबरे झिजवित आहेत. यापुढे कधी निधी मिळेल, याचे उत्तरही प्रशासन देऊ शकत नाही. सगळा विषय मंत्रालयातील सचिव स्तरावर अवलंबून आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना कितीही टाहो फोडला तरीही उपयोग नाही.

११ हजार ३३ घरकुलांना मंजुरी
मोदी आवास योजनेचे ११ हजार ३३ घरकूल भंडारा जिल्ह्यासाठी मिळाले होते. त्यापैकी भंडारा तालुक्याच्या वाट्याला १ हजार ४४५, लाखांदूर ११७५, लाखनी १४५४, मोहाडी २०६२, पवनी १४४३, साकोली १०५५, तुमसर २३९६ घरकूल आले. ते पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांनी सुटीच्या दिवशीही काम करून उद्दिष्ट साध्य केले. त्यामुळे पहिला हप्ता देण्यासाठी लोकसभा आचारसंहितेची अडचण आली नाही. त्यासाठी पंचायत समितीने जि.प. गट आणि पं.स. गणनिहाय बैठका घेऊन जाग्यावर घरकुलाचे प्रस्ताव स्वीकारले होते. ग्रामीण घरकुल लाभार्थीसोबत दुजाभाव शहरी भागातील लाभार्थ्यांना घरकुलासाठी २ लाख ५० हजार रुपये मिळतात. तेवढ्याच बांधकामासाठी ग्रामीण लाभार्थ्यांना १ लाख ३२ हजार रुपये पदरात पडतात. काम सारखेच असताना लाभ वेगवेगळा कसा, असा सवाल ग्रामीण लाभार्थी उपस्थित करीत आहेत. तुटपुंज्या रकमेत घरकूल बांधकामाचे साहित्य देखील खरेदी करता येत नाहीत. सध्याच्या महागाईप्रमाणे घरकुलाच्या लाभाची रक्कम वाढविणे अपेक्षित आहे.

# विद्यार्थांनी वाचनसंस्कृती जोपासावी... प्राचार्य डॉ किशोरचंद्र रेवतकर

■ महासागर प्रतिनिधी,
समुद्रपुर दि. १५ :
पुस्तके आपल्याला शिकण्यासाठी एक नवीन संधी देत असते. पुस्तके वाचल्याने आपले ज्ञान वाढते. आपल्या जीवनाला उन्नत करणारी गोष्ट ज्यामुळे आपली बुद्धिमत्ता अधिक वाढते. तसेच माणसाचे जीवन फुलविण्यात वाचनाचा सर्वात मोठा वाटा असतो.व्यक्तीमत्व विकासासाठी वाचन संस्कृती जोपासले अत्यंत महत्त्वाचे असुन महाविद्यालयातील मुलं तर वाचनाकडे सर्रास दुर्लक्ष करतात. वाचन ही एक सुंदर कला आहे आणि प्रत्येकाने ती जोपासावी असे विचार प्राचार्य डॉ किशोरचंद्र रेवतकर यांनी डॉ.ए.पि.जे अब्दुल कलाम यांचे जयंती निमित्ताने आयोजित वाचण प्रेरणा दिन कार्यक्रमात व्यक्त केले.




विद्या विकास महाविद्यालयात ग्रंथालय विभागाचे वतीने डॉ.ए.पि.जे अब्दुल कलाम वाचन प्रेरणा दिन व ग्रंथ प्रदर्शनाचे चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य मार्गदर्शक प्राचार्य डॉ किशोरचंद्र रेवतकर, उपप्राचार्य डॉ.नयना शिरभाते,प्रमुख पाहुणे प्रा.मेघशाम ढाकरे, डॉ.राजिव कळसकर, प्रा.अजय मोहोड , ग्रंथपाल डॉ.प्रमोद अलोणे उपस्थित होते. यावेळी माजी राष्ट्रपती डॉ.ए.पि.जे अब्दुल कलाम यांचे पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पुढे बोलताना प्राचार्य म्हणाले आजच्या आधुनिक युगातही ग्रंथालये विकसित झालेली आहेत. पण आज या पुस्तकांची जागा इंटरनेटने घेतली आहे.परंतू विद्यार्थ्यांची वाचन संस्कृती हळूहळू नष्ट होत आहे.तर प्रा.मेघशाम ढाकरे यांनी वाचाल तर वाचाल. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारांवर प्रकाश टाकुन वाचनाच्या माध्यमातून मानवाचे जीवन घडू शकते यावर मार्गदर्शन केलं. यावेळी डॉ.राजिव कळसकर,प्रा.अजय मोहोड, डॉ . प्रमोद अलोने यांनी विचार व्यक्त केले.

**डॉ.ए.पि.जे.कलाम जयंती निमित्ताने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन**

कार्यक्रमाचे संचालन प्रदीप कापकर तर आभार सुरेश सेलकर यांनी मानले.कार्यक्रमाला डॉ.राजकुमार रामटेके, डॉ.राजेशाम वेलूपुला, डॉ.प्रकाश तले, डॉ.नितिन अखूज, प्रा.धनशाम कदमधाड, प्रा.मनोज खेकरे, प्रा.दिपक वालदे, प्रा.प्रनिता घुमडे, प्रा.स्वाती महाबुध्दे,पाटील मॅडम, उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्रीमती इटनकर, हर्षल कोरे, धनेश रंगारी यांनी प्रयत्न केले.

# नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना पडला जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचा विसर

■ महासागर प्रतिनिधी, गोंदिया दि. १५ :
तीन दिवसांपूर्वीच गोंदिया नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी शहरातील अवैध होर्डिंग बॅनर दोन दिवसात हटविले जातील. जिल्हाधिकाऱ्यांनी सुद्धा या संदर्भात आदेश दिले असल्याचे सांगितले. मात्र दिवस उलटूनही अवैध होर्डिंग बॅनरवर नगर परिषदेने कारवाई केली नाही. त्यामुळे स्वछाधिका नाही जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचा सुद्धा विसर पडल्याचे चित्र आहे. गोंदिया शहरातील सर्वच प्रमुख चौकात आणि मोक्याच्या ठिकाणी अवैध होर्डिंग बॅनर लावून शहराचे विद्रुपीकरण केले जात आहे. त्यामुळे स्वच्छ सुंदर गोंदिया शहर हे केवळ नावापुरतेच ठरत आहे.




सध्यस्थितीत गोंदिया शहरातील प्रमुख चौक नव्हे गल्लीबोळात सुद्धा अवैध होर्डिंग बॅनरचे पीक आले आहे. यामुळे गल्लोगल्ली नेते तयार झाल्याचे चित्र आहे. होर्डिंग बॅनर लावण्यासाठी नगर परिषदेकडून परवानगी घेतली जात नसल्याने महसूल बुडत आहे. शिवाय शहराचे विद्रुपीकरण होत आहे. मुंबई उच्च न्यायालयाने सुद्धा यावरून शासन आणि प्रशासनाला फटकारल्यानंतर काही शहरांमध्ये कारवाईची मोहीम सुरू करण्यात आली. यासंदर्भात गोंदिया नगर परिषदेचे मुख्याधिकारी संदीप चिद्रावार यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सुद्धा दोन दिवसात शहर होर्डिंगमुक्त होईल. जिल्हाधिकाऱ्यांनी सुद्धा ही बाब गांभीर्याने घेतली असून कारवाई करण्याचे आदेश दिल्याचे सांगितले होते. मात्र याला आता तीन दिवसांचा कालावधी लोटला तरी अद्यापही नगर परिषदेने शहरात अवैध होर्डिंग बॅनर लावणाऱ्यांवर कुठलीच कारवाई केली नाही.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

## थोडक्यात

### फडणवीसांच्या मराठा द्वेषामुळे राजकारणात जाण्याची वेळ



■ **मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा राज्य सरकारला इशारा दिला आहे. निवडणूक आज जाहीर झाल्या असल्या तरी देखील त्या दोन-चार दिवस पुढे ढकलून मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी त्यांनी पुन्हा एकदा केली आहे. फडणवीस यांच्या मराठा द्वेषामुळे आमच्यावर राजकारणात जाण्याची वेळ आल्याचे त्यांनी म्हटले आहे.

मराठा समाजाला राजकारणात जायचे नाही. मात्र तुम्ही आमची वाट लावाल तर मराठे देखील तुमची वाट लावतील, असा इशारा त्यांनी दिला आहे. मराठा समाजाच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करू नये, तुमचे राजकारण तुम्हाला लखलाभ असो केवळ आमच्या मागण्या मान्य करा, असे म्हणत त्यांनी पुन्हा एकदा भाजपला मराठा समाजाच्या आरक्षणाची मागणी मान्य करण्याचे आवाहन केले आहे.

राज्य सरकारच्या वतीने १६ ते १७ जाती या ओबीसीमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र या समाजाची ही मागणी नव्हती. कोणाचीही मागणी नसताना देखील राज्य सरकारच्या वतीने हा निर्णय घेण्यात आला असल्याचा आरोप जरांगे पाटील यांनी केला आहे. मराठा समाजाला छेडण्यासाठीच हा निर्णय घेण्यात आला असल्याचे ते म्हणाले.

### मधुकरराव पिचड रुग्णालयात



**नाशिक :** ज्येष्ठ नेते मधुकरराव पिचड यांची प्रकृती खालावली असल्याची माहिती समोर आली आहे. त्यांना नाशिक येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तज्ञ डॉक्टरांची टीम त्यांच्यावर उपचार करत आहेत. सोमवारी पहाटेच्या सुमारास त्यांना ब्रेन स्ट्रोक आला आहे. राजुर येथील राहत्या घरी असतानाच पिचड यांना ब्रेन स्ट्रोक आल्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. चिपड हे ८४ वर्षांचे आहेत. नासिक येथील '९ पल्स' रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. त्यांना अर्धांग वायू झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

# तिसरी आघाडी कायम राहणार की फुटणार?

## आमदार बच्चू कडू एकनाथ शिंदेंच्या भेटीला

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १५ :**

विधानसभा निवडणउकीच्या तारखांची घोषणा होण्याच्या काही वेळापूर्वी तिसऱ्या आघाडीचे नेते तथा प्रहार संघटनेचे आमदार बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे.

या भेटीत दोन्ही नेत्यांत जवळपास तासभर चर्चा झाली. त्यात शिंदे यांनी तिसऱ्या आघाडीच्या माध्यमातून वेगळी चूल मांडलेल्या बच्चू कडू यांना पुन्हा सोबत घेण्यासाठी त्यांची समजूत काढल्याची माहिती आहे. या घटनाक्रमामुळे राजकारण चांगलेच तापले आहे.

परिवर्तन महाशक्ती अर्थात तिसऱ्या आघाडीचे प्रमुख नेते बच्चू कडू मंगळवारी दुपारी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी पोहोचले. याठिकाणी मुख्यमंत्र्यांचे निकटवर्तीय समजले जाणारे शिवसेना नेते संजय शिरसाट, आनंदराव अडसूळ व प्रताप सरनाईक उपस्थित आहेत. त्यात बच्चू कडू यांची समजूत काढण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे बच्चू कडू यांनी गेल्याच महिन्यात राजू शेट्टी, युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या मदतीने परिवर्तन महाशक्तीची घोषणा केली होती. तिसऱ्या आघाडीच्या रुपात आपण मतदारांना पर्याय देणार असल्याचे त्यांनी पुण्यात झालेल्या कार्यक्रमात सांगितले होते.





बच्चू कडू यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांना पाठिंबा दिला. ठाकरेंच्या नेतृत्त्वाखालील महाविकास आघाडी सरकारमध्ये ते राज्यमंत्री होते. पण त्यानंतर २०२२ मध्ये शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी बंड केले. या बंडाला शिवसेनेच्या ४० आमदारांसह काही अपक्षांनी साथ दिली. बच्चू कडूंच्या प्रहारनेही शिंदेंना पाठिंबा दिला. त्यानंतर शिंदे मुख्यमंत्री झाले. पण त्यांच्या सरकारमध्ये कडू यांना मंत्रीपद देण्यात आले नाही. त्यांना केवळ दिव्यांग कल्याण मंडळाची जबाबदारी दिली गेली. यामुळे बच्चू कडू शिवसेनेवर नाराज आहेत. या नाराजीतूनच बच्चू कडू यांनी परिवर्तन महाशक्तीच्या रुपात तिसऱ्या आघाडीचा प्रयोग केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

> प्रहार संघटनेचे आमदार राजकुमार पटेल यांनी बच्चू कडू यांना सोडचिठ्ठी देण्याचे संकेत दिलेत. राजकुमार पटेल लवकरच शिवसेनेत दिसतील असा अंदाज आहे. यामुळेही बच्चू कडूंचा शिवसेनेवरील रोष वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत.

# संविधानाच्या रक्षणासाठी ही निवडणूक महत्त्वाची

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १५ :**

विधानसभा निवडणुकीची घोषणा आज करण्यात आली. केंद्रीय निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत निवडणूक कार्यक्रमाची माहिती दिली. यानंतर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतही आमच्याकडून संविधान हा मुद्दा असणार आहे, असे वडेट्टीवार यांनी ठामपणे सांगितले. राज्यात महाविकास आघाडी जिंकल्यास पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या खुर्चीला झटके बसतील. देशाचे संविधान वाचवण्यासाठी राज्यातील निवडणुका जिंकणे महत्त्वाचे आहे, असेही वडेट्टीवार म्हणाले.

विजय वडेट्टीवार यांनी राज्यपाल नियुक्त विधार परिषदेच्या आमदारांच्या शपथविधीवरही टीका केली आहे. विधानसभा निवडणुकीची घोषण होण्याच्या एक दिवस आधी विधानपरिषदेच्या राज्यपाल नियुक्त आमदारांना शपथविधी दिला जातो, ही कुठली नितीमत्ता-नैतिकता आहे. हे सर्व कायदा गुंडाळून काम सुरू आहे, असे ते म्हणाले.

महायुतीने महाराष्ट्रात निवडणुका जिंकल्यास भाजप पुन्हा संविधानाला हात घालण्याचा प्रयत्न करणार, असा घणाघात विजय वडेट्टीवार यांनी केला. त्यांनी संविधाला हात घालू नये, यासाठी आम्ही त्यांना लोकसभेला थांबवले.

महाराष्ट्रात महाविकास आघाडी जिंकल्यास पंतप्रधान मोदींच्या दोन कुबड्या गळून पडतील. त्यानंतर त्यांना संविधान बदलण्याचा आणि लोकशाहीला हात घालण्याची हिंमत राहणार नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या निवडणुकीत संविधानाचे रक्षण होणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रातील निवडणूक झाल्यानंतर कदाचित उद्या नरेंद्र मोदींच्या खुचीर्ला झटके बसतील. देशाच्या रक्षणासाठी राज्यातील विधानसभा निवडणुकीत आमचा संविधान हा मुद्दा असणारच, असे वडेट्टीवार यांनी ठामपणे सांगितले. देशाचे संविधान वाचवण्यासाठी राज्यातील निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या आहेत, असेही ते म्हणाले.

**लोकसभा निवडणुकीत गाजला होता संविधानाचा मुद्दा**

2024 च्या लोकसभा निवडणुकीत संविधानाचा मुद्दा चांगलाच गाजला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 400 पारचा नारा दिल्यानंतर विरोधकांच्या गोटात खळबळ उडाली होती. संविधान बदलण्यासाठीच भाजपला 400 खासदार संख्या हवी आहे, असा प्रचार विरोधकांकडून करण्यात आला. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला अपयश आले होते.

लोकसभेच्या 48 जागांपैकी भारत आघाडीला 30 तर एनडीएला 17 जागा मिळाल्या. यामध्ये भाजपला 9, शिवसेनेला 7 आणि राष्ट्रवादीला केवळ 1 जागा मिळाली. भाजपने 23 जागा गमावल्या. 2019 च्या लोकसभा निवडणुकीत एनडीएला 41 जागा मिळाल्या होत्या. 2014 मध्ये हा आकडा 42 होता. म्हणजे निम्म्याहून कमी. दरम्यान, विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी संपूर्ण ताकदीनिशी सामोरे जाईल, असेही ते म्हणाले.

# १२ ऐवजी ७ का घेतले? कळायला मार्ग नाही..

## अजित पवार चिंतीत, राज्यपालांना विनंती करणार

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १५ :**



गेली साडे चार वर्षांपासून अडगळीत पडलेला विधानपरिषदेच्या राज्यपाल नियुक्त आमदारांचा प्रश्न अखेर मार्गी लागला. शिंदे सरकारने सादर केलेल्या नावांच्या यादीतून राज्यपालांनी केवळ ७ जणांच्या नावांना मंजुरी दिली होती. त्यानंतर या ७ सदस्यांचा आज विधानभवनातील सेंट्रल हॉलमध्ये शपथविधी पार पडला.

मात्र उर्वरित ५ जागांबद्दल अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राज्यपालांनी १२ न घेता ५ का घेतले हे कळायला मार्ग नाही. उर्वरित जागांबाबत राज्यपालांना भेटल्यावर विनंती करु, असे अजित पवार म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, राज्यपालांनी विधानपरिषदेवर ७ जणांची नियुक्ती केली आहे. हा विषय अनेक दिवसांपासून प्रलंबित होता, या राज्यपालांनी त्याला मनावर घेतले, तो त्यांचा अधिकार असतो. परंतु १२ सदस्य न घेता ७ का घेतले, हे कळायला मार्ग नाही. राहिलेले ५ सदस्य सुद्ध घ्या, याबाबत राज्यपालांना भेटल्यावर विनंती करणार असल्याचे अजित पवारांनी सांगितले.

विधानपरिषदेवरील राज्यपाल नियुक्त आमदारांसाठी भाजपकडून ३, शिंदे गटाकडून २ तर अजित पवार गटाकडून २ जणांची निवड करण्यात आली आहे.

यामध्ये भाजपकडून पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्यासह विक्रांत पाटील आणि बाबू सिंग महाराज राठोड यांना संधी देण्यात आली आहे. तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांचे पुत्र पंकज भुजबळ आणि सांगली-मिरज-कुपवाडचे माजी महापौर इद्रिस नायकवडी यांना संधी मिळाली आहे. तर शिवसेनेने हेमंत पाटील आणि मनिषा कायंदे यांची वर्णी लागली आहे. मात्र, १२ ऐवजी केवळ ७ जणांची वर्णी लागल्याने अजित पवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे दिसून येते.

# भाजपच्या जाहिरनाम्याची तयारी अंतिम टप्प्यात

**पुण्यात जोरदार तयारी**

■ **वृत्तसंस्था**
**पुणे, दि. १५ :**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टीची जाहिरनाम्याची तयारी आता अंतिम टप्प्यात आली असून पक्षाने त्याचे स्वरुप परंपरागत जाहिरनाम्याच्या दोन पाऊल पुढे आता ' अंमलबजावणी आराखडा ' करण्याचे निश्चित केले आहे.

या आराखड्यासाठी मतदारांनी विविध मुद्यांबाबत महाराष्ट्राच्या विकासाच्या आपल्या आकांक्षा सूचनांच्या स्वरूपात पक्षाकडे पाठवाव्यात असे आवाहन डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी पुण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपा सरकारांनी केंद्रात आणि राज्यात अंमलबजावणीच्या आघाडीवर उल्लेखनीय यश मिळविले आहे. परंपरागत जाहीरनाम्यात केवळ आश्वासने असतात. संकल्प पत्र ही पुढची पायरी होती. आता सत्तेवर पुन्हा येण्याच्या आत्मविश्वासातून आम्ही आमच्या संकल्पांतून कश्या प्रकारे अमलात आणायचा आराखडा तयार करीत आहोत असे ही सहस्रबुद्धे यांनी सांगितले.

भाजपने 2024 च्या राज्य विधानसभा निवडणुकीसाठी 30 सदस्यांची एक जाहीरनामा समिती नियुक्त सुधीर मुनगंटीवार यांच्या व्यतिरिक्त या समितीत डॉ. विनय सहस्रबुद्धे, माधव भांडारी, उज्ज्वल निकम, डॉ. भारती पवार, सुभाष देशमुख, माधवी नाईक, दिलीप कांबळे, खा. धनंजय महाडिक, संभाजी निलंगेकर, धनंजय मंगरूळे, केशव उपाध्ये, अनिल सोले, नरेंद्र पवार इत्यादींचा समावेश आहे. सूचना पाठविण्यासाठी पक्षाने आपल्या वेबसाइटवर एक स्वतंत्र विभाग तयार केला आहे.

# दुर्मिळ वस्तूंचा अनोखा संग्रह!

**लोकमानस**



जुनी घरे, जुन्या वापरातल्या बनावटी वस्तू, दूरध्वनी, छायाचित्र, कॉईन्स अशा अनेक जुन्या काळातील वस्तूंचा संग्रह पाहायचे असेल तर, पुण्यातील धोत्रे परिवाराला भेट द्यावी लागेल. ब्रिटिश काळातील कॅमेरे आणि त्यांचे रोल, ऐतिहासिक काळातील चांदीचे दुर्मिळ चमचे, एक इंच आकारापासून ते चित्रविचित्र प्रकारचे दूरध्वनी अशा वस्तूंचा दुर्मिळ खजाना पुण्यातील अभिजित धोत्रे आणि त्यांचे वडील अनिल धोत्रे यांनी जमा केला आहे.

अभिजित धोत्रे माईर्स एमआयटीच्या श्री सरस्वती न्यू इंग्लिश स्कूल येथे कलाशाखेचे प्रमुख आहेत. ते उत्तम छायाचित्रकार व अभ्यासकही आहेत. आपल्या अभ्यासादरम्यान त्यांनी १९९७ पासून या दुर्मिळ वस्तू जमवायलाही सुरुवात केली.

गेल्या अठरा वर्षांत त्यांनी लाकडी कॅमेऱ्यापासून एक इंचाचा मायक्रोपर्यंत जवळपास ४५० कॅमेरे जमा केले आहेत. १८९२ मधील बेलो, हनीकॉंग, ऍरो कंपनीचा मायक्रो कॅमेरा आणि हिटलरने दुसऱ्या महायुद्धात हेरगिरीसाठी वापरलेला ह्यासिकाह्ल कंपनीचा कॅमेरा या संग्रहात आहे. तसेच फिल्म, केमिकल, निगेटिव्ह, डेव्हलपिंग आणि प्रिंटिंग एकत्रित असलेले दोनशे वर्षांपूर्वीचा बॉडीचा कॅमेरा मिळवला आहे. तसेच त्यांनी कोनिका, साकोरा, फुजी, एलफोर्ड अशा जुन्या प्रकारातील ३५० रोलही जमा केले आहेत.

कॅमेऱ्याबरोबरच पेशवेकालीन तसेच, संस्थानिकांनी वापलेले चमचे याचाही संग्रह धोत्रे यांच्याकडे आहे. यामध्ये शिवकालीन मुद्रा, चलन, पानाचे डबे, करंडे, स्टँप पेपर, शिवाजी महाराजांची दुर्मिळ छायाचित्रेही आहेत. विविध स्वरूपातील चांदीचे २१० चमचे जमा केले असून, यामध्ये दुर्मिळ नक्षी असलेले चमचे पाहायला मिळतात.

त्यांनी सात महिन्यांत विविध देशांमधून खेळण्याच्या प्रकारातील पण खरे-खुरे २३० दूरध्वनी जमा केले आहेत. घोडा, केळी, कार्टुन, रेल्वे, डेव्हिडसन, चारचाकी गाडी, बेडूक, बीअरची बाटली, पुस्तक, डायरीच्या आकारातील दूरध्वनी आहे. जुन्या काळातील दोन किलो पितळी फोनही त्यांच्या संग्रहात आहे.

तसेच पाच रुपयांचे डॉलरचे पंचावन्न प्रकारही जमा केले असून, यामध्ये टिळकजी असे लिहिलेले तीन प्रकार आहेत. इंदिरा गांधी, नेहरू असेही डॉलर पाहायला मिळणार आहेत. दुर्मिळ वस्तूंचे पुणेकरांसह कलाप्रेमींसाठी एक कायम स्वरूपी संग्रहालय उभारण्याची धोत्रे यांची इच्छा आहे. हा संग्रह नागरिक त्यांच्या घरी जाऊन पाहू शकतात. विशेष म्हणजे धोत्रे यांच्या या दुर्मिळ वस्तुसंग्रहाची नोंद लिमका, एशिया, युनिक आणि एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. ■ ■

# राज्यशासनाचा घोषणांचा धडाका निवडणुकांसाठीचे राजकारण आहे का?

**माझं मत**

**विजय कुमार मोदड, अधिकारी**

होय, मागील काही महिन्यापासून राज्यशासनाच्या माध्यमातून अनेकविध योजनांचा जो वर्षाव सुरु आहे, तो लक्षात घेता हा सत्ताधारी पक्षाचा राजकीय डाव आहे असं वाटत. लोकसभेमध्ये भाजप प्रणित युतीला बसलेला फटका लक्षात घेऊनच आता महाराष्ट्रातील मतदारांची मन जिकंण्यासाठी शासन एकामागोमाग एक जनकल्याणी निर्णय घेतेय.

**वर्षा दांदळे, गृहिणी**

एक सामान्य महिला म्हणून शासनाने सुरु केलेल्या योजनांमध्ये राजकारण दिसत नाही. आम्हा महिलांना महिन्याला दीड हजार रुपये देणारे हे पहिले सरकार आहे. वृद्धांसाठी आयुष्यमान सारखी मोफत वैद्यकीय सुविधा, श्रावणबाळ योजना, मोफत तीर्थक्षेत्र पर्यटन योजना, तरुणांसाठी शिष्यवृत्ती योजना या योजना सर्वसामान्यांचे कल्याण करणाऱ्या योजनाच आहेत.

**महेंद्र फुलसुंदर, कुरिअर कर्मचारी**

कालच राज्य शासनाने मुंबईतील टोलनाक्यावर टोल माफी जाहीर केली. मागील दहा बारा दिवसात सरकारची ही योजनांची बरसात सुरु आहे. मात्र, या सगळ्या घोषणा म्हणजे मतदारांना खुश करण्यासाठी सरकारने सुरु केल्या आहेत हे नक्की. एकदा सरकार स्थापित झाले कि हळूहळू पुन्हा या दिखाऊ योजना बंद देखील होतील.

**शैला बच्छाव, शिक्षिका**

सरकारी तिजोरीत जो कर जमा होतो तो सर्वसामान्य लोकांच्या कष्टाचा पैसा असतो. याच कराच्या पैशाचा विनियोग विधायक सामाजिक कार्यासाठी सरकारने करावा अशी लोकांची अपेक्षा असते. सध्या लोकांचा हाच पैसा विविध अवास्तव अशा योजनांसाठी उडवला जात आहे. याचा दुष्परिणाम म्हणजे लवकरच सरकारी तिजोरी तर खाली होईलच, शिवाय राज्यावर वारेमाप कर्ज होईल हा धोका देखील आहे. ■ ■

# अतुल ग्रीनटेकची जिओ प्लॅटफॉर्मसोबत भागीदारी

**तंत्रमंत्र**



अतुल ऑटो लिमिटेडची उपकंपनी असलेल्या अतुल ग्रीनटेक प्रायव्हेट लिमिटेडने जिओ प्लॅटफॉर्म्स लिमिटेडसोबत एक धोरणात्मक भागीदारी जाहीर केली आहे. इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रात नवकल्पना आणि डिजिटल परिवर्तन घडवून आणणे, हा या भागीदारीचा उद्देश आहे.

या सहकार्यामुळे अतुल ग्रीनटेक दक्षिण अमेरिका, युरोपियन युनियन, पूर्व आफ्रिका आणि डोमेस्टिक भारतीय बाजारांना उत्कृष्ट इलेक्ट्रिक वाहन आणि ई-मोबिलिटी उपाययोजना देऊ शकेल. या सहयोगामध्ये जिओच्या प्रगत मोबिलिटी तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात येतो. अत्याधुनिक हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि कनेक्टिव्हिटी यांची सांगड घालून युझर्सना रिअल-टाइम टेलीमॅटिक्स डेटा आणि उच्च विश्वासार्हता प्रदान केली जाते. अतुल ग्रीनटेकतर्फे जिओच्या अत्याधुनिक चार्जिंग सोल्युशन्स, ऑटोमोटिव्ह क्लस्टर्स, टेलीमॅटिक्स हार्डवेअर आणि प्लॅटफॉर्म, तसेच आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटी सोल्युशन्सचा वापर जागतिक ग्राहकांसाठी करणार आहे.

यामुळे त्यांना स्थानिक पातळीवरील स्त्रोतांचा वापर वाढवता येईल, मजबूत पुरवठा साखळी निर्माण करता येईल, आणि इष्टतम डेटा वापर करता येईल. परिणामी, चार्जिंगसाठी लागणारा वेळ कमी करता येईल. या भागीदारीत अतुल ग्रीनटेकच्या सर्व थ्री-व्हीलर प्लॅटफॉर्म्सवर लक्ष केंद्रित केले जाईल. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# शरद पवारांच्या हुशारीमुळेच बाळासाहेबांची शिवसेना फुटली

## रामदास कदमांची पुन्हा टीका

■ **वृत्तसंस्था, रत्नागिरी, दि. १५ :**

शरद पवार यांच्यामुळेच बाळासाहेब यांची शिवसेना फुटली अशी टीका शिंदे गटाचे माजी आमदार रामदास कदम यांनी केली आहे. शिवसेनेतील बंडानंतर उद्धव ठाकरे काँग्रेसची साथ सोडण्यास तयार होते. मी सर्व आमदारांना मातोश्रीवर आणायला तयार होतो. पण त्यापूर्वी शरद पवार मातोश्रीवर पोहोचले आणि उद्धव ठाकरेंची भूमिका बदलली. बाळासाहेब हयात असताना जे शरद पवार यांना जमले नाही ते त्यांनी आता करुन दाखवले, असा हल्लाबोल शरद पवार यांच्यावर केला.


शरद पवार यांनी फलटण येथील एका सभेत 'तुम्ही काही काळजी करू नका. आपल्याला लांब जायचे आहे. ८४ होवो किंवा ९० हा म्हतारा काही थांबत नाही. हे म्हतारं महाराष्ट्राला योग्य रस्त्यावर आणल्याशिवाय थांबत नाही' असे वक्तव्य केले होते. या वक्त्यावरही रामदास कदम यांनी पलटवार केला आहे. शरद पवारांनी शंभरी गाठावी. पण, ८४ वर्षांत शेतकऱ्यांसाठी काय केले, असा सवाल रामदास कदम यांनी केला आहे. तुम्ही अनेक पावसाळे बघितले. तुमच्या हुशारीमुळेच बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना फुटली, असा आरोपही रामदास कदम यांनी केला आहे.

रामदास कदम यांनी टोलमाफीच्या निर्णयावरही भाष्य केले. टोलमाफीचा निर्णय लोकाभिमुख आहे. या निर्णयामुळे लोकांचे हजारो रुपये वाचतील. कोकणातील जनता सरकारवर खुश आहे. असे निर्णय घेण्यासाठी एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावे, असे कदम म्हणाले. उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदाची स्वप्न पाहत आहेत. पण त्यांनी आत्मचिंतन करावे, असा सल्लाही कदम यांनी दिला.

# राष्ट्रसंतांचा पुण्यतिथी महोत्सव आरंभ

## २१ ला मौन श्रद्धांजली, सात दिवस विविध कार्यक्रम

■ **महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, दि. १५ :**



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाला मंगळवारपासून प्रारंभ झाला आहे. त्यानिमित्त गुरुकुंज आश्रमात देशभरातील गुरुदेव भक्तांची मांदियाळी अवतरली आहे.

सात दिवसीय महोत्सवात विविध दैनंदिन कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. पुण्यतिथी महोत्सवामधील सर्वात भावस्पर्शी कार्यक्रम मौन श्रद्धांजलीचा असून सोमवार, २१ ऑक्टोबरला होत आहे. मंगळवारी पहाटे ४ वाजता तीर्थस्थापना, चरण पादुका व महासमाधी पूजनाने या महोत्सवाची सुरुवात होणार असून, सामुदायिक ध्यानानंतर गुरुकुंज आश्रमात राष्ट्रसंतांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

रात्री वरखेड येथील महिला भजन मंडळाचा खंजिरी भजनाचा कार्यक्रम तसेच पंकज महल्ले व सचिन काळे यांचे कीर्तन होणार आहे. गुरुवार १७ रोजी सामुदायिक ध्यानावर विलास साबळे यांचे चिंतन, सकाळी ८ वाजता नीळकंठ हळदे यांचे ग्रामगीता प्रवचन साडे अकरा वाजता धनश्री खंडारे यांची अभंगवाणी, दुपारी १२ वाजता पुष्पा बोंडे यांच्या अध्यक्षतेखाली महिला संमेलन आयोजित केले असून, या संमेलनाच्या मार्गदर्शक विजया मारोतकर व प्रमुख पाहुणे म्हणून कल्पना दिवे (पं. स. सभापती), वैशाली धुमोणे (सरपंच, गुरुदेवनगर) तसेच डॉ. लक्ष्मी जवंजाळ, डॉ. वसुंधरा बोंडे, डॉ. नयना कडू, गौरी देशमुख, संगीता शिंदे, माधवी ढवळे यांची उपस्थिती राहणार आहे.

सायंकाळी ६ वाजता सामुदायिक प्रार्थनेवर पुष्पा बोंडे यांचे चिंतन, ७ वाजता क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले भजन मंडळाचे खंजिरी भजन, ज्योती धनाडे यांचे कीर्तन, नारायणदास पडोळे यांचे कीर्तन होईल. सोमवारी समर्थ आडकोजी महाराज संस्थान वरखेड, जन्मभूमी यावली, तपोभूमी गोंदोडा येथील पालख्यांचे स्वागत व पूजन दुपारी साडे तीन वाजेपासून मौन श्रद्धांजली सर्व संत स्मृतिमानवता दिन सर्वधर्मीय प्रार्थना व सामुदायिक प्रार्थना, त्यानंतर विश्व शांतीसाठी महामंत्र सामुदायिक प्रार्थना आदी कार्यक्रम होतील.

मंगळवार २२ ला सकाळी दिंडी व पालखी प्रदक्षिणा, १० वाजता गोपालकाला व त्यावरील सचिन पवार यांचे कीर्तन होईल. दुपारी ३ वाजता एचव्हीपीएमचे व्यायाम संमेलन होईल. रात्री ७.३० वाजता खंजिरी भजन संध्येने पुण्यतिथी महोत्सवाचा समारोप होईल. गुरुदेव भक्तांनी कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन अ. भा . श्री गुरुदेव सेवा मंडळाद्वारे करण्यात आले आहे.

# पाठिंब्यासाठी निर्भय बनोच्या मविआला अटी

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १५ :**

लोकसभा निवडणूकीपूर्वी निर्भय बनो चळवळीतून केंद्रातील भाजप सरकारविरोधात महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागात ७५ सभा घेत महाविकास आघाडीला (मविआ) बिनशर्त पाठिंबा दिला गेला होता. आता विधानसभा निवडणूकीपूर्वी मंगळवारी नागपुरात सामाजिक कार्यकर्ते ॲड. आसीम सरोदे आणि विश्वंभर चौधरी यांनी पत्रपरिषदेत घेत मविआपुढे काही अटी ठेवल्या. त्यामुळे मविआचे टेंशन वाढले आहे.



निर्भय बनोच्या माध्यमातून लोकसभानिवडणुकीपूर्वी राज्यभरातील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारमुळे देशातील संविधान कसे धोक्यात आहे? हे नागरिकांना पटवून देण्याचा प्रयत्न झाला होता. लोकसभा निवडणुकीच्या निकालात मविआला जास्त जागा मिळाला. त्यात निर्भय बनोचे योगदान होते.

दरम्यान राज्यात येत्या विधानसभा निवडणुकीतही मविआला निर्भय बनोकडून बिनशर्थ पाठिंब्याची आशा आहे. परंतु नागपुरातील प्रेस क्लबमध्ये मंगळवारी झालेल्या पत्रकार परिषदेत ॲड. आसीम सरोदे व विश्वंभर चौधरी यांनी मविआकडे पाठिंब्यासाठी काही अटी ठेवल्या आहेत.

ॲड. सरोदे म्हणाले, सध्या मविआचे सरकार सत्तेवर येण्याचे संकेत आहे. त्यासाठी राज्यातील विद्यमान संविधान विरोधी व सर्व नियम धाब्यावर बसवणाऱ्या सरकारबाबत सर्वसामान्यांपर्यंत माहिती जायला हवी. त्यामुळे आम्ही प्रयत्न करू. परंतु सत्तेवर आल्यावर मविआने सर्वसामान्यांना न्याय देण्यापासून दूर जाऊ नये म्हणून काही अटी ठेवत आहोत. त्यानुसार मविआची सत्ता आल्यास त्यांनी नागरिकांना केवळ सत्य सांगावे, येथे धर्मांध वातावरण नसावे, पर्यावरण, आरोग्य, शेती, यासह गरीब व मध्यमवर्गीयांना न्याय द्यावा.

राज्यपाल नियुक्त सात आमदारांच्या विषयावरही त्यांनी राज्यपालांच्या भूमिकेवर आक्षेप नोंदवत टीका केली. तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोशियारी यांनी त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांनी आमदार नियुक्तीसाठी यादी दिल्यावरही काही केले नाही. परंतु आता विद्यमान सरकारने यादी दिल्यावर त्याची शहानिषा न करताच तातडीने शपथविधी पूर्ण केला आहे. हे चुकीचे असल्याचेही सरोदे म्हणाले.

महासागर

नागपूर वृत्तसागर

■ बुधवार, दि. १६, ऑक्टोबर २०२४ ■

# जयस्वालांच्या उमेदवारीमुळे भाजपात कलह

## ■ बैठक घेऊन उमेदवारीला विरोध, लोकसभेची पुनरावृत्ती होण्याचा दिला इशारा ■

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १५ :**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने रामटेक लोकसभेची जागा गमावल्यानंतर येथे विधानसभेतही दमछाक होण्याची चिन्हे आहेत. शिंदे यांनी रामटेक विधानसभेचा उमेदवारी जाहीर करताच भाजपने त्याच्याविरोधात मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे.

भाजपचे माजी आमदार मल्लिकार्जून रेड्डी आणि भाजप रामटेकमधील पदाधिकाऱ्यांनी आशिष जयस्वाल यांच्या उमेदवारीला कडाडून विरोध केला आहे. जयस्वाल यांची उमेदवारी रद्द करण्याची आग्रही मागणी केली आहे.

सोबतच त्यांनी जयस्वाल यांची उमेदवारी कायम राहिल्यास लोकसभा निवडणुकीची पुनरावृत्ती विधानसभेतही होईल, असा इशारा भाजपच्या काही प्रमुख पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

महायुतीमध्ये रामटेकची जागा शिवसेनेला (एकनाथ शिंदे) मिळाली आहे. शिवसेनेने येथे अपक्ष आमदार आशिष जयस्वाल यांना उमेदवारी दिली आहे. आशिष जयस्वाल मूळचे शिवसैनिक आहे. परंतु, त्यांनी गेल्या निवडणुकीत बंडखोरी केली आणि अपक्ष म्हणून निवडणूक लढली.

एकनाथ शिंदे यांनी जायस्वाल यांना उमेदवारी जाहीर करताच रामटेक भाजपचे पदाधिकारी बिथरले आहेत. २०१९ मध्ये युती धर्म न पाळणाऱ्याला उमेदवारी देण्याबाबत त्यांचा तीव्र विरोध आहे. भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी जयस्वाल यांची उमेदवारी रद्द करण्याची आग्रह मागणी केली आहे.





असे न झाल्यास अनेक पदाधिकाऱ्यांनी भाजपच्या सदस्यत्वाचा राजीनामा देण्याची आणि जयस्वाल यांना पराभूत करण्यासाठी ताकद लावण्याचे संकेतही दिले आहेत. त्यामुळे लोकसभेत रामटेक गमावणाऱ्या शिवसेनेची (शिंदे) विधानसभेत भाजपकडून दमछाक होण्याची चिन्हे आहेत.

### भाजपात पडसाद

आमदार आशिष जयस्वाल यांनी रविवारी शिवसेनेत (शिंदे) प्रवेश केला. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पारशिवनी येथील सभेत त्यांची उमेदवारी जाहीर केली होती. शिंदे यांनी जयस्वाल यांची उमेदवारी जाहीर करताच रामटेक भाजपमध्ये पडसाद उमटले. भाजपने पदाधिकाऱ्यांनी समाज माध्यमांवर जयस्वाल यांच्या उमेदवारीला विरोध दर्शवला.

त्यानंतर त्यांनी सोमवारी बैठक बोलावली होती. या बैठकीला माजी आमदार मल्लिकार्जून रेड्डी, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. राजेश ठाकरे, जिल्हा उपाध्यक्ष संजय मुलमुले उपस्थित होते.

दुसरीकडे, ॲड. आशिष जयस्वाल यांच्या उमेदवारीमुळे भाजपात नाराजी असली तरी, भजापाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार रेड्डी आणि पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांची समजूत काढणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### ...तर पदाधिकारी व कार्यकर्ते राजीनामा देणार

रामटेक तालुक्यातील मनसर येथील भाजपच्या कार्यालयात प्रमुख पदाधिकाऱ्यांची नुकतीच बैठक झाली. त्यात रामटेकची जागा भाजपने लढवावी, अशी भूमिका मांडण्यात आली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना पदाधिकाऱ्यांच्या भावना कळवण्याचा निर्णय घेतला आहे. जयस्वाल यांची उमेदवारी कायम राहिल्यास रामटेक विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्ते भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचे राजीनामे देतील. सर्व पदाधिकाऱ्यांनी रामटेक येथील शांती मंगल कार्यालयात त्यांचे राजीनामे घेऊन हजर राहण्याची सूचना देखील यावेळी देण्यात आली.

# आधी विभीषणांना आवरा

विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. राज्यातील सत्ताधारी महायुतीला टक्कर देण्यासाठी महाविकास आघाडी अधिकच दंड, बैठका पेलू लागली आहे. पाच महिन्यापूर्वीच्या लोकसभा निवडणुकीतील विजयामुळे आघाडीचे विशेषतः काँग्रेसचे नेते अधिकच फॉर्मात दिसतात. त्याचाच परिणाम म्हणून की काय? नागपुरातील विधानसभेच्या सर्व ६ जागा काँग्रेस लढणार... असे काँग्रेसचे शहराध्यक्ष तथा पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी ठासून सांगितले आहे. आघाडीतील मित्र पक्षांपैकी कुणी किती आणि कोणत्या जागा लढाव्या? हा त्यांचा प्रश्न आहे. मात्र, सर्व जागांवर दावा करताना, पक्षातील विभीषणांचे काय? हाही प्रश्न कायम राहतोच.





**चौसर**

**मनोज बागडे**

आठवडाभरापूर्वी आ. विकास ठाकरे यांनी पक्षाच्या एका सभेत बोलताना नाव न घेता काँग्रेसच्या काही नेत्यांवर आगपाखड केली. लोकसभा निवडणुकीत दिवसभर हे नेते आपल्या तंबूत असायचे आणि रात्री दुसरीकडे (भाजपाच्या आशियान्यात) जायचे, असे स्पष्ट सांगत विकासभाऊंनी त्यांची नाराजी व्यक्त केली. अर्थात, विकासराव बोलले त्यात चुकीचे असे काहीच नाही. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या ज्या कुणी विरोधकांना मदत केली असेल त्यांनी पक्षाच्या जुन्या परंपरेचा निर्वाह केला, एवढेच. हे विभीषण कोण? याची माहितीही आमदार महोदयांकडे असलीच पाहिजे.

आता विधानसभेला हा ट्रेंड कायम राहू नये, आपल्याच पक्षाच्या उमेदवारांसाठी या कथित विभीषणांनी प्रामाणिक काम करावे, या हेतूने विकासभाऊंनी जाहीर सभेत कान टोचले असावेत. नागपूर शहरात विधानसभेचे ६ मतदारसंघ असून, देवेंद्र फडणवीस, मोहन मते, कृष्णा खोपडे आणि मोहन मते हे भाजपाचे चार आमदार आहेत. दुसरीकडे, स्वतः विकास ठाकरे आणि डॉ. नितीन राऊत हे दोन काँग्रेसचे आमदार आहेत. आघाडीतील शरद पवार आणि उद्धव ठाकरे तसेच महायुतीमधील शिंदे गट आणि अजित पवार यांच्याकडे या शहरात सद्ध्यातरी भोपळा आहे.

लोकसभा निवडणुकीत भाजपाचे हेवीवेट नेते नितीन गडकरी यांनी फाईट देता यावी म्हणून पक्षाने आ. विकास ठाकरे यांना रणांगणात उतरवले होते. विकासभाऊ संपूर्ण ताकदीनिशी लढले देखील. परंतु, पराभवाचा सामना करावा लागला. याचे शल्य त्यांना अद्यापही बोचत असावेच. दहा, बारा खोके गेल्याने जखम टीस टीस तर करणारच. मात्र, यापेक्षा आपल्याच लोकांनी केलेली गद्दारी पचवणे अवघड आहे. म्हणूनच की काय? विकासभाऊंनी भर सभेत भडास काढली असली पाहिजे.

नागपूरच्या रविभवन येथे विधानसभा निवडणुकीसाठी नागपूर शहर व जिल्ह्यातील काँग्रेस इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती झाल्यात. निरीक्षक म्हणून आलेले प्रदेश कार्याध्यक्ष आरिफ नसीम खान यांनी मुलाखती घेतल्या. काही ईच्छूक आलेत, तर जुगाड करून हमखास तिकीट मिळेल म्हणून काहींनी दांडी मारली. आता जे मुलाखतीला आलेच नाही, त्यांना पक्ष तिकीट देणार असेल तर मग हा मुलाखतीचा फार्स असल्याचे कार्यकर्ते म्हणालेत. नागपुरातील सहा विधानसभा मतदारसंघासाठी ६० इच्छूक आले होते, अशी माहिती आहे.

भाजपाचे आमदार असलेल्या विकास कुंभारे यांच्या विरोधात मध्य नागपूर मतदारसंघातून लढण्यासाठी काँग्रेसच्या ३० जणांनी उमेदवारी मागितली आहे. दक्षिण-पश्चिम मधून फडणवीस यांच्या विरोधात लढण्यासाठी काँग्रेसमध्ये इच्छुकांची मोठी यादी असल्याचे विकास ठाकरे सांगतात. मध्य नागपूरचे ठीक आहे. परंतु, फडणवीसांच्या विरोधात काँग्रेसच्या पहेलवानाला अधिकच तेल लावून उतरावे लागणार आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसमध्ये ईच्छुकांची गर्दी आणि तयारी हे पक्षासाठी चांगले संकेत नक्कीच मानता येतील. पण, विभीषणांचे काय? स्वतः विकास ठाकरे यांनी पूर्वी सांगितल्याप्रमाणे, यावेळीही हे विभीषण घरभेदी म्हणून सुरूंग लावणार नाहीत? याची शाश्वती कोण देणार?

आमदार विकासभाऊंनी नागूपर शहरातील सहाच काय, जिल्ह्यातील सर्व १२ ही जागांवर दावा ठोकावा. तथापि, आधी पक्षातील विभीषणांचा बंदोबस्त करणे, उमेदवार आणि पक्ष दोघांसाठी फायद्याचे ठरेल.

# भाजपाच्या जाहीरनाम्यात ३१ मुद्यांवर काम

## लोक सूचनांचाही समावेश : धनंजय महाडिक यांची माहिती

**नागपूर :** भाजपने महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाच्या जाहीरनामासाठी ३१ वेगवेगळ्या मुद्द्यांवर काम सुरू केले आहे. भाजपच्या जाहीरनाम्यात नागरिकानाही त्यांचे मुद्दे समाविष्ट करता येणार आहे. असे भाजपचे खासदार धनंजय महाडीक यांनी येथे पत्रकार परिषदेत सांगितले. आतापर्यंत पक्षाकडे तब्बल ५० हजार सूचना आल्याचाही दावा त्यांनी केला. याप्रसंगी भाजपचे प्रवक्ते चंदन गोस्वामी, शहर अध्यक्ष बंटी कुकडे, अश्विनी जिचकार उपस्थित होत्या.



धनंजय महाडिक म्हणाले, येत्या विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाकडून जाहीरनामा प्रसिध्द करण्यात येणार आहे. . जाहीरनाम्यात जनतेच्या अपेक्षा आणि सूचनांचाही विचार होणार असून जनतेने आपल्या सूचना, अपेक्षा आणि मते पक्षापर्यंत पोहचवावी.

भाजपने महायुती सरकारच्या माध्यमातून नारीशक्तीच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना, ३ गॅस सिलेंडर मोफत यासह अनेक योजना यशस्वी केल्या. युवा विकासासाठी कौशल्य विकास, युवतींना मोफत उच्च शिक्षण अशा योजना आणल्या. गरीब कल्याणासाठी मोफत शिक्षण, व्यवसायासाठी अनुदान, आनंदाचा शिधा योजना योजना यशस्वी केली. शेतकऱ्यांसाठीही अनेक योजना आणल्या. उद्योग वाढावेत, परकीय गुंतवणूक राज्यात यावी, यासाठी प्रयत्न होत आहे. महामार्ग, पुलाची उभारणी, मेट्रोचे जाळे, विमानतळांचा विकास, धरणांच्या कामाची पुर्तता, याबाबत काम सुरू आहे.

जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, शेतकऱ्यांसाठी कृषी सौर योजना, दुधाळ जनावरांसाठी अनुदान आणि लसीकरण, मुक्त गोठा योजनेला प्रोत्साहन, खतांवरील सबसिडी, मत्स्यबीज उपलब्धता, मत्स्य शेतीला प्रोत्साहन अशा अनेक मुद्द्यांवर भारतीय जनता पक्ष जाणीवपूर्वक काम करत आहे.

इतरही सगळ्याच क्षेत्रात पक्षाकडून विकासाचे काम सुरू आहे. दर्जेदार रस्ते, ग्रीन फिल्ड महामार्ग, विमानतळांची उभारणी, विमान सेवेचा विस्तार, रेल्वे मागार्चे दुहेरीकरण आणि इलेक्ट्रीकीकरण, रेल्वे स्थानकांचे सुशोभिकरण, वंदे भारतसह नव्या रेल्वे गाड्यांची निर्मिती, प्रवाशांना आरामदायी सुविधा, मेट्रो रेल्वेचे विस्तारीकरण, उपनगरीय रेल्वेचे बळकटीकरण, जलमार्गे वाहतुक वाढावी, यासाठीचे प्रयत्न सुरू आहेत.

शहरी विकासासह इतरही सर्वच क्षेत्रात काम सुरू आहे. वरील मुद्यांशिवाय अन्य काही मुद्दयांचा भाजपच्या जाहीरनाम्यात समावेश व्हावा, असे वाटत असेल तर नागरिकांनी आपल्या सूचना, अभिप्राय २५ ऑक्टोंबरपर्यंत द्याव्या असेही महाडिक म्हणाले.

# सिहोरा, वाघधरे वाडीमध्ये धुमाकुळ घालणाऱ्या वाघाचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. १५ :**

नगरपरिषद अंतर्गत कन्हान नदी काठालगत सिहोरा गावात एका आठवडयात चार गाई ठार करून तीन गौवंशाला जख्मी करून कन्हान परिसरात दहशत निर्माण करणारा वाघ्र एका धानाच्या शेतात मृत आढळल्याने परिसरात चांगलीच खळबळ उडाली. वाघाचा मुत्यु झाल्याने प्राणी व मनुष्य जीवहानी ठळल्याने कन्हान परिसरातील नागरिकांनी बघण्यास चांगलीच गर्दी करून वाघाच्या भिती पासुन मुक्तता मिळाल्याचे समाधान व्यक्त केले.

मंगळवार (दि.१५ ) ऑक्टोंबर ला दुपारी नगर परिषद अंतर्गत कन्हान नदी काठा लगत सिहोरा गावातील चार गाई ठार करून तीन गौवंशाला जखमी करणारा वाघ हा वाघधरे वाडी दाट लोकवस्तीला लागुन नागपुर बॉयपास राष्ट्रीय चारपदरी महामागार्पासुन ८० मिटर अंतरावर तारसा रोड वरील खंडाळा शिवारातील सचिन राधेशाम हटवार यांच्या घरामागिल रेल्वे लाईनकडे असलेल्या निलेश राधेश्याम हटवार यांच्या धानाच्या शेतात कापसाच्या धु-या लगत मृत अवस्थेत आढळला.

याची माहीती शेत मालकाने वन विभागास दिल्याने पार शिवनी वन परिक्षेत्र अधिकारी ए.बी. भगत, वनपाल बिडी वरखडे, वनरक्षक एन के मेश्राम सह वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहचुन एनटीसीए च्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करून पंचनामा आणि अन्य कागदपत्र कार्यवाही करून मृतदेह टीटीसी येथे शवविच्छेदना करिता पाठविण्यात आला आहे.



मृत वाघाच्या परिसरात काही संशयास्पद आढळते काय, या दृष्टीने चौकशी सुरू आहे. मृत्यूचे मुख्य कारण पोस्टमॉर्टेम अहवालानंतर स्पष्ट होईल. शवाची उत्तरीय तपासणी उद्या बुधवार (दि.१६) ला सकाळी १० वाजता नागपुर येथे करण्यात येणार आहे. फोरेन्सिक अहवाल प्राप्त झाल्यानंतर तसेच पुढील तपास केल्यानंतर मृत्यूचे कारण लक्षात येईल.

# उड्डाण पुलांचा घोळात घोळ

**नागपूर :** शहरातील गजबजलेला परिसर म्हणून संविधान चौक, एलआयसी चौक, कस्तुरचंद पार्क, मोहिनी कॉम्पलेक्स आणि स्मृती टॉकिज चौकांची ओळख आहे. या परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून तीन उड्डाणपूल निर्माण करण्यात आले. काटोल नाका चौकातून सुरु होणारा उड्डाणपूल सदरमधील कस्तुरचंद पार्कसमोर उतरतो. त्यामुळे उड्डाणपुलावरून येणारी सर्व वाहने संविधान चौक किंवा यू-टर्न घेऊन सदरमध्ये जातात. तर मेयो रुग्णालयापासून सुरू होणारा उड्डाणपूल संविधान चौकात उतरतो तर एका बाजूने एलआयसी चौकात पुलाची लँडिंग आहे.

नुकताच ऑटोमोटिव्ह चौक, कामठी, रामटेक आणि जबलपूरकडून येणाऱ्या वाहनांना शहरात पोहचण्यासाठी नवीन उड्डाणपूल तयार करण्यात आला. त्या पुलाचे उद्घाटन नुकतेच झाले. त्या उड्डाणपुलाची लँडिंग सुद्धा एलआयसी चौकात आहे. त्यामुळे संविधान चौक-एलआयसी चौक किंवा कस्तुरचंद पार्क चौकात तीन उड्डाणपुलांची लँडिंग असल्यामुळे शहरातील तीन बाजूने येणारी वाहने याच परिसरातून जातात. त्यामुळे या परिसरात दिवसभर वाहनांची गर्दी असते. या तीनही चौकात वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी निर्माण झाला आहे.

# राज्यात आरक्षण उपवर्गीकरण होणार

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १५ :**

अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याचा अधिकार घटक राज्यांना आहे, असा निर्णय पंजाब विरुद्ध देवेंद्रसिंग खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. त्याआधारावर राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामधील निदेर्शानुसार अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे असलेल्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने यासंदर्भात निर्णय प्रसिद्ध केला असून समितीला तीन महिन्यात अभ्यास करून शिफारशी शासनाला सादर करायच्या आहेत.

### अभ्यासासाठी सरकारकडून समिती

अनुसूचित जातीसाठी असलेले आरक्षण देताना त्यात वर्गीकरण करण्याचा अधिकार राज्यांना असल्याचा महत्त्वपूर्ण निकाल ऑगस्ट महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. हा निकाल देताना सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील सात सदस्यीय घटनापीठाने अनुसूचित जाती हा एकसंध गट नसून त्यातील विविध जातींमध्ये विषमता असल्याचे निरीक्षण नोंदवले होते. या निकालाचा आधार घेत राज्य सरकारने अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी पाटणा उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली. समितीच्या सदस्य सचिव म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या निबंधक (बार्टी) इंदिरा आस्वार काम पाहणार आहेत.

न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचे अधिकार राज्य शासनास प्राप्त झाले आहेत. अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याच्या दृष्टीने तत्त्वे, निर्देश यासंदर्भात सविस्तर माहिती संकलन करणे, तथ्यांची छाननी करणे, उपवर्गीकरणाची प्रक्रिया निर्धारित करणे, उपवर्गीकरणाची आवश्यकता सिद्ध करणे व त्या अनुषंगाने उपवर्गीकरणाचा प्रारूप आराखडा शासनास सादर करण्यासाठी ही समिती गठित करण्यात आल्याचे शासन निणार्यात नमूद आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर सविस्तर चर्चा झाली. राज्यघटनेत अनुसूचित जाती आणि जमाती यांच्या आरक्षण व्यवस्थेत क्रिमीलेयरची तरतूद नसल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. यानंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषद घेतली व सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या राज्यघटनेला आमचे सरकार बांधील आहे. या संविधानात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आरक्षणात क्रिमीलेयरची तरतूद नाही.

### समिती काय करणार?

* सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा सविस्तर अभ्यास.
* राज्यातील अनुसूचित जातींची सविस्तर यादी तयार करून अभ्यास.
* ज्या राज्यांनी अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण केले आहे किंवा न्यायालयाच्या निर्णयानंतर उपवर्गीकरणाची प्रक्रिया सुरू केली आहे त्या राज्यांच्या प्रशासकीय तसेच वैधानिक कार्यवाहीच्या माहितीचे संकलन करून अभ्यास.
* अभ्यासाअंती अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या दृष्टीने करावयाच्या पुढील प्रक्रियेचे प्रारूप निर्धारित करणे.

# २० ते ४० वयोगटाच्या महिलांना मिळणार पिंक ई-रिक्षाचा लाभ

## मनपा दहाही झोन कार्यालयात अर्ज सादर करावे

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १५ :**

गरजू व होतकरू महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, तसेच महिलांना सुरक्षित प्रवास करता यावा याकरिता राज्य सरकारने पिंक ( गुलाबी ) ई-रिक्षा योजना सुरू केली आहे. जिल्हा महिला व बालविकास विभागाने इच्छुक महिलांकडून अर्ज मागविले असून, वय वर्ष २० ते ४० च्या महिलांना पिंक ई-रिक्षाचा लाभ घेता येणार आहे.

योजनेचे अर्ज नागपूर महानगरपालिकेच्या दहाही झोन निहाय कार्यालयात स्वीकारण्यात येत आहेत. तरी इच्छुक महिलांनी राज्य शासनाच्या पिंक (गुलाबी) ई- रिक्षा योजनेसाठी अधिकाधिक संख्येत अर्ज करीत योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे.

जिल्हा महिला व बाल कल्याण विभागाद्वारे नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीत ही योजना यशस्वीपणे राबविण्यात येणार आहे. राज्यातील महिला व मुलींना पुरेशा सोयी सुविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीस चालना मिळावी, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुर्नवसन व्हावे, होतकरू मुली व महिलांना स्वावलंबी आत्मनिर्भर करणे, माहिलांना व मुलींना सुरक्षित प्रवास करता यावा. या उद्देशाने राज्य सरकारने ही योजना अंमलात आणली आहे. योजनेंतर्गत गरजू महिलांना रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य व चालविण्यासाठी इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

पिंक ( गुलाबी ) ई रिक्षा योजनेसाठी पात्रता निकष ठरविण्यात आले आहेत. योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक महिला ही महाराष्ट्र राज्याचे रहिवास असायला हवी, त्यांचे वैयक्तिक बँक खाते असायला हवे, लाभार्थी कुंटुबाचे वार्षिक उत्पन्न 3 लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे, विधवा, कायद्याने घटस्फोटित,अनाथ प्रमाणपत्र प्राप्त युवती, अनुरक्षणगृह / बालगृहातील आजी /माजी प्रवेशित इत्यादींना प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच दारिद्यं रेषेखालील महिला देखील प्राधान्य दिले जाणार आहे.

इच्छुक महिलेचे वय किमान २० ते ४० वर्ष इतके असावे, त्यांच्याकडे वाहन चालक परवाना असावा, योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल तसेच ढश्अ इअऊॠ निवड झालेल्या एजन्सीद्वारे दिले जाईल. अंतिम मंजुरीनंतर वाहन खरेद्री करीता ७० टक्के रक्कम कर्ज करीता बँकेत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करेल. परमिट व वाहन चालक परवाना मिळाल्यानंतर महिला व बाल विकास अधिकारी मार्फत २० टक्के रक्कम वाहन पुरवठा एजन्सीला देण्यात येईल.

लाभार्थी 10 टक्के रक्कम आर्थिकभार स्वतः देईल, 70 टक्के कजार्ची परतफेड 5 वर्षात करेल, इच्छुक महिलांनी जिल्हा महिला व बाल कल्याण कार्यालयात अर्ज करायचे आहे.

याकरिता लाभाथीर्चे आधार कार्ड व पॅन कार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र, कुंटुब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न दाखला रु. 3.00 लाखापेक्षा कमी), बँक खाते पासबुक, पासपोर्ट आकाराचा फोटो, मतदार ओळखपत्र, रेशनकार्ड, चालक परवाना, हमीपत्र, अटी शर्ती पालन हमीपत्र ही कागदपत्र आवश्यक असणार आहे.

# विवेक विचार मंचच्यावतिने सामाजिक संवाद मेळावा

## काँग्रेसच्या राजवटीत अनेकदा घटना दुरुस्ती करण्यात आली : ॲड. संदीप जाधव

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. १५ :

काँग्रेस पक्ष केन्द्रात सत्तेत असतांना ८० वेळा घटना दुरुस्ती करण्यात आल्याचे सांगुन ते पुढे म्हणाले डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना पराभूत करण्याचे षडयंत्र काँग्रेस पक्षानेच रचल्याचे ॲड संदीप जाधव यांनी सांगितले.



भारतरत्न प. पू. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विचार मंच तालुका सावनेर वतीने दहेगांव येथील श्रीकृष्ण मंगल कार्यालय येथे सोमवार ला भारतीय संविधान अमृत महोत्सवा निमित्त सामाजिक संवाद मेळावा पार पडला. या मेळाव्याला उद्घाटन महेश पोहनेरकर सचिव विवेक विचार मंच, पुणे यांच्या हस्ते पार पडले. तर यावेळी ॲड. संदिप जाधव संविधान अभ्यासक, मुंबई सुनील कीटकरू प्रांत संयोजक विदर्भ माजी जिप सदस्य सुरेन्द्र शेंडे, माजी नगरसेवक सुजीत बागडे सरपंच सम्राट गजभिये प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी अनुसूचित जाती व जमाती आणि वंचित घटकांचे प्रश्न, सद्यस्थिती, भारतीय संविधान, सामाजिक न्याय व शासकीय योजना या विषयावर मान्यवरांनी उपस्थितीतांना समजेल असे मोलाचे मार्गदर्शन केले मेळाव्याचे प्रास्ताविक समाजसेवी विलास ठाकरे, संचालन हरीश इंदुरकर व आभार प्रदर्शन आभारप्रदर्शन अभय मडके यांनी केला.

कार्यक्रमाचा यशस्वीतेसाठी मनीष मेश्राम, चंद्रशेखर पानतावणे, सुरेंद्र शेंडे, रुपेश बागडे, दादाराव लांजेवार, सीताताई गजभिये, मायाताई शंभलकर, भारतीताई आठणकर, राजेश कापसे, होमेश्वर डोंगरे भिमराव पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाला दलीत आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते उपस्थित होते. मेळाव्याची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# चांगला समाज घडविण्यासाठी प्रयत्न करा : समीर मेघे

## वाडीत रावण दहन कार्यक्रम



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १५ :

प्रभु श्रीरामचंद्रानी समाजातील सर्व घटकांना संघटीत करुन विजयाचा मंत्र दिला.आजही समाजातील सर्व घटकांनी एकत्रीत पणे येऊन चांगला समाज घडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन आमदार समीर मेघे यांनी केले.

दत्तवाडीतील गजानन सोसायटीच्या क्रिडा मैदानावर शनिवार १२ ऑक्टोबर रोजी रावण दहन कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.रावण दहनासाठी गजानन सोसायटी क्रीडांगणावर रावणाच्या पुतळ्याची प्रतिष्ठापना करण्यात आली. येथे राम, लक्ष्मण आदी धार्मिक वेशभूषा केलेली मुले आकर्षणाचे केंद्र ठरली. आमदार समीर मेघे यांच्या उपस्थितीत रावण दहन करण्यात आले.वानर सेनेतर्फे राम रावणाची लढाईही सादर करण्यात आली.

कार्यक्रमात फटाके हे आकर्षणाचे केंद्र होते. आयोजनासाठी मानसिंग ठाकूर, सतीश जिंदल, लोकेश जिंदल, नवरंग कश्यप, अनिल भाटिया, अभय कुणावर आदींनी सहकार्य केले. यावेळी हर्षल काकडे ,राजेश जैस्वाल, प्रेम झाडे, संतोष केचे, विजय मिश्रा, अखिल पोहनकर, मोहन पाठक, बबलू ढाकरिया केशव बांदरे, चंदन सुथार, मनोज सिंह, सुनील सिंह, कैलाश मंथापुरवार, भीमराव भोरकर, रामनिवास अग्रवाल, सुरेश सिरस्वार, बबलू केसरवाणी, प्रकाश जुनघरे, सुधीर सिंग राणा, देवेन बोरकर, हिम्मत गडेकर उपस्थित होते.

# काटोल विधानसभा मतदारसंघातील सर्व बसस्थानके अद्यावत करणार : सलील देशमुख



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. १५ :

विधानसभा मतदार संघातील काटोल, जलालखेडा, नरखेड, कोंढाळी येथील बस स्थानकावर अद्यावत सोई सवलती असव्या, या करिता काटोलचे आमदार व माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी कोंढाळी, काटोल, नरखेड, जलालखेडा या प्रवासी बस स्थानकांवर अद्यावत सोई सवलती उपलब्ध रहाव्यात, या करिता सतत प्रयत्नशील असतात. या करिता मागील २०२१ मध्ये चार ही बसस्थानक व काटोल डेपो मधे सुधारणा करून घेण्यासाठी एकूण १७ कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता.

पुढे महाविकास आघाडीचे सरकार कोसळले व महायुती सरकार राज्यात आले. काटोल विधानसभा मतदारसंघातील काटोल, नरखेड, कोंढाळी, जलालखेडा येथील बसस्टेशन अध्यावत करण्यासाठी मंजुर १७ कोटीचा विकास निधी निर्गमित करण्यात यावा, म्हणून जि.प. सदस्य सलील देशमुख यांनी एसटी महामंडळाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व एमडी पर्यंत सतत पाठपुरावा करण्यात आला.

मात्र महायुती सरकार कडून राज्यातील विरोधी पक्षांचे आमदार व त्यातही काटोल विधानसभा मतदारसंघाचे आमदार अनिल देशमुख यांचे मतदार संघातील सर्व बसस्थानकांचे अद्यावतन नीधी सुडभावनेतून शेवट पर्यंत निर्गमित केले नव्हते. या करिता सलील देशमुख यांनी सतत पाठपुरावा चालूच ठेवला. अखेर जिप सदस्य सलील देशमुख यांचे सतत पाठपुरावा फळाला आला आहे.

यात काटोल, कोंढाळी, नरखेड, जलालखेडा येथील बस स्थानकावर अद्यावत सोई सवलती साठी निवेदा काढण्यात आलेल्या असून जलालखेडा बस स्थानकाचे कामाला प्र मा ही मिळाली आहे. बहूदा सर्व बसस्थानकांचे अद्यावतनाची कामे निवडणूकी नंतर सुरू होतील असे सांगितले जाते.

एस.टी. कर्मचारी, चालक-वाहक यांच्यापण अडचणी असतात. चालक-वाहकांसाठी येथील बसस्थानके अद्ययावत असावे. एस.टी. कर्मचाऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी नेहमी त्यांच्या समस्यां समजून घेणे गरजेचे आहे. लालपरी ही गरिबांची जीवनवाहिनी आहे. विद्यार्थ्यांसाठी तर ज्ञानार्जन वाहिनी आहे. सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी एस.टी. बसने प्रवास करतात. त्यामुळे चालक-वाहकांवर मोठी जबाबदारी असते.

ती जबाबदारी चालक वाहक पार पाडत असतात. महामंडळाच्या अधिकार्यांनी चालक, वाहक, यांत्रिकी, व सफाई या विभागातील कामगारांचे प्रश्न निकाली काढण्यात यावे. कोंढाळी येथील बसस्थानकावर व्हेदर शेड, वाहन तळावर सिमेंटीकरण, सर्व फलट हे अतिशय यात प्रतीक्षालय, तिकीट आरक्षण कक्ष, उपहार गृह, चालक -वाहक कक्ष, विश्रांतीगृह, महिला विश्रांती गृह, अधिकारी कक्ष, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह आदींचे बांधकाम करण्यासाठी विकास निधी मंजूर झाला आहे. याचप्रकारे काटोल जलालखेडा, नरखेड व अन्य प्रतिक्षालये दुरूस्ती करण्यात येणार, असे जिप सदस्य सलील देशमुख यांनी सांगितले. जिप सदस्य सलील देशमुख यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. याकरिता कोंढाळी, काटोल, जलालखेडा, नरखेड येथील नागरिकांनी सलील देशमुख यांचे आभार मानले आहे.

# डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना महावितरणचे अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

भारताचे माजी राष्ट्रपती आणि प्रख्यात वैज्ञानिक मिसाईल मॅन' डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त महावितरणतर्फे त्यांना अभिवादन करण्यात आले.

महावितरणच्या काटोल मार्गावरील विद्युत भवन कार्यालयात मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी भारताच्या अंतराळ कार्यक्रमात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले, माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन त्यांच्या पावन स्मृतीस अभिवादन केले.

यावेळी अधीक्षक अभियंता सर्वश्री राजेश नाईक, मंगेश वैद्य, संजय वाकडे, मधुकर घुमे, कार्यकारी अभियंता समीर शेंद्रे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, प्रणाली विश्लेषक समिधा लोहरे, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर यांच्यासह महावितरण आणि महानिर्मितीचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती साजरी

**नागपूरः** विज्ञान शैक्षणिक क्षेत्रात बहुमोल योगदान देणारे युगपुरुष व "मिसाईल मॅन" भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न स्व. डॉ.ए. पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त तैलचित्रास आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी म.न.पा. केन्द्रीय कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज नवीन प्रशासकीय इमारतीतील दालनात माल्यार्पण करुन अभिवादन केले. या प्रसंगी अति. आयुक्त आँचल गोयल, उपायुक्त विजया बनकर, उपायुक्त गजेंद्र महल्ले, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी प्रामुख्याने उपस्थित होते.

# सिव्हिल लाईन्स वॉकर स्ट्रीट येथील स्मार्ट टॉयलेटचे लोकार्पण




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

नागपूर महानगरपालिकेद्वारे सिव्हिल लाईन्स येथील वॉकर स्ट्रीट परिसरातील स्मार्ट स्वच्छतागृहाचे मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते सोमवारी (ता:१४) लोकार्पण करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर,मनपाच्या अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल, उपायुक्त प्रकाश वराडे, डॉ. गजेंद्र महल्ले, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता (स्लम) कमलेश चव्हाण, देवेन्द्र भोवते, वॉकर्स क्लबचे प्रशांत उगेमुगे, दिनेश नायडू प्रवीण काळे राहुल घरोटे संजय चौरसिया, ब्रिजेश साहू, अभिषेक ठाकूर देवेन अग्रवाल, मनपाचे कनिष्ठ अभियंता मनोज रंगारी सचिन चावटे, अरुण पेठेवार, कंत्राटदार श्रीमो कन्स्ट्रक्शनचे कपिल गुप्ता, राजीव चौधरी प्रामुख्याने उपस्थित होते.

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात आलेले स्मार्ट टॉयलेट अत्याधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण असे आहे. स्मार्ट टॉयलेट वातानुकूलित असून, महिलांसाठी दोन प्रसाधनगृहे व चेंजिंग रूम तर पुरुषांसाठी तीन मुतारी व दोन शौचालयाची सोय आहे. या स्वच्छतागृहाला सेन्सारवर आधारित स्मार्ट प्रवेशद्वार असून ते उघडण्याची वा बंद करण्याची गरज नाही.

प्रसाधनगृहाच्यावर सोलर पॅनल बसविण्यात आले आहेत. तसेच तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी रेस्ट रूम ची सोय देखील स्मार्ट टॉयलेट मध्ये आहे.

याशिवाय हँड ड्रायर, वॉश बेसिनची महिलांसाठी सुविधा करण्यात आली आहे. स्वच्छतेसोबतच संपूर्ण परिसर सुंदर असावे यासाठी प्रवेशद्वारावर झाडे लावण्यात आलेले आहेत.

मनपाच्या या स्मार्ट स्वच्छतागृहामध्ये मुतारीचा वापर निःशुल्क असून शौचालयाच्या वापरासाठी ७ रुपये, थंड पाण्याने आंघोळीसाठी २० रुपए आणि गरम पाण्याने आंघोळीसाठी ३० रुपये शुल्क निर्धारित करण्यात आलेले आहे. स्मार्ट स्वच्छतागृहाची योग्य देखरेख व्हावी याकरिता मनपाद्वारे स्वच्छतागृहाच्या वरच्या भागात देखरेख करणा-या कर्मचा-यासाठी खोली तयार करण्यात आलेली आहे.

***डायनासोर सेल्फी पॉईंट***

शेकडोच्या संख्येत लोक वॉकर स्ट्रीटवर प्रभात फेरीसाठी येतात यात काही चिमुकले देखील असतात, लहान मुलांकरिता मार्ट स्वच्छतागृहाच्या बाजूला आकर्षक असे डायनासोरचे सेल्फी पॉईंट लावण्यात आले आहे.


## जाहीर सुचना

सुचित किया जाता है कि मेरे पती श्री राजेश बाबूलाल मौर्य इनकी दिनांक १५.०७.२०२२ को मृत्यु हो गई. इनके नाम पर निम्न वाहन है – 2 Wheeler Honda ACTIVA 4G RTO Reg. No. MH-49 AN5708 Model 2017, Engine No. JF50EU5022109, Chassis No. ME4JF507BHU022044 है. उनके पश्चात उनकी वारस श्रीमती सरीता राजेश मौर्य (पत्नी) होने के नाते उपरोक्त वाहन मेरे नाम पर करवा रही हूं. जिस किसी को इस बारे में आपत्ती है वे अपनी आपत्तीयां ०७ दिनों के भीतर दर्ज करें. इसके बाद कोई आक्षेप मान्य नही होगा व हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण कर ली जायेगी.

नागपूर – दि. १६/१०/२०२४

**श्रीमती सरीता राजेश मौर्य**
र. जसवंत टॉकीज के पिछे, बुद्ध नगर आंबेडकर मार्ग, नागपुर.


# मनपा आस्था भिक्षेकरी पुनर्वसन केंद्रात आइएएसओडब्ल्युएतर्फे कपडे वाटप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

केंद्र शासन पुरस्कृत व नागपुर महानगरपालिका अंतर्गत आस्था भिक्षेकरी पुनर्वसन निवारागृहातील भिक्षेकऱ्यांचे जीवनमाण उंचवणेसाठी आईएएस ऑफीसर्स वाइफ एसोसिएशन नागपुर शाखेतर्फे कपडे, शाल, साडी, सलवार सूट्स आदीचे वाटप करण्यात आले. यावेळी आईएएस वाईफ एसोसिएशनच्या डॉ. अनुश्री चौधरी, प्रिया मीना, मनपा समाज विकास विभागचे उपायुक्त डॉ रंजना लाडे, सह्याद्री फाऊंडेशनचे संचालक देवेंद्र क्षीरसागर, विनय त्रिकोलवार, आस्था भिक्षेकरी पुनर्वसन प्रकल्पचे अधिक्षक गौतम नागरे, प्रकल्प व्यवस्थापक राकेश गाठे, तनीष खातकर आदि उपस्थित होते.



# डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांना भावपूर्ण श्रद्धांजली

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १५ :

साई इंटरनॅशनल स्कूल, शितलवाडी, रामटेक यांनी प्रख्यात शास्त्रज्ञ आणि भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त शालेय संमेलनात यशस्वीपणे आयोजन केले. विद्यार्थ्यांनी भाषणे दिली आणि प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या अंतराळ संशोधनाच्या विकासातील योगदानावर प्रकाश टाकला.

त्यांनी शाळेसोबत डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची रेखाचित्रेही शेअर केली. प्राचार्य राजेंद्र मिश्रा यांनी विद्यार्थ्यांना वाचन उपक्रमात सहभागी होऊन वाचनाची सवय लावण्यासाठी मार्गदर्शन केले. काही विद्यार्थ्यांनी डॉ कलाम यांचे चांगले अवतरण संकलित केले आणि त्यांनी त्यांचे व्हिडिओ शाळेसोबत शेअर केले. डॉ. एपीजे अब्दुल कलाम हे भारतीय अंतराळ शास्त्रज्ञ आणि राजकारणी होते ज्यांनी २००२ ते २००७ पर्यंत भारताचे ११ वे राष्ट्रपती म्हणून काम केले, त्यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडू येथील रामेवश्वर येथे मध्यमवर्गीय मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांनी भौतिकशास्त्र आणि एरोस्पेस अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले. शास्त्रज्ञ आणि विज्ञान प्रशासक म्हणून त्यांनी ४ दशके घालवली. ते भारताच्या नागरी अंतराळ कार्यक्रमात आणि लष्करी क्षेपणास्त्र विकासाच्या प्रयत्नांमध्ये आणि वाहन तंत्रज्ञान प्रक्षेपित करण्यात गुंतले होते.



त्यांना भारताचे मिसाइल मॅन म्हणूनही ओळखले जात होते. १९९८ मध्ये भारताच्या पोखरण-॥ अणुचाचण्यांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण संघटनात्मक, तांत्रिक आणि राजकीय भूमिका बजावली. ते "लोकांचे राष्ट्रपती" म्हणून ओळखले जात होते. त्यांना भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान, भारतरत्न यासह अनेक प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले होते. राष्ट्रपती भवन सोडल्यानंतर, डॉ. एपीजे अब्दुल कलाम है इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, शिलाँग, अहमदाबाद आणि इंदूर येथे भेट देणारे प्राध्यापक बनले.में २०१२ मध्ये, डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी भारतातील तरुणांसाठी "मी काय देऊ" चळवळ नावाचा एक कार्यक्रम सुरू केला, ज्याची मुख्य थीम भ्रष्टाचारावर मात केली होती.

डॉ कलाम यांच्यासाठी आयुष्यभर धर्म आणि अध्यात्म हे अत्यंत महत्त्वाचे होते. त्यांनी स्वतःचा आध्यात्मिक प्रवास हा त्यांच्या अंतिम पुस्तकाचा विषय बनवला, डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांना प्रसिद्ध ४० विद्यापीठांमधून ७ मानद डॉक्टरेट मिळाल्या. २०१५ मध्ये डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त. उइरए ने उइरए अभिव्यक्ती मालिकेत त्याच्या नावावर विषय सेट केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी १५ ऑक्टोबर २०१५ रोजी नवी दिल्लीतील DRDO भवन येथे डॉ कलाम यांच्या स्मरणार्थ टपाल तिकिटांचे प्रकाशन केले. शाळेचे संचालक डॉ. व्ही. बी. नागपुरे यांनी डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांना त्यांच्या जयंतीनिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.


## -: जाहिरनामा :-

कोर्ट विद्यमान सुनिल साळवे नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर शहर, यांचे कार्यालय, जिल्हा नागपूर.
Email: www.tahsildarngpcity@gmail.
Ph No. 0712-2561975
क.ली/प्रस्तु-२/तह.नाग (शहर)/प्र.क्र २४९/कावि -२/२०२४
दि.:०८/१०/२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि ५३५/२०२३ दिनांक १५.१०.२०२३ ५) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि १५८/२०२४ दिनांक ११.०५.२०२४ ६) प्रिती मधुकर इंगळे, वय-४७ धंदा-नोकरी, रा.जुना सक्करदरा, नागपुर यांचा अर्ज दिनांक ०३/१०/२०२४

ज्याअर्थी अर्जदार प्रिती मधुकर इंगळे, वय-४७ धंदा-नोकरी, रा.जुना सक्करदरा, नागपुर यांनी स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू नामे प्रिती मधुकर इंगळे यांचा जन्म दिनांक २७/०९/१९७८ रोजी डागा हॉस्पीटल येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २,३,४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

सुनिल साळवे
नायब तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी नागपूर

## जाहीर सूचना

आम जनतेस सुचित करण्यात येते की माझे पक्षकार श्री. नंदकिशोर धर्मदास अलोने व सुनिता नंदकिशोर अलोने हे दोघेही राहणार – प्लॉट क्रमांक १०२ आरमान रेसिडेन्सी महाल किल्ला रोड नागपूर यांच्या मालकीच्या स्थावर मालमत्ता व स्वतःच्या कब्जातील स्वतःच्या मालकीची खालील वर्णाची स्थावर मालमत्ता विकत घेण्याच्या करार टोकन बयाना पत्राचा लेख केलेला आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

मौजा नागपूर शिर २२१ न.भु.क्र ४२६१२ अरमान होम ड्रीम्स मधील पहिल्या माळ्यावरील गाळा आहे. वार्ड क्रमांक २६ घर क्रमांक २८४/१०२ याप्रमाणे आहेत. उपरोक्त स्थावर मालमत्तेचे बाबत कोणाचेही कोणत्याही कुठल्याही प्रकारचे विक्री, आदान प्रदान, गहाण, उत्तराधिकार, बक्षीस, ग्रहणाधिकार, गहाण, किंवा भाडेकरू, देखभाल, कब्जा, ताबा, मागणी, हितसंबंध किंवा इतर कुठलेही प्रकारचे आक्षेप अथवा करार असल्यास सूचना प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत खालील माझ्या पत्त्यावर कागदपत्रासह लेखी आक्षेपासह संपर्क साधावा. या मुदतनंतर कुणाचाही उजर , आक्षेप मान्य केला जाणार नाही व माझे पक्षकार विक्रीपत्र करून घेतील.

दि. १४-१०-२०२४
ॲड. एस. आर. तिवारी

# सहाव्या वेतन आयोगाच्या ५९ महिन्याच्या थकबाकीबाबत मनपा सकारात्मक

## आमदार सुधाकर अडबाले यांनी घेतली मनपा आयुक्तांसह समस्या निवारण सभा

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १५ :

शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची सहाव्या वेतन आयोगाची एकूण ५९ महिन्यांची थकबाकीची देयके प्रलंबित असल्याने मनपा शिक्षक - कर्मचाऱ्यांत नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे आमदार सुधाकर अडबाले यांनी घेतलेल्या बैठकीत सदर विषयावर मनपाने सकारात्मकतेने सदर विषय सोडवून मनपा कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी केली. यावर सहाव्या वेतन आयोगाच्या ५९ महिन्याच्या थकबाकी मिळण्यासंदर्भात पुढील कार्यवाही करू, असे आयुक्तांनी सांगितले.

विमाशी संघाच्या 'समस्या तुमच्या, पुढाकार आमचा' या उपक्रमा अंतर्गत नागपूर महानगरपालिका अंतर्गत शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या निवारणार्थ आमदार सुधाकर अडबाले यांनी मनपा आयुक्त यांच्यासोबत ११ ऑक्टोंबर रोजी समस्या निवारण सभा घेतली.




सभेच्या सुरुवातीला ४ सप्टेंबर २०२३ रोजी पार पडलेल्या सभेच्या इतिवृत्तावर चर्चा करण्यात आली. त्यानंतर मनपा शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता देण्यात यावा, दरमहा १ तारखेला वेतन अदा करण्यात यावे, शिक्षक, मुख्याध्यापकांची तसेच मनपा शिक्षण विभागातील उपशिक्षणाधिकारी व शाळा निरीक्षकांची रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी, निवडश्रेणी, महागाई भत्त्याची थकबाकी अदा करण्यात यावी व इतर अनेक सामूहिक, वैयक्तिक समस्यांवर चर्चा करण्यात आली.

मनपा शिक्षकांना बीएलओ या अशैक्षणिक कामांतून मुक्तता करावी, याबाबत जिल्हाधिकारी यांना पत्र लिहून मागणी करावी तसेच सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना निवृत्तीच्या दिवशी जीपीएफ धनादेश देण्याबाबत मनपाने कार्यवाही करावी, दिवाळीपूर्वी वेतन अदा करा, अशा सूचना आमदार सुधाकर अडबाले यांनी मनपा अधिकाऱ्यांना केला. बैठकीला मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, उपायुक्त आचल गोयल, शिक्षणाधिकारी साधना सयाम, उपशिक्षणाधिकारी सुभाष उपासे व अन्य अधिकारी उपस्थित होते.

यावेळी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, कोषाध्यक्ष भूषण तल्हार, नागपूर महानगर कार्यवाह अविनाश बढे, कार्याध्यक्ष अरुण कराळे, विजय गोमकर, लक्ष्मीकांत व्होरा, मंगेश घवघवे, उपाध्यक्ष राकेश दुमपलवार, मधुकर भोयर, मानकर, देवराव मांडवकर, प्रकाश गजभिये, दीपक सातपुते, नरेंद्र घुगल, चंद्रकांत ठाकरे, महेंद्र बोस, विनायक कुथे, प्रफुल्ल चरडे, माया गेडाम, नुतन चोपडे, निजाम, सय्यद हसन अलीसार, सुधाकर गुढघे, नावेद , श्याम गोहकर, पदाधिकारी व मनपा शिक्षकवृंद उपस्थित होते.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त तीन दिवसीय कार्यक्रमाची सांगता




■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. १५ :

कन्हान येथे चंद्रशेखर भिमटे मित्र परिवार आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने अशोक विजयीदशमी आणि धम्मचक्र प्रवर्तन दिवस निमित्त तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शनिवार दिनांक .१२ ऑक्टोंबर ला अशोक विजयादशमी च्या दिवशी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे महाकारुनिक तथागत गौतम बुद्ध , चक्रवर्ती राजा सम्राट अशोक , विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला रिपब्लिकन सांस्कृतिक संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर भिमटे , बुध्दीष्ट वेलफेर सोसायटीचे कार्याध्यक्ष भगवान नितनवरे, सचिव विनायक वाघधरे, दौलतराव ढोके, संजय सत्यकार, किशोर बेलसरे, अश्वमेघ पाटील , शैलेश माटे यांच्या हस्ते पुष्प हार माल्यार्पण करून त्रिशरण ग्रहण करून अभिवादन करण्यात आले.

रविवार दिनांक.१३ ऑक्टोंबर ला महाकारुनिक तथागत गौतम बुद्ध व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमे समक्ष मध्यरात्री १२ वाजता बुद्ध वंदना करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना सलामी देण्यात आली. सोमवार दिनांक.14 ऑक्टोंबर ला प्रसिद्धी टीव्ही सिंगर, कवी लेखक, कव्वाल गायक, प्रबोधनकार राहुल शिंदे यांचा सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रमाने आणि कन्हान पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, अनिलशिल वाघधरे, अनिरुद्ध गजभिए यांचा शॉल , श्रीफल आणि पुष्प गुच्छ देऊन सत्कार करुन तीन दिवसीय कार्यक्रमाची सांगता करण्यात आली . कार्यक्रमाचे सुत्र संचालन अखिलेश मेश्राम व आभार प्रदर्शन रोहित मानवटकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता प्रल्हाद कळमकर, चेतन मेश्राम, मनोज गोंडाने , नितिन मेश्राम, शैलेश दिवे, अखिलेश मेश्राम, महेंद्र चव्हान, अजय चव्हान, विजय धनविजय, नरेश चीमनकर, राजेश फुलझेले, संदीप शेंडे, आनंद चव्हान, महेश धोगडे, अश्विन भिवगडे, शरद मेश्राम, चिराल वैद्य, सुमेध नितनवरे, चिंटू यादव, दिवाळु, मेश्राम, नीलकंठ चव्हाण सह आदिंनी सहकार्य केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्धांना अभिवादन



■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. १५ :

पारशिवनी तालुक्यातील वराडा येथे नव बौद्ध पंच कमेटी द्वारे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्धांना अभिवादन करुन धम्मचक्र प्रवर्तन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित सामाजिक कार्यकर्ता उमेश मेश्राम, राहुल खोब्रागडे यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्धांचा प्रतिमेला पुष्प हार माल्यार्पण आणि दीप प्रज्वलन करुन भव्य कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली . यावेळी रोशन जामदार, हर्षल नेवारे यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिवस वर उपस्थितांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित नागरिकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पित करुन विनम्र अभिवादन करीत धम्मचक्र प्रवर्तन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी सरपंच सुनिल जामदार कुशाल पाटील, प्रवीण पाटील, देवीदास डोंगरे, आयुष गजभिए, लक्की ऊके, सावन पाटील, उज्वल खिलेकर, शुभम मेश्राम, संजय मेश्राम, अक्षय मेश्राम, सह आदि नागरिक उपस्थित होते.

# धर्मराज शाळेत वाचन प्रेरणादिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. १५ :

येथील धर्मराज प्राथमिक शाळेत आज (दि.15) माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांची जयंती जागतिक वाचन दिन म्हणून साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक श्री तेजराम गवळी तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री गणेश खोब्रागडे, मुख्याध्यापक श्री खिमेश बढिये, पर्यवेक्षक श्री मोहन भेलकर उपस्थित होते. प्रथम डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन मुख्याध्यापक श्री खिमेश बढिये यांनी करुन विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व विशद करुन दररोज परिसरात घडणाऱ्या घडामोडींचे वर्तमानपत्राच्या माध्यमातून वाचन करावे व वाचन कला वृध्दिंगत करावी, असे आवाहन केले. प्रमुख वक्ते म्हणून नरेंद्र कडवे यांनी डॉ एपीजे अब्दुल कलाम यांच्या जिवनकार्यावर प्रकाश टाकत वाचनाचे महत्त्व विशद केले. उपस्थितांचे आभार श्री भिमराव शिंदेमेश्राम यांनी मानले.



# घर घर संविधान हा बाबासाहेबांच्या विचारांचा सन्मान : ॲड. धर्मपाल मेश्राम

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ :

भारतीय संविधानाला ७५ वर्ष झाल्यानिमित्त उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र राज्य सरकारद्वारे घर घर संविधान अभियान राबविण्यात येत आहे. भारतीय संविधान आणि संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा खऱ्या अथार्ने सन्मान आहे, अशी भावना भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष व प्रवक्ते ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी व्यक्त करीत या महत्वपूर्ण पुढाकाराबद्दल त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहे.

विशेष म्हणजे, उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून घर घर संविधान हा अनोखा सन्मानजनक उपक्रम राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. यासाठी विविध संघटनांनी देखीलदेवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहे.

देवेंद्र फडणवीस यांचा समाजाप्रती असलेला सहिष्णूभाव आणि सर्वसमावेशी धोरण यातूनच राज्याला हा बहुमान मिळू शकला आहे, अशी प्रतिक्रीया ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी दिली आहे.

भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता तसेच संविधानाची मूल्य शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच देशाचे भावी नागरिक यांच्यापर्यंत पोहचावीत यासाठी राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व प्रकारची व्यावसायिक, बिगर व्यावसायिक महाविद्यालये, शैक्षणिक संकुले, शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळा, शासन मान्यता प्राप्त अनुदानित, विनाअनुदानित, स्वयं अर्थसहाय्यित शाळा, आश्रमशाळा व वसतिगृहे तसेच ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्था, महाराष्ट्र विधानपरिषद-विधानसभा अशा सर्व ठिकाणी भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या अमृतमहोत्सवी वर्षात संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ 'घर घर संविधान' साजरा करण्यात येणार आहे. यासंदर्भात राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाद्वारे शासन निर्णय देखील जारी करण्यात आले आहे.

शासन निर्णयानुसार, महाविद्यालय, वसतिगृहे यांच्या दर्शनी भागात संविधानाची उद्देशिका लावणे, शालेय परिपाठात तसेच वसतिगृह प्रार्थनेत दररोज संविधान प्रास्ताविका/ उद्देशिकचे वाचन विद्यार्थ्यांकडून करवून घेणे, शालेय वाचनालयात संविधानाच्या किमान पाच प्रती विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करवून देणे, भारतीय संविधान बाबत सर्वसाधारण माहिती देणे, जसे निर्मिती, निर्मिती समिती, अनुच्छेद, विशेषता, कर्तव्ये यावर व्याख्यान, विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील प्रमुख प्रकरणे, हक्क, आणि कर्तव्ये यावर मार्गदर्शन करणे, कार्यशाळांद्वारे विद्यार्थ्यांना संविधानाचे तत्त्वज्ञान आणि मूल्ये समजावून सांगणे, संविधान मूल्य यावर पथनाट्य तयार करणे, शाळा/महाविद्यालयात संविधानाच्या विविध मुद्यांवर फलक, पोस्टर, आणि प्रदर्शन आयोजित करणे, संविधान दिन कार्यक्रम आयोजित करणे, ज्यात पथनाट्य आणि पोस्टर प्रदर्शन याचा समावेश करावा, संविधानावर आधारित निबंध लेखन, भाषण, वादविवाद, चित्रकला स्पर्धा इत्यादी उपक्रमांचे आयोजन करणे, प्रजासत्ताक दिनी संविधानातील मुल्यांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन व सादरीकरण केले जाणार आहे.

महाराष्ट्र शासन आणि विशेषतः उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संकल्पना आणि पुढाकाराने अत्यंत स्तुत्य पाऊल उचलण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील घराघरांमध्ये भारतीय संविधानाची महती आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रसारीत आणि प्रवाहित होईल, असा विश्वास भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष व प्रवक्ते ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी व्यक्त केला आहे.

## नैर्ऋत्य मोसमी पावसाची विदर्भातून पूर्णपणे माघार

**नागपूर :** मान्सूनच्या परतीचा प्रवास आता वेग धरु लागला असून उत्तर आणि ईशान्य भारताच्या अनेक भागातून मान्सूनने माघार घेतली आहे. तर सोमवारी बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागातून मान्सून माघारी फिरला आहे. तर येत्या दोन दिवसात मान्सून गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, ओडिशाच्या उरलेल्या भागातून व महाराष्ट्राच्या काही भागातून माघारी फिरेल, असा अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला असतानाच विदर्भाच्या बाबतीत खात्याने आज आणखी एक घोषणा खात्याने केली आहे. राज्याच्या वातावरणात गेल्या काही दिवसांपासून सातत्याने बदल होत आहेत. परतीच्या पावसाची वाटचाल वेगाने सुरू झाली असतानाच राज्यातील काही भागात ऑक्टोबर हीटच्या उकाड्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. परतीच्या पावसाने जोर धरला असला तरीही उकाडा मात्र अजूनही कायमच आहे. गेल्या काही दिवसात विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. तर सोमवारी देखील विदर्भात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला. काही ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. उपराजधानीत अंशतः ढगाळ वातावरण राहून हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात विजांसह वादळी पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. तर अमरावती, वर्धा, अकोला, वाशिम, भंडारा, गोंदिया, बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली.

## निधन

### नानासाहेब उंचेकर

**वाडी :** दत्तवाडीतील सत्यसाई सोसायटी मधील रहीवाशी दत्तवाडी वारकरी भजन मंडळाचे सदस्य ह.भ.प.नानासाहेब रामचंद्र उंचेकर यांचे निधन झाले. ते ८० वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, जावई, नातवंड व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पाथीर्वावर मंगळवारी टेकडीवाडी स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आला.



# दादासाहेबांचे विचार पुढे न्या : सुरेश भोयर



■ महासागर प्रतिनिधी, कामठी, दि. १५ :

बीडी कामगारांचे नेते व माजी खासदार कर्मवीर अँड दादा साहेब कुंभारे यांनी स्वतःचे संपूर्ण आयुष्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा वारसा पुढे नेण्याकरिता खर्ची घातले. दादासाहेबांच्या चळवळी ची मशाल तेवत ठेवली पाहिजे, असे मत माजी जिप अध्यक्ष सुरेश भाऊ भोयर यांनी मांडले.

१४ ऑक्टोबरला कर्मवीर दादासाहेब कुंभारे यांच्या ४२ व्या स्मृती दिनानिमित्ताने अभिवादन करतांना सुरेश भोयर यांनी सांगितले. कर्मवीर दादासाहेब उर्फ अँड नारायन हरी कुंभारे यांचा जन्म बिडी उत्पादनाचे प्रमुख केंद्र कामठी शहरात २३ मार्च १९२३ ला झाला. तसेच १४ ऑक्टोबर १९८२ ला त्यांचे देहावसान झाले.

ड्रॅगन पेलेस टेंपल परिसरातील ॲड. दादासाहेब कुंभारे यांच्या शिल्पास माजी जिप अध्यक्ष सुरेश भाऊ भोयर यांनीं माल्यार्पण करून सामुहिक मानवंदना दिली.

याप्रसंगी सर्वश्री काशिनाथ प्रधान , नीरज लोनारे, सरितताई रंगारी, कुसुम ताई खोब्रागडे, आंनद खोब्रागडे, ममता राजेश कांबळे, धीरज यादव, राजेश कांबळे, आशिष मेश्राम, राजकुमार गेडाम, प्रकाश लाईनपांडे, नीतेश यादव आदी उपस्थीत होते.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ५० प्रकरणांची नोंद

**नागपूरः** नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ५० मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. मंगळवार (15) रोजी शोध पथकाने 50 प्रकरणांची नोंद करून 25,500/- रुपयाचा दंड वसूल केला.

हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 10 प्रकरणांची नोंद करून 4,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे (रु. 100/- दंड) या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 100/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 7 प्रकरणांची नोंद करून 2,800/- रुपयांची वसुली करण्यात आली.




वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 9 प्रकरणांची नोंद करून 6,000/- रुपयांची वसुली करण्यात आली.

सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/ साठवणे या अंतर्गत्त 1 प्रकरणांची नोंद करून 1,000 /- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 13 प्रकरणांची नोंद करून 2,600/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 9 प्रकरणांची नोंद करून 9,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने धरमपेठ झोन अंतर्गत श्री. अनिल अग्रवाल यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. हनुमान नगर झोन अंतर्गत मे. गौरी अर्पाटमेट बिल्डर्स यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. जाधव किराणा स्टोअर्स यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ५,०००/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. निखारे स्विटस यांच्यावर प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ५,०००/- हजार रुपयांचा दंड वसुल केला.

मंगळवारी झोन मे. दिवा फॅशन अँड लाईफस्टाइल एक्झीबीशन यांनी विनापरवानगी विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी रु. 5,000/- चे दंड वसुल करण्यात आला. उपद्रव शोध पथकाने 5 प्रकरणांची नोंद करून रू. 35,000/- दंड वसूल केला.

# मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना

## ९.४८ लाख शेतकऱ्यांचे चालू वीजबिल शुन्य

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ :

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेनुसार एप्रिल 2024 पासून राज्यातील 7.5 अश्व शक्तीपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीजपुरवठा करण्यात येत आहे. या योजनेचा नागपूर प्रादेशिक विभागामध्ये नागपूर, वर्धा, अकोला, बुलढाणा, वाशिम, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदीया आणि भंडारा जिल्हयातील 9 लाख 48 हजार 798 कृषिपंपधारक शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. या शेतकऱ्यांच्या एप्रिल ते जून 2024 च्या त्रैमासिक वीजबिलांपोटी राज्य शासनाकडून 487 कोटी 25 लाख रुपयांची रक्कम प्राप्त महावितरणला प्राप्त झाली आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना वीजबिल प्राप्तीच्या पावत्या म्हणजेच शून्य वीजबिलांचे वितरण महावितरणकडून करण्यात आले आहे.



राज्यात महावितरणचे 47 लाख 41 हजार कृषिपंपधारक वीजग्राहक आहेत. या कृषिपंपांकडून 39 हजार 246 दशलक्ष युनिट वार्षिक वीजवापर होतो. शेती मुख्यत्वे पावसावर अवलंबून आहे व अनियमित पर्जन्यमानामुळे शेतकरी अडचणीत आले आहेत. त्यामुळे राज्य शासनाने शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना जाहीर केली आहे व त्याची अंमलबजावणी महावितरणकडून करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेनुसार राज्यातील 44 लाख 28 हजार 564 शेतकऱ्यांच्या 7.5 अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीजपुरवठा करण्याचा व त्यासाठी 14 हजार 760 कोटी रुपये अनुदान महावितरणला देण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. विदर्भात महावितरणचे एकूण 9 लाख 64 हजार 736 कृषिपंपधारक वीजग्राहक आहेत. यामध्ये 9 लाख 48 हजार 798 कृषिपंपांची क्षमता 7.5 अश्वशक्तीपर्यंत तर उर्वरीत 15 हजार 938 कृषिपंपांची क्षमता त्यापेक्षा जास्त आहे. या योजनेनुसार 7.5 अश्व शक्तीपर्यंतच्या कृषिपंपांना एप्रिल 2024 पासून पाच वर्षांपर्यंत मोफत वीजपुरवठा करण्यात येणार आहे. त्याप्रमाणे विदभार्तील 9 लाख 48 हजार 798 कृषिपंपांच्या एप्रिल ते जून 2024 या त्रैमासिक वीजबिलांपोटी राज्य शासनाकडून 487 कोटी 58 लाख रुपयांचा भरणा करण्यात आला आहे. त्यामुळे या सर्व शेतकऱ्यांना वीजबिलाची रक्कम प्राप्त झाल्याची पावती वितरीत करण्यात आली आहे.

या योजने अंतर्गत नागपूर प्रादेशिक विभाग अंतर्गत 7.5 अश्वशक्तीपर्यंत नागपूर जिल्ह्यातील 1 लाख 1 हजार 857 कृषिपंपधारक शेतकऱ्यांचे 39 कोटी 33 लाखाचे, वर्धा जिल्ह्यातील 82 हजार 210 कृषिपंपधारक शेतकऱ्यांना 39 कोटी 33 लाख, अकोला जिल्ह्यातील 67 हजार 644 कृषीपंपधारक शेतकऱ्यांना 47 कोटी 49 लाख, अमरावती जिल्ह्यातील 1 लाख 43 हजार 789 कृषीपंपधारक शेतक-यांना69 कोटी 91 लाख, भंडारा जिल्ह्यातील 56 हजार 618 कृषीपंपधारक शेतक-यांना 32 कोटी 49 लाख, बोलढाणा जिल्ह्यातील 1 लाख 67 हजार 570 कृषीपंपधारक शेतक-यांना 82 कोटी 65 लाख, चंद्रपूर जिल्ह्यातील 47 लाख 834 कृषीपंपधारक शेतक-यांना 12 कोटी 88 लाख, गडचिरोली जिल्ह्यातील 41 हजार 748 कृषीपंपधारक शेतक-यांना 22 कोटी 70 लाख, गोंदीया जिल्ह्यातील 47 हजार 251 कृषीपंपधारक शेतक-यांना 37 कोटी 96 लाख, वाशिम जिल्ह्यातील 64 हजात 955 कृषीपंपधारक शेतक-यांना 43 कोटी 73 लाख आणि यवतमाळ जिल्ह्यातील 1 लाख 27 हजार 122 कृषीपंपधारक शेतक-यांचे 80 कोटी 97 लाखाचे चालू वीज बिल माफ झाले असून या सर्व शेतक-यांना पुढिल पाच वर्षे मोफत वीज उपलब्ध होणार आहे.

# व्यसन भागविण्यासाठी विद्यार्थ्याचे अपहरण

**नागपूर :** व्यसन भागविण्यासाठी दोन तरुणांनी अल्पवयीन साथीदारासोबत मिळून एका विद्याथ्यार्चे अपहरण केले. निर्जन ठिकाणी घेऊन जात त्याला मारहाण केली. नग्न करून त्याचा व्हीडिओ बनवला. तो व्हीडिओ व्हायरल करण्याची धमकी देत जबरीने त्याच्याकडील 5 हजार रुपये हिसकावून घेतले. ही खळबळजनक घटना बेलतरोडी पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा नोंदवून दोन आरोपींना अटक केली आहे. हर्षल राजेश शाहू (19) रा. बालकृष्णनगर, मानेवाडा बेसा रोड आणि प्रयाग रवींद्र मेश्राम (19) रा. मुद्रानगर, मानेवाडा अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. अल्पवयीन यालाही ताब्यात घेऊन पोलिस चौकशी करीत आहेत. फियादी विपीन चुडामन पाटील (49) रा. नरेंद्रनगर यांचा मुलगा प्रज्ज्वल (17) हा बारावीचा विद्यार्थी आहे. शनिवारी रात्री तो मित्रांसोबत नरेंद्रनगर मैदानात आयोजित गरबा पाहण्यासाठी गेला होता. त्याचे आई-वडील हे सुद्धा तेथे होते. रात्री 11.30 वाजताच्या सुमारास आई-वडील घरी परतले, मात्र प्रज्ज्वल तेथेच थांबला. 12 वाजताच्या सुमारास आरोपी हर्षल त्याच्याजवळ आला. गळ्यात हात टाकून काही बोलायचे असे म्हणत मैदानातून बाहेर घेऊन गेला. त्याच्यासोबत प्रयाग आणि अल्पवयीन आरोपीही होता. तिघांनीही त्याला जबरीने त्यांच्या एमएच-31/सीपी-7811 क्रमांकाच्या एसयूव्ही गाडीत कोंबले आणि शंकरपूर परिसरात घेऊन गेले. परिसरातील एका बंद वाड्यात घेऊन जात त्याला मारहाण केली. जबरीने त्याला नग्न करून व्हीडिओ बनवला. व्हीडिओ व्हायरल करण्याची धमकी देत त्याला नशा करण्यासाठी पैसे मागितले. घाबरलेल्या प्रज्ज्वलने त्याच्या खिशात असलेले 3 हजार रुपये त्यांना दिले. त्यानंतरही आरोपींनी पुन्हा मारहाण करून त्याला पैसे मागितले. प्रज्ज्वलने मित्राला फोन करून आरोपींनी दिलेल्या क्यूआर कोडवर 2 हजार रुपये पाठविण्यास सांगितले. पैसे मिळताच आरोपींनी त्याला परत नरेंद्रनगरात सोडले. पोलिसात तक्रार केल्यास जिवे मारण्याची धमकी दिली आणि पळून गेले.

1.30 ते 2 वाजताच्या सुमारास प्रज्ज्वल घरी पोहोचला. मारहाणीमुळे त्याचा चेहरा सुजलेला होता. कुटुंबीयांनी विचारपूस केली असता घडलेला प्रकार सांगितला. कुटुंबीय त्याला थेट बेलतरोडी पोलिस ठाण्यात घेऊन गेले आणि तक्रार दाखल केली.

पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला. ठाणेदार मुकुंद कवाडे यांनी घटनेची गंभीरता लक्षात घेत आरोपींचा शोध घेण्यासाठी तत्काळ एक पथक तयार केले. तासाभरातच सर्व आरोपींना शोधून काढत त्यांच्या मुसक्या आवळल्या. आरोपी हर्षल आणि प्रयाग हे अभियांत्रिकीचे विद्यार्थी आहेत. हर्षलचे वडील हे हॉटेल व्यवसायी आहेत. पोलिसांनी अल्पवयीन मुलाचे समूपदेशन केल्यानंतर त्याला त्याच्या पालकांच्या स्वाधिन केले.

# बसपाने काढली अभिवादन रॅली



**नागपूर :** कही हम भूल न जाये या बसपाच्या राष्ट्रीय अभियानांतर्गत धम्मचक्र प्रवर्तनाच्या 2568 व्या दिन निमित्त काल बसपाने दीक्षाभूमीवर अभिवादन रॅली काढून तथागत बुद्ध, सम्राट अशोक व बाबासाहेबांना अभिवादन केले. धम्मचक्र प्रवर्तन दिन चिरायु हो, महापुरुषो के सन्मान मे बीएसपी मैदान मे, संविधान के सन्मान में बीएसपी मैदान मे, च्या घोषणे सोबतच बसपाने "जो जमीन सरकारी है वह जमीन हमारी है" या नायाच्या समर्थनार्थ कॉटन रिसर्च ची 5 एकड व आरोग्य विभागाची 15 एकड जागा दीक्षाभूमी स्मारकाचे सौंदरीकरण व पुनर्विकास करिता देण्यात यावी, अशी मागणी सुद्धा केली.

रॅलीचे नेतृत्व प्रामुख्याने प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, प्रदेश सचिव सुनील कोचे, जिल्हा प्रभारी रंजनाताई ढोरे, राजकुमार बोरकर, किशोर गेडाम, जिल्हाध्यक्ष योगेश लांजेवार, माजी जिल्हाध्यक्ष संदीप मेश्राम, महासचिव चंद्रशेखर कांबळे, अभिलेश वाहाने, महिला नेता सुनंदा नितनवरे मंगला लांजेवार आदींनी केले. याप्रसंगी पश्चिम नागपूरचे अंकित थुल, दक्षिण नागपूरचे जितेंद्र पाटील, नितीन वंजारी, उत्तर नागपूरचे अजय उके, अनिल मेश्राम, दक्षिण पश्चिमचे शिवपाल नितनवरे, मध्यचे प्रवीण पाटील, पूर्वचे मुकेश मेश्राम, सचिन मानवटकर, राजेश फुलझेले, महिपाल सांगोडे, भानुदास ढोरे, विलास मून, सुमित जांभुळकर, विशाल गोंडाणे, अमित गजभिये, वीरेंद्र कापसे, चंद्रमणी गणवीर, ज्योतिबा अलोने, यांच्यासह मोठ्या प्रमाणात पदाधिकारी उपस्थित होते.

# कथा अभिवाचनाचा श्रोत्यांनी घेतला आनंद

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ :

माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विदर्भ साहित्य संघ आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या अंतर्गत कथा अभिवाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात विवेक अलोणी, विनय मोडक, कल्याणी गोखले यांचा सहभाग होता.

सुप्रसिद्ध साहित्यिक प्र. के. अत्रे यांच्या 126 व्या जन्मवर्षानिमित्त आणि जयवंत दळवी व विद्याधर पुंडलिक यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या कथांचे अभिवाचन करण्यात आले. शारदास्तवन आणि वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, सरचिटणीस विलास मानेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

विवेक अलोणी यांनी जयवंत दळवी यांच्या रुक्मिणी या कथेचे वाचन केले. विठ्ठलरावांची पत्नी रुक्मिणी वेड्यांच्या इस्पितळात गेल्यानंतर 10 वर्षांनी अचानक ती




## वि. सा. संघाचा उपक्रम, वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य

घरी आल्यावर त्यांची झालेली मनाची स्थिती, तिच्या चांगल्या-वाईट आठवणी, मुले आणि इतर लोकांची त्यांच्याशी असलेली वागणूक अतिशय उत्तम मांडली. यानंतर कल्याणी गोखले यांनी विद्याधर पुंडलिक यांची दवणा ही कथा सादर केली. विनय मोडक यांनी प्र. के. अत्रे यांची काळे मांजर ही कथा वाचली. मालतीच्या आयुष्यात एका काळ्या मांजरामुळे चांगल्या गोष्टी घडायला लागतात.

अचानक ते एक दिवस दिसेनासे होते आणि ते शेजारच्या घरी नाटककार मनोहरकडे सापडते. काळं मांजर शुभशकुन मानणाऱ्या या दोघांची त्या मांजरामुळे ओळख होते. आणि दोन एकलकोंड्या व्यक्तींची घनिष्ठ मैत्री होते. मनोहरचे नाटक अयशस्वी झाल्याने तो निराश होतो. परंतु मालती त्यातून त्याला बाहेर काढते आणि त्याला स्वीकारते, अशी ही कथा आहे.

संचालन आणि आभारप्रदर्शन माधुरी वाडीभस्मे यांनी केले. यावेळी वि. सा. संघाचे प्रकाश एदलाबादकर आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# सी.पी.अँड बेरारच्या व्यवस्थापन विभागात नवागतांचे स्वागत



**नागपूर :** सी. पी. अँड बेरार ए. सो. कॉलेजच्या रविनगर स्थित व्यवस्थापन विभागात प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी फ्रेशरस डे साजरा करण्यात आला. द्वितिय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी 2024-26 साठी प्रवेश केलेल्या एम.बी.ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे उत्साहत स्वागत केले. व्यवस्थापन विभाग प्रमुख शरदचंद्र भावे यांनी उपस्थितांना संस्थेच्या नवीनता परिषदेविषयी माहिती विषद केली व आपले प्रेरणादायी विचार व्यक्त केले. डॉ. आशिष लिंगे यांनी बदलत्या औद्योगिक वातावरणामध्ये प्रत्येक प्रशिक्षणार्थीने रोजगार कौशल्यावर लक्ष केंद्रित करणे ही काळाजी गरज असल्याचे सांगितले, तर डॉ. प्रविण बागडे म्हणाले सकारात्मक दष्टिकोन हीच यशाची गुरूकिल्ली आहे.

# खवय्यांसाठी उच्चविद्याविभूषीत तृतीयपंथीयांचा अर्धनारी फूड ट्रॅक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ :

समाजातील सर्वसामान्यांप्रमाणेच आम्हीही कष्ट करून उदरनिर्वाह करायला तयार आहोत. मात्र, आम्हाला सर्वसामान्यांसारखीच वागणूक द्यायला, नोकरी द्यायला, त्यांच्यात सामावून घ्यायला, लोक तयार आहेत का, असा प्रश्न शिवन्या व मोहिनी या तृतीयपंथीयांनी उपस्थित केला. मोहिनीच्या सहकार्याने शिवन्याने अलीकडेच अर्धनारी फूड ट्रक सुरू केला. त्याचे उद्घाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. सध्या महाराजबाग ते सीताबर्डी या मार्गावर अर्धनारी फूड ट्रक दिसून येतो.




सेवा इंटरनॅशनलच्या सहकार्याने आणि मिशन विश्व ममत्त्व फाऊंडेशनअंतर्गत हा उपक्रम राबवला जात आहे. केवळ तृतीयपंथी असल्यामुळे अभियांत्रिकीची पदवी घेऊनही शिवन्याला नोकरी मिळाली नाही. सुरुवातीला हिंगणा एमआयडीसी परिसरात अनेक कंपन्या पालथ्या घातल्या आणि मग हे खूळच डोक्यातून काढून टाकले. मात्र, हाताला असलेल्या चवीने बरेच काही मिळवून दिले. आधी चहाचा छोटा व्यवसाय आणि त्यानंतर घरी बसून पदार्थांचे ऑर्डर घेतले. दरम्यान, विश्व ममत्व फाऊंडेशनच्या श्रद्धा जोशी यांनी पुढाकार घेतला.

सेवा इंटरनॅशनलने मदतीचा हात पुढे केला. त्यातून सेकंडहँड वाहन खरेदी करून त्याचे फूड ट्रक मध्ये रूपांतर केल्याचे शिवन्याने सांगितले. सुरुवातीला आम्हाला अनेक अडचणी आल्या. मात्र, त्यावर आम्ही मात केली, असे मोहिनीने सांगितले. तृतीयपंथीयांचा जो चेहरा समाजासमोर आहे तो आम्हाला बदलायचा होता.

तृतीयपंथीयांसाठी सरकारकडे अनेक प्रकल्प आहेत, पण ते केवळ नावासाठीच. मुंबई, दिल्लीसारख्या शहरात थोडाफार तरी लाभ मिळतो, पण नागपूर शहरात अजूनही आम्हाला स्वीकारार्हता लाभलेली नाही. आम्हालाही नाव कमवायचे आहे. त्यामुळे समाजाने देखील आम्हाला एक सामान्य माणूस म्हणूनच स्वीकारायला हवे. आमच्यात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. शिक्षणाचा हक्क मिळवून देण्यासाठी सहकार्याची गरज आहे. काही बाबतीत आम्हालाही आमच्यात बदल घडवून आणावे लागतील. कुणासमोर हात न पसरता शिक्षण घेऊन, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे लागेल, असे शिवन्या व मोहिनी यांनी सांगितले.

मूळची नांदेड जिल्ह्यातील शिवन्याने नागपूर शहरातील वैनगंगा अभियांत्रिकी महाविद्यालयातून अभियांत्रिकीची पदवी घेतली आहे. परिस्थिती बेताची असताना स्वप्न मात्र मोठी होती. वाचनाची प्रचंड आवड असलेल्या शिवन्याला भारतीय प्रशासकीय सेवेत जायचे आहे आणि त्यासाठी तिची तयारी देखील सुरू आहे.

मूळची नागपूरचीच असलेल्या मोहिनीने समाजकार्य विषयात पदवी घेतली आहे. समाजकार्याची तिला प्रचंड आवड आहे, पण त्याचबरोबर ती एक उत्तम नृत्यांगनादेखील आहे. भारतभरात ती इतर तृतीयपंथी सहकाऱ्यांसह नृत्याचे सादरीकरण करते. दिसायला मोहक असलेल्या मोहिनीने २०२१ चा सर्वात सुंदर तृतीयपंथीयाचा पुरस्कार पटकावला आहे.

# वैज्ञानिक सांगतात, प्रत्येकाने वर्षाला १८० अंडी आणि १२ किलो मांसाहार खाण्याची गरज

**नागपूर :** नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूट्रिशन हे हैदराबाद ही भारतातील सार्वजनिक आरोग्य, पोषण यावर संशोधन करणारी संस्था आहे. या संस्थेने प्रत्येक व्यक्तिच्या शरीराला किती प्रमाणात प्रथिनांची गरज आहे याचे प्रमाण ठरवून दिले आहे. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर येथे भारतीय पोल्ट्री विज्ञान संघटनेच्या वतीने तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. अजित रानडे यांनी प्रत्येक व्यक्तिला वर्षाला १८० अंडी आणि १२ किलो मांसाहार करणे आवश्यक असल्याचे वैज्ञानिक कारण सांगितले आहे. याविषयी सविस्तर जाणून घेऊया.

करोना काळात अंड्यांची मागणी वाढली होती. शरीराला आजारातून बरे होण्यासाठी पोषण मिळणे गरज असल्याने कोव्हिड-१९ मधून बरे



होणाऱ्यांना अंड खाण्याचा सल्ला देण्यात आला होता. अंडे हा पोषक घटकांनी परिपूर्ण असलेला पदार्थ आहे. चांगल्या आरोग्यासाठी अंड्यांचा आहारात समावेश करणे गरजेचे आहे. लहानांपासून मोठ्यापर्यंत अनेक जण आवडीने अंडी खातात; पण तुम्हाला माहीत आहे का नियमित अंडी खाणे कितपत चांगले आहे? अंडी नैसर्गिक मल्टीव्हिटॅमिन आहे आणि आपल्या शरीरासाठी ती निरोगी आहेत असे डॉ. रानडे सांगतात. अंडे किंवा मांसाहार हे निश्चितपणे एक पौष्टिक पदार्थ आहेत. त्याचे आरोग्याला अनेक चांगले फायदे होऊ शकतात. त्यात प्रथिने, जीवनसत्त्वे, खनिजे, व्हिटॅमिन डी, व्हिटॅमिन बी-१२, सेलेनियम इत्यादी पोषक घटकांचा समावेश आहे. त्याशिवाय अंड्यांमध्ये चांगले फॅट्स आणि अंटीऑक्सिडंट्स घटक आहेत; जे मेंदू आणि डोळ्यांचे आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत करतात.

# मनपा बस सेवेतील चालक वाहकांच्या वेतनवाढीचा अखेर निर्णय



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ :

महाराष्ट्र राज्यातील मनपा परिवहन सेवेतील विशेषतः बस सेवेत कार्यरत असलेल्या चालक वाहक कर्मचाऱ्यांची गेल्या १५ वर्षांपासून पगार वाढीची मागणी प्रलंबित होती. १५ वर्षांच्यां वेतन निश्चितीद्वारे हे समस्त चालक वाहक कार्यरत होते व तुटपुंज्या पगारात कुटुंबाचा सांभाळ करत होते. या सोबतच अनेक आर्थिक अडचणीना देखील त्यांना समोर जावं लागत होते. मागील अनेक महिन्यांपासून शासन स्तरावर याबाबतीत प्रयत्न सुरू होते. नागेश सहारे आणि विजय गटलेवार ह्यांच्या पुढाकाराने कामगार युनियन आणि भारतीय मजदुर संघाचे अनेक कर्मचाऱ्यांनी संप पुकारला. तसेच कामगार युनियन आणि भारतीय मजदुर संघातर्फे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी देखील लावून धरण्यात आली होती. आमदार प्रविण दटके, नागेश सहारे आणि भारतीय मजदुर संघाचे विजय गटलेवार यांनी सातत्याने हा विषय सोडविण्याचे प्रयत्न केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार मनपा वाहन चालक कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ करण्यात आली. गेल्या १५ वर्षांपूर्वी १३ हजार रु. असलेला पगार आता १८ हजार पर्यंत वाढवण्यात आल्यामुळे कामगार वर्गात आनंदाचे वातावरण आहे. या संपूर्ण प्रकरणाच्या यशाबाबत कमलेश वानखेडे, निलेश पौनिकर, प्रविण नरवले, उत्तम शेंडे, सुमित चिमोटे, विक्की चौधरी, राजेंद्र चौधरी दिपक वानखेडे, नरेंद्र निंबाळकर, विनोद सोनटक्के या कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस, अजित पवार आणि आ. प्रविण दटके यांचे आभार मानले.

# मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांकडून ट्रेन लाइटिंग ट्रेनिंग सेंटरचे निरीक्षण



**नागपूर :** 11 ऑक्टोबर 2024 रोजी, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, श्री धरमवीर मीणा यांनी नागपूर विभागाच्या अजनी येथील ट्रेन लाइटिंग ट्रेनिंग सेंटरची पाहणी केली. यावेळी महाव्यवस्थापकांनी एलएचबी कोचचे कामकाजाचे मॉडेल, इलेक्ट्रॉनिक दुरुस्ती विभाग आणि डेपोद्वारे करण्यात येत असलेल्या कोचच्या देखभालीच्या कामाची बारकाईने पाहणी केली. त्यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांकडून प्रशिक्षण व दुरुस्तीबाबत सविस्तर माहिती घेतली. यादरम्यान प्रतिभा गुप्ता यांनी छल्इ डब्यांमध्ये अजनी आगाराकडून करण्यात येत असलेल्या विशेष बदलांची माहिती महाव्यवस्थापकांना दिली. तपासणीदरम्यान, महाव्यवस्थापकांनी प्रशिक्षण केंद्र, कार्यालय, स्वच्छतागृहे आणि अंगणातील स्वच्छता आणि देखभालीचीही दखल घेतली. तसेच, ट्रेन लाइटिंग डेपोमध्ये महाव्यवस्थापक व विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री मनीष अग्रवाल यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये विभागातील अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.